नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ७४ * * नागपूर * गुरुवार, दिनांक १२ जून २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## शरद पवारांनी मानले नरेंद्र मोदींचे आभार

**■ वृत्तसंस्था, अहिल्यानगर, दि. ११ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी सुप्रिया सुळे गेल्या असता, मोदींनी शरद पवार यांच्या तब्येतीची विचारपूस केली असल्याची माहिती समोर आली होती. पंतप्रधानांनी माझ्या तब्येतीची विचारपूस केल्याबद्दल मी त्यांचा आभारी असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

या संदर्भात शरद पवार यांनी दोनच शब्दात पंतप्रधानांनी केलेल्या चौकशी बद्दल आभार मानले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या काल झालेल्या वर्धापन दिन मेळाव्यानंतर शरद पवार आज अहिल्या नगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मी त्यांचा 'आभारी आहे' असे म्हणत शरद पवार यांनी मोदी यांचे आभार मानलेत.

## मराठा समाजाच्या एसईबीसी आरक्षणाला
# स्थगिती नाहीच!

**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**
राज्य सरकारने मराठा समाजाला एसईबीसी कायद्याअंतर्गत १० टक्के आरक्षण दिले होते. हे आरक्षण सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक प्रवेशांमध्ये देण्यात आले.

मात्र, या निर्णयाविरोधात उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर, आरक्षणाच्या समर्थनार्थही काही याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. आज मराठा आरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. या सुनावणीत दोन्ही बाजूंनी वकिलांनी आपले युक्तिवाद मांडले.

सुप्रीम कोर्टाने मे महिन्यात मुंबई उच्च न्यायालयाला मराठा आरक्षणासंबंधी दाखल सर्व याचिकांवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते. या याचिकांमुळे उच्च शिक्षणात मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण मिळण्यात अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या वैधतेबाबत नव्याने सुनावणी आजपासून मुंबई उच्च न्यायालयात सुरू झाली आहे. आता हे आरक्षण कायद्याने मान्य ठरेल की नाही, याचा अंतिम निर्णय या सुनावणीतून होणार आहे.

मराठा आरक्षण प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ, ज्यामध्ये न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठ आहे, सुनावणी घेत आहेत. सुनावणीच्या सुरुवातीला, हे प्रकरण तात्पुरत्या दिलास्यासाठी घ्यायचे की अंतिम निर्णयासाठी घ्यायचे, यावर वकिलांमध्ये आणि न्यायमूर्तींमध्ये युक्तिवाद झाला.

विरोधी वकिलांनी जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत अंतरिम स्थगिती द्यावी, अशी मागणी केली. त्यानंतर, सरकारी वकिलांनी हे प्रकरण थेट अंतिम सुनावणीसाठीच घेतले जावे, असा युक्तिवाद मांडला.

मराठा आरक्षणाच्या सुनावणीबाबत बोलताना महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आधीच अंतरिम दिलासा आहे. मग पून्हा सुनावणी घेण्यात अर्थ नाही, आता अंतिम सुनावणीला सुरूवात करायला हवी. यानंतर न्यायमूर्तींनी म्हटले की, मराठा आरक्षणाच्या विरोधात अनेक याचिका आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र बसून विरोधकांची बाजू नेमके कोण मांडणार हे ठरवा.

यावर विरोधी वकिल प्रदीप संचेती यांनी म्हटले की, प्रत्येक याचिकाकर्त्याने विविध विषय वाटून घेतले आहे. प्रत्येकाला आपले मत मांडायचे आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार द्यायला हवा.

यानंतर न्यायाधिश घुगे यांनी, मराठी आरक्षणाची पुढील सुनावणी १८ तारखेला ३ वाजता आणि १९ जूलै २०२५ रोजी पुर्ण दिवस चालेल अशी माहिती दिली. त्यानंतर १९ जुलैला पुढची तारीख जाहीर केली जाणार आहे. आज मराठा समजाच्या एसईबीसी आरक्षणवर कुठलीही स्थगिती नाही, त्यामुळे मराठा विद्याथ्यार्ना एसईबीसी एडमिशनचा मार्ग मोकळा झाला आहे. आता पुढ़ील सुनावणी पुढ़िल महिन्यत १८-१९ जुलैला होणार आहे.

## नागपूरमध्ये मोबाइल मेडिकल युनिट्सद्वारे मोफत आरोग्य सेवा सुरू

मुख्यमंत्री फडणवीस यांचा पुढाकार



**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर शहरातील दुर्लक्षित भागांतील नागरिकांसाठी एक दिलासादायक आरोग्य सेवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

यासाठी सॅनोफी इंडिया लिमिटेड, नागपूर महानगरपालिका आणि पिरामल स्वास्थ्य व्यवस्थापन व संशोधन संस्था (पीएसएमआरआय) यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार होऊन दोन मोबाइल मेडिकल युनिट्स (एमएमयू) कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

हा उपक्रम सॅनोफीच्या सामाजिक उत्तरदायित्व (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी -सीएसआर) कार्यक्रमांतर्गत राबविला जात आहे.

नागपूरमधील ३० वर्षांवरील सुमारे दोन लाख नागरिकांना या माध्यमातून मोफत प्राथमिक आरोग्यसेवा मिळणार आहे. विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब व तोंडाचा कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे वेळीच निदान करून आवश्यक उपचार अथवा पुढील रुग्णालयीन सेवेसाठी रुग्णांना पाठविणे हे या युनिट्सचे मुख्य उद्दिष्ट आहे.

ही मोबाइल युनिट्स शहरातील आझाद कॉलनी, बडा ताज, बीडी पेठ, बिनाकी, छोटा जात, धंतेश्वरी नगर, धरम पेठ, डॉ. आंबेडकर नगर, एकात्मता नगर, गिट्टीखदान, गोपाल नगर, जैताळा, जयंती नगर, महात्मा फुले चौक, नंदनवन, पाचपोळी आदी विविध भागातील मार्गावर कार्यरत असून, नागरी गरीब व वंचित समाजघटकांपर्यंत सातत्याने आरोग्यसेवा पोहोचवली जात आहे. यासोबतच आरोग्य विषयक जनजागृती, जीवनशैली सुधारणा आणि व्यसनमुक्ती सल्ला सेवा यांचा समावेश देखील या उपक्रमात करण्यात आला आहे.

हा उपक्रम राज्य शासनाच्या सर्वसमावेशक व सुलभ आरोग्यसेवा प्रदान करण्याच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असून, नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्यामुळेच या सेवांची प्रभावी अंमलबजावणी शक्य झाली आहे. भविष्यात या उपक्रमाचा विस्तार करण्यासाठी राज्य शासनासोबत अधिक सघन सहकार्य करण्यात येणार आहे.

अग्राग्रलेख
**खरीखरी..**

## रेल्वेचे २४ तास

भारतीय रेल्वेने गेल्या काही काळापासून कात टाकलेली आहे. नवनवीन गाड्या सुरू झालेल्या आहेत. त्यामध्ये वंदेभारत ही वेगवान गाडी आता चांगलीच लोकप्रिय होत आहे. या प्रकारच्या गाड्यांच्या डब्यात चांगल्या सुधारणा झालेल्या आहेत. प्रवाशांनी तक्रार केल्यावर लगेच प्रतिसाद मिळतो. अनेक ठिकाणचे अंतर कमी वेळात पार होते. थोडक्यात आपल्या देशातील रेल्वेचे जाळे अत्याधुनिक रितीने चालवण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. गेल्या काही वर्षात रेल्वेच्या पॅसेंजर गाड्या मोठ्या प्रमाणात कमी झालेल्या आहेत. सर्वसामान्य जनता या गाड्यांचा उपयोग करून प्रवास करण्यामध्ये आघाडीवर होती. या पॅसेंजर गाडीची तिकिटे अत्यंत म्हणजे अत्यंत कमी किमतीत मिळत असत. या गाड्या सर्व स्थानकावर थांबत असत. त्यात रिझर्वेशनची काहीच भानगड नसे. रेल्वेने या प्रकारच्या अनेक लोकप्रिय गाड्या बंद करून टाकल्यामुळे लहान गावातील रेल्वेची स्थानके अगदी ओकी-बोकी झालेली आहेत. संपूर्ण भारतातील कितीतरी पॅसेंजर गाड्या बंद झाल्यामुळे कमी अंतरावर जाण्यासाठी जी सुविधा उपलब्ध होती. ती आता जवळजवळ बंद झालेली आहे. पण ज्या प्रमाणात अत्याधुनिक गाड्या वेगवेगळ्या मार्गावर सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्याची परिणीती या गाड्या बंद होण्यातच होईल, हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. एकूणच रेल्वेच्या वेगापासून ते खाना-पानापर्यंतची माहिती हल्ली सहज उपलब्ध होत असते. आतापर्यंत रिझर्व केलेल्या म्हणजेच आरक्षित केलेल्या तिकिटांची माहिती चार तासांपूर्वी जाहीर करण्यात येत होती. तोपर्यंत ज्यांची तिकिटे वेटिंग लिस्टवर असायची. जे वेटिंग लिस्टवर असायचे. त्यांच्या मनाची धाकधूक प्रचंड वाढत असे. केवळ चार तासाच्या वेळात दुसरी काही पर्यायी व्यवस्था करणे शक्यच नव्हते. त्यामुळे पूर्ण पैसे भरून प्रवाशांना चोरासारखा प्रवास करावा लागत होता. आता नुकताच रेल्वे कडून एक निर्णय झाल्याची बातमी आलेली आहे. त्यामध्ये रिझर्वेशन नसल्यास जबर दंड करण्यात येईल असे ठरलेले आहे. या सर्व खटाटोपामध्ये रेल्वेने आता आरक्षण यादी प्रवासापूर्वी २४ तास जाहीर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे प्रवाशांना पर्यायी व्यवस्था करणे सुलभ होणार आहे. दुसऱ्या गाडीची तत्काळ तिकिटे घेणे किंवा इतर काही व्यवस्था करणे. शक्य होऊन प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. दिवसेंदिवस आपली भारतीय रेल्वे प्रवाशांभिमुख होत आहे. रेल्वेच्या २४ तासांच्या निर्णयाचे आपण स्वागत केले पाहिजे. त्यामुळे प्रवाशांची धावाधाव थांबेल आणि रेल्वेचे आरक्षण नसलेल्या प्रवाशांची गर्दीही कमी होईल. हा त्यामधील फायदा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## सेवानिवृत्तांचा पुन्हा सत्तेवर कब्जा?

**सरकारचा कंत्राटी निर्णय वादात : कर्मचारी संघटनांचा आक्षेप**

**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ११ :**
राज्य सरकारने सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय घेतल्याने प्रशासनात वादाची नांदी झाली आहे.

६५ वर्षांपर्यंत सेवा देण्याचा मार्ग खुला करत, सरकारने मंत्रालयासह विविध विभागांतील निवृत्त अधिकारी पुन्हा कार्यरत करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. मात्र, हा निर्णय कर्मचाऱ्यांच्या संघटनांना रुचलेला नाही. हा निर्णय नव्या पिढीवर अन्याय करणारा असून, मर्जीतल्या अधिकाऱ्यांची निवड करून पक्षपाती राजकारणाला खतपाणी घालणारा आहे, असा आक्रोश संघटनांनी व्यक्त केला आहे.

**तरुणांसाठी अडथळा?**
राज्यसेवेत नियमित भरती न करता कंत्राटी पद्धतीला प्राधान्य देणे ही सरकारची धोरणात्मक भूमिका असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी यापूर्वीही केला होता. आता निवृत्त अधिकाऱ्यांनाच पुन्हा संधी देण्याच्या निर्णयामुळे, नव्या उमेदवारांच्या संधींवर गदा येत असल्याचं चित्र समोर येत आहे.

राज्य सरकार निवृत्तीचं वय ६० करण्यास तयार नाही, पण त्याच अधिकाऱ्यांना ६५ व्या वर्षापर्यंत पुन्हा सेवेत घेते, हे दुटप्पी धोरण नव्हे तर काय? असा सवाल संघटनांनी उपस्थित केला आहे.

या निर्णयाच्या अंमलबजावणीत निवडक अधिकाऱ्यांना संधी देण्याची शक्यता, तसेच सरकारच्या जवळच्या आणि मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच प्राधान्य मिळेल, अशी भीती संघटनांनी व्यक्त केली आहे. यामुळे कारभारात गटबाजी, भेदभाव आणि निष्पक्षतेचा अभाव दिसून येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## एसीचे तापमान २० अंशापेक्षा कमी नको

**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :**
येत्या काळात, जर तुम्ही नवीन एसी घेतला तर तुम्ही तो १६ किंवा १८ अंशांवर चालवू शकणार नाही, तुम्ही तो फक्त २० ते २८ अंशांदरम्यान सेट करू शकाल.

उन्हाळ्याच्या हंगामात एसीमधून होणारा वीज वापर थांबवण्यासाठी केंद्र सरकार लवकरच एक नवीन नियम आणत आहे.

सरकारचा दावा आहे की यामुळे वीज बचत होईल, बिल कमी होईल आणि देशभरातील लाखो ग्राहक पुढील तीन वर्षांत १८,०००-२०,००० कोटी रुपयांची बचत करतील. ऊर्जा मंत्री मनोहर लाल म्हणाले- एसी उत्पादक कंपन्यांसाठी नवीन नियमामुळे कूलिंग आणखी चांगले होईल.

## काँग्रेसचा गुरुवारी राज्यभर मशाल मोर्चा

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :**
राज्य विधानसभा निवडणुकीतील वाढीव मतदानाचा मुद्दा काँग्रेसने पुन्हा हातात घेतला असून या मुद्द्यावर जनजगृती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गुरुवारी राज्यभर मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चाच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीतील घोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे स्वतः गडचिरोलीमधील आंदोलनात सहभागी होणार आहेत. विधानसभा निवडणुकीतील ' मॅच फिक्सिंग' ची चौकशी करण्याची मागणी काँग्रेसने केली आहे.







# मुंबईत प्रभाग रचना जैसे थे!



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
गेल्या तीन ते चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

या निवडणूकांसाठी तीन टप्प्यात प्रभाग रचना तयार करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यामुळे आता ऑक्टोबर महिन्यात मुंबई महानगर पालिकेच्या निवडणूका लागल्याचा अंदाज आहे. तत्पूर्वी लोकसंख्येनुसार मुंबई महानगर पालिकेत प्रभाग रचना करण्यासंदर्भात राज्य सरकारने आदेश दिले आहेत. राज्यातील ९ महानगर पालिकांच्या निवडणूका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यात ज्या ठिकाणी महापालिका निवडणुका घेण्यात येणार आहेत त्या ठिकाणी आता प्रभाग रचनेचे आदेश दिलेले आहेत. त्यामध्ये प्रभागांची रचना कशी करायची आणि लोकसंख्येचे काय निकष ठरवायचे याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश दिले आहेत.

**जुन्याच प्रभागानुसार निवडणुका**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका तात्काळ घेण्याचे आदेश जारी झाले आहेत. राज्यातील ९ महानगर पालिकांच्या निवडणूका होत आहे. महापालिकांची प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी करण्यात आल्यानंतर मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार असल्याचे स्पष्ट झालं आहे.

त्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये २२७ एक सदस्यीय प्रभाग रचना करण्यात येणार आहे. तर पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवीमुंबई, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर, यासह इतर सर्व महापालिकांमध्ये चार सदस्यांचे प्रभाग असणार आहेत.

मुंबईमध्ये आधीही २२७ प्रभाग होते. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन २३६ प्रभाग करण्यात आले होते. पुन्हा महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर २२७ प्रभाग करण्यात आले. त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. परतू ती याचिका फेटाळण्यात आली. त्यामुळे मुंबईमध्ये आता २२७ प्रभाग असणार आहेत.

महानगर पालिकांच्या निवडणूक प्रक्रीयेमध्ये

१) प्रभाग रचना करणे आणि आरक्षण ठरविणे

२) विधानसभा मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करणे,

३) प्रत्यक्षनिवडणूक घेणे अशा तीन प्रमुख टप्प्यांचा समावेश होतो. या तिनही टप्प्यांच्या प्रक्रियेमध्ये उप-टप्पे देखील आहेत.

**या महानगरपालीकांसाठी चार सदस्यीय प्रभाग**

अ, ब आणि क वर्ग महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक चार सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभाग रचना करण्याबाबतचे आदेश जारी झाले आहेत.

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, दिनांक ११.०३.२०२२, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ५ मधील तरतुदीनुसार निवडणुकीकरिता प्रभाग रचना शासनाने, राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने करावयाची आहे.

खालील अ, ब आणि क वर्ग महानगरपालिकांच्या बाबतीत प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करण्याच्या अनुषंगाने सदस्य संख्या निश्चित करुन प्रभाग रचनेचे प्रारुप तयार करणे ही जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची असणार आहे.

अ वर्ग महानगर पालिकेत मुंबईसह पुणे, नागपूर शहराचा तर ब वर्ग महानगर पालिकेत ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवडचा आणि क वर्ग महानगर पालिकेत नवी मुंबई, वसई-विरार, छ. संभाजी नगर, कल्याण-डोंबिवली यांचा समावेश आहे.

## कारवाया वाचवण्यासाठी अजितदादा सत्तेत...



**मुंबई :** अजित पवारांची आंदोलनवरची भूमिका ही लोकशाहीला छेद देणारी आहे. विरोधी पक्षाने आंदोलने केली नाहीत, तर सत्ताधारी माजतील, अशा शब्दांत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अजित पवारांवर निशाणा साधला. स्वतःवरील कारवाया वाचवण्यासाठी दादा सत्तेत गेले, अशी टीकाही संजय राऊतांनी केली आहे. पालिका निवडणुकांसाठी सर्व तयारी केली असल्याची माहिती त्यांनी दिली. निवडणुका कशा लढवायच्या यासंदर्भात स्थानिक नेत्यांवर निर्णय सोपवण्यात आल्याचेही ते म्हणाले.

संजय राऊत म्हणाले की, अजित पवार यांनी आंदोलनावर जी भूमिका मांडली, ती लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे जे स्थान आहे, त्याला छेद देणारी आहे. विरोधी पक्षाने आंदोलने जर केली नाहीत, तर सत्ताधारी माजतील. राज्य-देश लुटतील. महानगरपालिका, जिल्हा परिषदा यांच्यावर डाके टाकतील. जनतेच्या प्रश्नांना कुणी वाचा फोडणार नाही. शरद पवारांनी त्यांचा जो पक्ष उभा केला, ते आंदोलनातून उभा केला. शिवसेनेसारखा पक्ष हे एक आंदोलन आहे. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन झाले नसते किंवा अशी अनेक आंदोलने आम्ही केली नसती, तर आज अजित पवार उपमुख्यमंत्री किंवा पुढारी झाले नसते, असा टोलाही संजय राऊत यांनी लगावला.

सत्तेत राहुन लोकांची कामे एकेकाळी करत येत होती. पण आजकाल सत्ता तिजोरी लुटायलाच वापरली जाते. यावर अजित पवारांइतके दुसरे कोणीही भाष्य करू शकणार नाही. गेल्या दहा वर्षांत भाजप आणि त्यांच्यासोबतच्या लोकांनी सत्तेत राहून सर्व क्षेत्रांत असा एकही विभाग नाही की, जिथे लुटमार केली नाही. जनतेचे कोणते प्रश्न मार्गी लावले, हे नरेंद्र मोदींना विचारा, सत्तेत राहून ज्यांनी मागील काही काळामध्ये प्रचंड लुटमार केली, त्यांच्या चौकशा सुरू झाल्यानंतर ते पुन्हा सत्तेत गेले. जनतेची सेवा करायला गेले, असे कुणी म्हणत असेल, तर ते ढोंग आहे. सत्तेत ते यासाठी गेले की, त्यांना स्वतःची कातडी, स्वतः वरील कारवाया वाचवायच्या होत्या, अशा शब्दात संजय राऊत यांनी टोला लगावला.

## बाबा सिद्दीकी हत्या प्रकरण झीशानला भारतात आणणार

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील मुख्य सुत्रधार झीशान अख्तर उर्फ जस्सी पुरेवाल याला कॅनडा पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत पोलिस दलातील सूत्रांनी





याची पुष्टी केली आहे. झीशान सध्या कॅनडा पोलिसांच्या ताब्यात असल्याची आपल्याकडे ठोस माहिती असल्याचे मुंबई पोलिसांचे म्हणणे आहे. मुंबई पोलिस आता झीशान अख्तरचे प्रत्यार्पण करुन त्याला भारतात आणण्याची प्रक्रिया सुरु करु शकतात. झिशान अख्तरने देश सोडून गेल्याचा दावा केला होता. त्यानंतर आता त्याला कॅनडातील सरे पोलिसांनी अटक केली आहे. त्याला भारतात आणणार असल्याची चर्चा असली तरी पोलीस विभागाकडून अद्याप याची पुष्टी झाली नाही.

## बीएमसीसाठी ठाकरेंची रणनिती



**मुंबई :** राज्यात पुढील तीन-चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिकेच्या निवडणुका जाहीर होऊ शकतात. या पार्श्वभूमीवर प्रभाग रचनेचे आदेश नगरविकास विभागाने जारी केले. हे आदेश आल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने मुंबई महानगरपालिकेसाठी कंबर कसली आहे. उद्धव ठाकरे गटाने विशेष रणनिती आखली असून मुंबईतील उपनेत्यांवर विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पक्षाने १२ उपनेत्यांवर विधानसभा निहाय जबाबदारी देण्यात आली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा अद्याप झाली नसली, तरी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आतापासूनच मैदानात उतरण्याची तयारी सुरू केली आहे. मातोश्रीवर झालेल्या बैठकीत ठाकरे गटाकडून मुंबई महानगर पालिकेच्या पार्श्वभूमीवर उपनेत्यांवर विधानसभानिहाय जबाबदारीचे वाटप करण्यात आले आहे. मतदार संघात जाऊन आढावा बैठका, माजी नगरसेवक, शाखा प्रमुख इतर पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे.

## शरद पवारांकडून बच्चू कडूंशी फोन द्वारे विस्तृत चर्चा





■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
माजी मंत्री तथा प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू हे अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन करत आहेत.

शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला यांच्या वेगवेगळ्या मागण्यांना घेऊन ते आंदोलनाला बसले आहेत. काहीही झालं तरी मी अन्नाचा एकही कण घेणार नाही, असं बच्चू कडू यांनी जाहीर केलं आहे.

अशातच आता राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बच्चू कडू यांनी फोन केला असल्याची माहिती समोर आली आहे.

शरद पवार यांनी आज आंदोलनाला बसलेल्या बच्चू कडू यांना फोन करत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच आंदोलनाबाबत माहिती विचारली. यावेळी बच्चू कडू यांनी सांगितले की, कलेक्टर आणि एसपी भेटायला आले होते, तसेच पालकमंत्र्यांशी बोलणं झालं आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत मीटिंग आयोजित करुन देऊ अशी माहिती दिली आहे.

मात्र मी मीटिंगच्या बदल्यात उपोषण मागे घेणार नाही. आम्हाला भेट नको, निर्णय हवा आहे. यानंतर बच्चू कडू यांनी तुमच्याकडून उद्या आंदोलनाची माहिती घेण्यासाठी आलं तर बरं होईल असं म्हटलं.

बच्चू कडू यांनी पुकारलेल्या आंदोलनामुळे त्यांची प्रकृती खालावत आहे. या आंदोलनामुळे त्यांचे वजन दोन किलोंनी घटले आहे. तसेच बच्चू कडू यांचा बीपीही लो झाला आहे. त्यांनी तत्काळ औषधं घ्यावीत, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. मात्र कडू यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. त्यामुळे त्यांना अशक्तपणा जाणवत आहे.

## राज्यात पुन्हा आठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
राज्यातील प्रशासकीय विभागातील खांदेपालट सुरूच असून आज आणखी आठ आएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

कौशल्य विकास, पणन मंडळ आणि इतर विभागांना नवे प्रमुख मिळाले आहेत. यामध्ये वरिष्ठ आयएएस अधिकारी नितीन पाटील यांची राज्याच्या कापूस उत्पादक विपणन महासंघाच्या व्यवस्थापक पदी बदली करण्यात आली आहे.

आप्पासाहेब धुळाज यांच्याकडे राज्याच्या ओबीसी बहुजन कल्याण विभागाच्या सचिवपदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. तर मिन्नू पी एम आणि मानसी यांच्याकडे नवीन जबाबदारी देण्यात आली आहे.

नितीन पाटील आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, नवी मुंबई यांना महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

ए.बी. धुळाज व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई यांना सचिव, ओबीसी बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

लहू माळी व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबई यांना आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता, नवी मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

बाबासाहेब बेलदार अतिरिक्त विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर विभाग यांना महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

मुरुगनंथम एम. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

आदित्य जीवने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांची सहव्यवस्थापकीय संचालक, महाडिसकॉम, छत्रपती संभाजी नगर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मिन्नू पी.एम. सहायक जिल्हाधिकारी, भातकुली-तिवसा उपविभाग, अमरावती यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मानसी सहाय्यक जिल्हाधिकारी, देसाईगंज उपविभाग, गडचिरोली यांना महापालिकेच्या आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आल्याचे आदेशात दिसून येते.

## शिरसाटांची नाराजी अन् बावनकुळेंची भेट



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
मुख्यमंत्री माझी लाकडी बहिण योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवण्याच्या कारणावरून मंत्री संजय शिरसाट नाराज असल्याची चर्चा सुरू होती.

या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शिरसाट यांच्या मुंबईतील घरी जाऊन त्यांची भेट घेतली. माझ्या मतदारसंघातील ड्रॅगन टेम्पलच्या विकास कामासंदर्भात ही भेट असल्याचे बावनकुळे यांनी नंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

विश्वविख्यात कामठी येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पल या बुद्धिस्ट स्थळाच्या विकास कामाच्या भूमिपूजन संदर्भात आपण चर्चा करण्यासाठी मंत्री संजय शिरसाट यांची भेट घेतली असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. हे काम तातडीने चालू करण्यासाठी माजी मंत्री सुलेखा कुंभारे आणि आम्ही शिरसाट यांची भेट घेतली असल्याचे त्यांनी सांगितले. या मंदिराची जागा आणि विकासाच्या संदर्भात काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करायची होती. त्यामुळे आम्ही शिरसाट यांच्या घरी आलो असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

मंत्री संजय शिरसाट हे देखील या ठिकाणी भेट देण्यासाठी येणार असून लवकरच ते काम सुरू होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लवकरच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासह संजय शिरसाट आणि इतर मंत्री मिळून या विकास कामाचे भूमिपूजन करणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

अजित पवार आणि आम्ही सर्व मंत्री बसून ज्या - ज्या विभागाचा जो निधी बाकी आहे, त्यावर चर्चा करणार असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. वास्तविक त्या- त्या मंत्र्यांना बोलवून अजित पवार नेहमीच चर्चा करत असतात. मागील वेळी देखील प्रत्येक मंत्र्यांशी चर्चा करून निधीचे वाटप केले होते. ही प्रक्रिया पारंपारिक चालू असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## पत्नीची हत्या करून पाकी नागरिकाची आत्महत्या

**नवी मुंबईत घडला थरार**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
नवी मुंबईतील एका पाकिस्तानी नागरिकाने घरगुती वादातून आपल्या पत्नीची चाकूने वार करून हत्या केली आणि नंतर स्वतःलाही संपवले. मृतांची ओळख पटली आहे. नोतनदास उर्फ संजय सचदेव (४५) आणि त्याची पत्नी सपना नोतनदास (३५) अशी त्यांची नावे असल्याचे पुढे आले आहे. दोघेही नोव्हेंबर २०२४ मध्ये भारतात आले होते आणि दीर्घकालीन व्हिसावर राहत होते.

पोलिस उपायुक्त (डीसीपी) प्रशांत मोहिते यांनी सांगितले की, 'सोमवारी जेव्हा सपनाची बहीण तिच्या फ्लॅटवर पोहोचली तेव्हा दोघेही रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. डॉक्टरांनी सपनाला जागीच मृत घोषित केले, तर नोतनदासचा रूग्णालयात मृत्यू झाला. चौकशीत असे दिसून आले की भांडणानंतर, नोतनदासने सपनावर स्वयंपाकघरातील चाकूने अनेक वार केले आणि नंतर स्वतःला जखमी केले. दोघेही गेल्या ६महिन्यांपासून त्यांच्या दोन मुलांसह या फ्लॅटमध्ये राहत होते.

पाकिस्तानी जोडप्याला दोन मुले आहेत. पती-पत्नीच्या मृत्यूनंतर मुलांना ताब्यात घेण्याबाबत मुंबई पोलिस गोंधळलेले आहेत. पोलिसांनी मुलांच्या भविष्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या देखभालीची व्यवस्था केली जात असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. त्यांच्या ताब्यात घेण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशीही चर्चा सुरू आहे. त्याचबरोबर जोडप्याच्या व्हिसा आणि ओळखीबाबतही चौकशी सुरू आहे.

## माजी आमदार जयवंतराव जगताप यांचा शिंदेसेनेत प्रवेश



■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. ११ :
करमाळा तालुक्याचे माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी राजकीय धक्कातंत्र वापरत मुंबई इथल्या मुक्तागिरी निवासस्थानी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी सांगोल्याचे माजी आमदार शहाजी (बापू) पाटील, शिवसेना वैद्यकीय कक्षाचे कक्ष प्रमुख आणि शिंदे यांचे विश्वासू सहकारी मंगेश चिवटे, शिवसेनेचे करमाळा माढा विभागाचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, सांगलीचे विठ्ठल पाटील, सिंदखेडराजा जि. बुलढाण्याचे माजी आमदार डॉ. शशिकांत खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी आमदार जगताप यांच्या शिवसेना प्रवेशामुळे सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.

## पत्नीपीडित पुरुषांनाही संरक्षण मिळावे!

औरंगाबादेतील वाळूंज भागातील पत्नीपीडित पुरुषांच्या आश्रमात काही पत्नीपीडित पुरुषांनी वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळपूजन करून पिंपळपौर्णिमा साजरी केली.

हे पुरुष दरवर्षी पिंपळपौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात.

हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.

काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगामध्ये पाठवले होते.

काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली.

अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. आताही काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथे एका तरुणाने याच कारणाने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचनात आली.

महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याचा अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे.

महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते.

पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

■ ■ ■

# पालखी मार्गावर परिवहन विभागाचा चित्ररथ

## रस्ते आणि वाहन सुरक्षेचे धडे देणार



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ११ :
सर्वांना आषाढी एकादशी निमित्ताने पंढरीच्या विठूरायाच्या दर्शनाचे वेध लागले आहेत. यात आता संत तुकारामाची पालखी येत्या १८ जूनपासून देहू येथून प्रस्थान करणार आहे.

या पालखीच्या मार्गावर आता राज्याच्या परिवहन विभागाच्या विविध योजनांची माहिती देणारा चित्ररथ फिरणार आहे. यामुळे राज्याच्या परिवहन विभागाच्या तसेच रस्ते सुरक्षा संदर्भात विविध माहितीद्वारे जनप्रबोधन करण्यात येणार आहे.

राज्याच्या परिवहन विभागाचा जनमानसात प्रचार आणि प्रसार करण्यासाठी परिवहन विभागाचा चित्ररथ यंदा तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गावर दिंडी सोबत मार्गक्रमण करणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या संदर्भात नियोजन आणि मार्गदर्शन करण्यासाठी मंत्री सरनाईक यांनी आज ११ जुन रोजी) पंढरपूरपर्यंत या पालखी मार्गाचा दौरा केला.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक पुढे म्हणाले, संत तुकाराम महाराजांची पालखी १८ जून रोजी देहू येथून प्रस्थान करणार आहे. १८ जून ते ५ जुलै दरम्यान संपूर्ण पालखी मार्गावर दिंडीसोबत परिवहन विभागाने तयार केलेल्या एलईडी स्क्रीन, पोस्टर , बॅनरच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती देणारा चित्ररथ सहभागी होणार आहे.

या पालखी मार्गावर विविध ठिकाणी सर्वसामान्य नागरिक आणि भक्तगण संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. त्यांना या चित्ररथाच्या माध्यमातून परिवहन योजनांची विशेषतः रस्ता सुरक्षा विषयक प्रशिक्षण आणि प्रबोधन, सुरक्षित वाहन चालवणे अशा विविध योजनांची माहिती देण्यासाठी, त्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी या अभिनव उपक्रमाची यंदापासून सुरुवात करण्यात येणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिली. यावेळी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# आफ्रिकेतील स्पर्धेत अमरावतीच्या १० धावकांचे यश

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ११ : जागतिक स्तरावर सर्वात आव्हानात्मक अशी 'अनलिमिटेड ह्युमन रेस' म्हणून ओळख असलेली सर्वात जुनी कॉम्रेड मॅरेथॉन आहे. या मॅरेथॉनचे १९२१ पासून आयोजन करण्यात येते. या वर्षी ९८ वी कॉम्रेड मॅरेथॉन दक्षिण आफ्रिकेत रविवार, ८ जून रोजी पीटरमॅरिट्सबर्ग येथे आयोजित केली होती. दक्षिण आफ्रिकेतील वेळे नुसार पहाटे ५.४५ व सकाळी ६ अशा दोन टप्प्यात कॉम्रेड मॅरेथॉन सिटी हॉल पीटरमॅरिट्सबर्ग येथून सुरू झाली. त्यानंतर डर्बन येथे सायंकाळी ५.४५ व ६ वाजता समाप्त झाली. जगभरातील २४ हजार धावक या स्पर्धेत सहभागी झाले होते. भारतातील ४०३ धावकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.



यात ४२ महिला व ३६१ पुरुष होते. अमरावतीचे ११ धावक स्पर्धेत सहभागी झाले. त्यापैकी १० स्पर्धकांनी ही मॅरेथॉन विहित वेळेच्या आधीच पूर्ण करून आपली चमक दाखवून दिली. अमरावती अर्ध मॅरेथॉनचे मुख्य आयोजक व प्रशिक्षक दिलीप पाटील यांनी कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये दहाव्यांदा भाग घेत ही शर्यत ११ तास २७ मिनिटांत पूर्ण केली. पोलिस कर्मचारी राजेश कोचे यांनी ९ तास ४५ मि. व पोलिस निरीक्षक सतीश उमरे यांनी ११ तास ४४ मि. वेळेत शर्यत पूर्ण केली. या दोघांनी सलग दुसऱ्यांदा ही मॅरेथॉन पूर्ण केली असून, त्यांना कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये सलग दोन पदके प्राप्त झाली आहेत. पहिल्यांदाच भाग घेणारे प्रसिद्ध डॉ. सागर धनोडकर यांनी ११ तास २१ मि., कृषी अधिकारी संजय पाटील यांनी ११ तास ३० मि., सहायक लेखापाल प्रणिता पाटील (निस्ताने) यांनी ११ तास ४४ मि., डॉ. ऋजुता फुके यांनी ११ तास ४७ मि., अनिल कांबळे यांनी ११ तास ४८ मि., शिक्षिका रितू तलमले यांनी ११ तास ५३ मि. तर लेखाधिकारी संजय अंबाडेकर यांनी १२ तासांत ही मॅरेथॉन पूर्ण केली. पाईनटाऊन, विन्स्टन पार्क, ड्रयुमॉंड, कॉटो रिज, अलमास रोड, मॅकोनडेनी असे ६ कटऑफ पूर्ण करणारा स्पर्धकच या फिनिश लाईनपर्यंत पोहोचू शकतो. या गोठवणाऱ्या थंडीत धावण्याची मजाच खूप वेगळी होती. या मॅरेथॉन दरम्यान ४३ ठिकाणी पाणी, एनर्जेल, संत्री, केळी, बटाटे, कोक या पेय व खाद्य पदार्थांची व्यवस्था केली होती. जयहिंद, झिंदाबाद, कमॉन इंडिया, चक दे इंडिया, नमस्ते इंडिया असा उल्लेख करून भारतीय धावपटूंचा आनंद द्विगुणित करण्यात येत होता.

५ महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणामुळेच शक्य या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ४२.२ किमी. अंतराची पूर्ण मॅरेथॉन शर्यत ४ तास ५० मिनिटांच्या आत पूर्ण करणे आवश्यक असते.

तसेच कॉम्रेड मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी शारीरिक क्षमतेसोबतच मानसिक शक्ती, इच्छाशक्ती सुद्धा प्रबळ असावी लागते. दिलीप पाटील यांनी अमरावतीमधील या ११ स्पर्धकांसह स्वतः ची तयारी जानेवारी २०२५ पासून सुरू केली होती. ५ महिन्यांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण केल्यामुळेच हे सर्व स्पर्धक यशस्वीपणे ही स्पर्धा पूर्ण करू शकले.

# कर्जामुळे शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगोली, दि. १० : वसमत तालुक्यातील महागाव येथे अल्पभूधारक शेतकऱ्याने ९४ हजार रुपये कर्जामुळे घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली . या प्रकरणी कुरुंदा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महागाव येथील नवनाथ जाधव (३५) यांना महागाव शिवारात दोन एकर शेत आहे. घरी पत्नी, तीन मुली असा परिवार असून त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह शेतीवरच सुरु होता. या शेतीवर नवनाथ यांनी भारतीय स्टेट बँकेकडून ९४ हजार रुपयांचे कर्ज घेतले होत. या शिवाय त्यांनी गृहकर्ज व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेकडूनही कर्ज घेतले होते.

दरम्यान, दोन एकर शेतात त्यांनी खरीप हंगामात सोयाबीन तर रब्बी हंगामात हरभरा व इतर पिके घेतली होती. मात्र अतिवृष्टीमुळे खरीप हंगामात लागवडीचा खर्च निघाला नाही तर रब्बी हंगामातही हिच परिस्थिती होती. त्यामुळे आता पिककर्ज कसे फेडावे तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चाललावा असा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला होता. या प्रकारामुळे ते मागील काही दिवसांपासून अस्वस्थ होते.

दरम्यान, त्यांची आई त्यांना झोपेतून उठविण्यासाठी आली असतांना नवनाथ यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला.

या घटनेची माहिती मिळताच कुरुंदा पोलिस ठाण्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक रामदास निरदोडे, जमादार भगीरथ सवंडकर, पोले यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी विमलबाई जाधव यांनी दिलेल्या माहितीवरून कुरुंदा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. जमादार सवंडकर पुढील तपास करीत आहेत.

# शाश्वत विकासासाठी पाणी नियोजन आवश्यक : कुलगुरू डॉ. शरद गडाख



**अकोला :** पाण्याचे योग्य नियोजन तसेच एकात्मिक शेती पद्धतीतून विदर्भातील कृषी क्षेत्राचा विकास होईल, असा विश्वास डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी व्यक्त केला. कुलगुरू डॉ. गडाख म्हणाले की, तांत्रिक पद्धतीने जलसंवर्धन केल्यास शेतीचे भविष्य तसेच ग्रामीण भागाचा विकास होईल. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक पाणी परिषदेत सहभागी झाल्याने त्यांच्या माध्यमातून जलसंवर्धन विषयावर अधिक काम होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व जनकल्याणकारी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय जल परिषदेच्या दुसऱ्या दिवशी वनामती सभागृहात 'विदर्भातील कृषी योग्य पाणी सद्यस्थिती समस्या व उपाययोजना' या विषयावर कृषी जल परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी त्यांनी विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, खान्देश, कोकण येथील सिंचनाची स्थिती शेतीची स्थिती आणि पर्जन्यमानाची स्थिती आकडेवारी देत समजावून सांगितली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे आगामी ६-७ वर्षांत खारपाण पट्टा समूळ नष्ट होऊन गोड पाणी उपलब्ध होत शेत जमीन सुपीक होईल, असा विश्वास आ. डॉ. संजय कुटे यांनी व्यक्त केला. बुलडाणा, अकोला, अमरावती हे तीन जिल्हे मुख्यत्वे खारपाण पट्ट्यात येतात. हा पट्टा शेकडो वर्षांपूर्वीचा असून भूस्तर रचनेमुळे असे घडत असल्याचे आमदार डॉ. कुटे यांनी पुढे सांगितले.

# सौभाग्यवतींकडून वटवृक्षाचे पूजन

■ महासागर प्रतिनिधी,
खोलापूर , दि. ११ : खोलापुरात व्रत करून वटपौर्णिमा साजरी सुवासिनींसाठी सर्वाधिक महत्त्वाचा असलेल्या सणांपैकी एक वटपौर्णिमा एक उत्सव आहे. ज्येष्ठ महिन्यात येणारी वटपौर्णिमा मंगळवारी दर्यापूर शहरात उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील महिलांनी पतीच्या दीर्घायुष्याची कामना करत विधिवत वटवृक्षाचे पूजन केले. दरम्यान साईनगर येथील हनुमान मंदिरासमोरच्या वडाजवळ पूजनासाठी महिलांची गर्दी उसळली होती. तर काही ठिकाणी कुंडीत वडाचे रोपटे लावूनही महिलांनी सण साजरा केला. वटसावित्री उत्सवादरम्यान वेगवेगळ्या परिसरातील पुरातन अशा वटवृक्षाचे पूजन महिलांकडून करण्यात आले. साईनगर येथे परिसरातील सर्व महिला एकत्रित येऊन त्यांनी सामूहिकरीत्या वटवृक्षाचे पूजन केले. तसेच वडाला फेऱ्या घालून सातजन्मी हाच पती मिळावा, तसेच उत्तम आरोग्य लाभावे. दीर्घायुष्य प्राप्त होवो. यासाठी मनोकामना व्यक्त करतात. या दिवशी महिला वट पौर्णिमेचे व्रत करतात. यावेळी उपस्थित महिलांनी एकमेकींना हळदी कुंकू देऊन उखाण्यातून पतीचे नाव घ्यायला सांगितले. त्याला महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला. या प्रसंगी प्रभा धांडे, नंदा यादव, वर्षा पाचडे, नंदिनी करोडदे, प्रांजली पुंडकर, संगीता वडाळे, चित्रा कावरे, सपना यादव, चित्रा धांडे, दीपाली उंबरकर, गौरी धांडे, राधा पाचडे, सोमवती गोडा आदींसह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. मांगल्याची आभूषणे, पारंपरिक वेशभूषा परिधान करून आलेल्या महिलांनी एकमेकींना शुभेच्छा दिल्यात.



वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे : वृक्ष हे मानवाचे मित्र असून, वृक्षांमुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबतो, झाडांमुळे पर्यावरण शुद्ध राहते. त्यामुळे सर्वांचे आरोग्य चांगले राहते. ही दूरदृष्टी ठेवून संयुक्तपणे आजच्या दिवशी वृक्ष लागवड करण्याचा वसा घ्यावा व पर्यावरण संगोपनासाठी प्रयत्न व्हावेत, असा संदेश वटसावित्री पौर्णिमेनिमित्त महिलांना देण्याची गरज आहे. झाडांची संख्या कमी झाल्याने वडाचे झाड शोधून त्याचे पूजन करण्याची वेळ शहरातील अनेक भागात आल्याचे महिलांनी सांगितले.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्याचा जागर

## ३०० मूर्ती, फोटोचे घरोघरी वाटप

■ महासागर प्रतिनिधी,
टाकरखेडा , दि. ११ : संभू पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा जागर घराघरात व्हावा. त्यांच्या विचारांचे दर्शन सर्वसामान्य जनतेला घडावे. या उद्देशाने धनगर विदर्भ युवक सेनेच्या वतीने विशेष उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील विविध कार्यालये आणि नागरिकांच्या घरांमध्ये एकूण ३०० पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मूर्ती व छायाचित्रांचे (फोटो) मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन विदर्भ धनगर युवक सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय गोहत्रे यांच्या मार्गदर्शनात संघटनेचे अध्यक्ष अक्षय गोहत्रे, महिला आघाडीच्या पल्लवी गोहत्रे, विजय कोल्हे, आरोही गावनेर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यातून समाजातील प्रत्येक घटकाने प्रेरणा घ्यावी, त्यांच्या धैर्य, दूरदृष्टी आणि समाजसेवेचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवावा. हाच या उपक्रमामागचा हेतू असल्याचे आयोजकांनी सांगितले. विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच विविध संघटनांना व मंडळांना देखील मूर्ती व छायाचित्राचे वाटप यावेळी करण्यात आले. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत अहिल्यादेवींच्या कार्यास अभिवादन केले. समाजहितासाठी राबवलेल्या या उपक्रमामुळे अहिल्यादेवींच्या कार्याची पुन्हा एकदा आठवण ताजी झाली आहे.

# कौंडण्यपूरनगरीत संत सद्गुरू सदाराम महाराज समाधी सोहळा



■ महासागर प्रतिनिधी,
कुऱ्हा, दि. ११ : कौंडण्यपुरातील विठ्ठल रुक्मिणी संस्थानमध्ये संत सद्गुरू सदाराम महाराज समाधी सोहळा साजरा करण्यात आला. आजवर सुरू असलेली महाराष्ट्रातील प्रथम पालखी व विदर्भातील एकमेव मानाची पालखी १५९४ मध्ये संत सद्गुरू सदाराम महाराज यांनी सुरू केली.

ज्यावेळी महाराज वृद्ध झाले. त्यावेळी स्वतः पांडुरंगाने त्यांना प्रत्यक्ष भेट दर्शन देऊन आता तुम्ही येऊ शकणार नाही, तर मी स्वतः कौंडण्यपूर येथे दीड दिवस मुक्कामी आपल्या भेटीसाठी येतो असे वचन दिले. ही आठवण म्हणून विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमा भेट दिल्या. त्या आजही संत सद्गुरू सदाराम महाराज यांच्या वंशजाकडे कारंजा येथे आहेत. तेव्हापासून आषाढी व कार्तिक प्रतिपदेला पांडुरंग कौंडण्यपूर येथे मुक्कामी असतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यादिवशी यात्रा असते व दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यात येतो.

संत सद्गुरू महाराजांनी ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला समाधी घेतली. तेव्हापासून हा उत्सव साजरा करण्यात येतो. दरम्यान तीर्थ स्थापन करण्यात आले व तिडके महाराज यांनी सदाराम महाराज यांच्या पोथीचे पारायण केले. त्यानंतर मंदिराचे अध्यक्ष नामदेव अमाळकर, सचिव सदानंद साधू, विश्वस्त अतुल ठाकरे यांनी समाधीचा अभिषेक केला.

या वेळी स्थानिक वारकरी यांचे भजन झाले. तिडके महाराज व स्थानिक वारकरी यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. अतुल ठाकरे यांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते. आरतीनंतर महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली.

# टाकळी येथे विकसित कृषी संकल्प अभियान

■ महासागर प्रतिनिधी,
मोताळा , दि. ११ : तालुक्यातील टाकळी येथे ९ जून रोजी विकसित कृषी संकल्प अभियान राबवण्यात आले आहे यामध्ये शेतकऱ्यांसाठी खरीप हंगाम मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तज्ञ - शास्त्रज्ञ यांनी खरीप हंगामाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. केंद्र सरकारने राबवलेला विकसित कृषी संकल्प अभियान खरीप हंगाम मार्गदर्शन कार्यक्रम टाकळी येथे ९ जून रोजी पार पडला यावेळी जळगाव जामोद येथील तज्ञ शास्त्रज्ञ एस.एम. उमाळे, डॉ. एन.पी. तळोकार तसेच डॉ. पंचभाई (माफसू नागपूर), डॉ. प्रभु (केंद्रीय कापूस संशोधन केंद्र मुंबई) यांनी गावात जाऊन खरीप हंगाम पूर्व तयारी बाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन, या महत्वाच्या पिकांविषयी माहिती दिली असून खतांचे संतुलीत व्यवस्थापन करणे, बीजप्रक्रिया करणे, हुमणी अळी नियंत्रण करणे, उगवण क्षमता चाचणी करणे, फळबाग लागवड करणे, पी एम



किसान विषयी तसेच कृषी विभागाच्या विविध योजना व मोहिमेची शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. सोबतच जनावरे संगोपन, दुधाळ जनावरे पालन व दुग्ध प्रक्रिया यावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला टाकळी येथील सरपंच, उपकृषी अधिकारी यदमाळ, सहाय्यक कृषी अधिकारी खुर्दे, आत्माचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक दिनेश चित्रंग यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. तालुक्यात ७ जून आणि ८ जून रोजी घुस्सर खुर्द, शेलापुर, तालखेड, डिडोळा खुर्द, चिंचपुर, बोराखेडी या गावांमध्ये हा उपक्रम राबवल्यानंतर ९ जून ते १२ जून दरम्यान टाकळी, वाघजाळ, रोहिणखेड, खरबडी, कोथळी, धामणगाव देशमुख, रामगाव, पिंपळगाव नाथ, चिंचखेड नाथ या गावांमध्ये हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

# बदलीसाठी दिव्यांग शिक्षकाचे जिल्हा परिषदेसमोर उपोषण



**अमरावती :** पंचायत समिती अंतर्गत उत्तमसरा येथे कार्यरत दिव्यांग शिक्षक उमेश बसरे यांनी सोमवारपासून जि. प.समोर बेमुदत उपोषण सुरु केले आहे. रिक्त जागा असताना व यापूर्वी शब्द दिलेला असतानाही जि.प. प्रशासनाने आपणास बदलीसाठी डावलले, असा त्यांचा आरोप आहे. बसरे यांच्यामते त्यांनी व एका कर्करोगग्रस्त शिक्षिकेने २०२२ मध्ये विशेष बाब म्हणून बदली मागितली होती. त्यावेळी जि. प.च्या गर्ल्स हायस्कुल (कॅम्प) येथे रिक्त जागा होती. परंतु माझा प्राधान्यक्रम डावलून संबंधित शिक्षिकेला तेथे पदस्थापना दिली. त्याविरोधात मी १२ सप्टेंबर २०२२ रोजी उपोषण सुरु केले होते. दरम्यान त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर रिक्त जागेवर तुम्हाला पदस्थापना देण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनानंतर मी माझे उपोषण आंदोलन मागे घेतले. शिक्षिका डिसेंबर २०२४ ला निवृत्त झाल्या. त्यानंतर मी त्या जागेची मागणी केली. परंतु तरीही माझ्या मागणीचा विचार झाला नाही. शिक्षण विभाग जाणीवपूर्वक माझ्या मागणीकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळेच मी उपोषणासारखा निर्णय घेतला आहे. मानसिक दबाव टाकत असल्याचा आरोप गर्ल्स हायस्कुल येथे इयत्ता ५ वी च्या संचमान्यतेनुसार २ पदे रिक्त असून पदस्थापना देण्यास शिक्षण विभाग टाळाटाळ करीत आहे. शिक्षणाधिकारी कार्यालयातून शिस्तभंगाची कार्यवाही करू, असा मानसिक दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोपही दिव्यांग शिक्षक उमेश बसरे यांनी केला आहे.

# मानवी कवटीसह शेतामध्ये आढळला हाडाचा सांगाडा

■ महासागर प्रतिनिधी,
दिग्रस, दि. १०: तालुक्यातील शेतशिवारात एक मानवी कवटी, हाडाचा विखुरलेला सांगाडा, मानवी पोषाख आणि चप्पल आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. ही घटना दिग्रस पासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या रामनगर जवळील दिग्रस शेतशिवारात उघडकीस आली. हे सर्व साहित्य पोलिसांनी ताब्यात घेवून मानवी हाडे नागपूर येथील फॉरेन्सीक लॅबमध्ये तपासणीसाठी पाठवले आहे. या प्रकरणी सविस्तर असे की, वीज वितरण कंपनीचे इलेक्ट्रिकचे साहित्य घेऊन जाणाऱ्या ऑटो चालक शेख कलीम शेख बशीर रा. चांद नगर दिग्रस हा रामनगर जवळील नवरे यांच्या शेतात झाडाखाली उभे राहण्यासाठी गेले होता. यावेळी त्याला त्या ठिकाणी हा विखुरलेल्या अवस्थेत मानवी



कवटी व हाडाचा सांगडा दिसला. त्याने या घटनेची माहिती दिग्रस पोलिसांना दिली. माहिती मिळताच दिग्रस पोलिसांचे पथक नवरे यांच्या शेतात रात्रीच दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी बॅटरीच्या उजेड पाडत पाहणी केली असता मानवी कवटी, हाडांची तुकडे, काळा पॅन्ट, पांढरे शर्ट, पांढरा शेला, चप्पल व पॅन्टच्या खिशात २० रुपयाच्या तिन नोटा असे साहित्य आढळले. हे सर्व साहित्य पोलिसांनी ताब्यात घेत हाडाची तपासणी करण्यासाठी काही हाडे दिग्रस ग्रामीण रूग्णालयात तर हाड व कवटी नागपूर फॉरेन्सिक प्रयोगशाळा येथे पाठवण्यात आले आहे. मृतकाची ओळख पटवणे सुरू पोलिस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी अनोळखी मृतकाच्या सांगडा व कवटी, कपडे, चप्पल यांचे वर्णन पत्रिका तयार करून प्रसिद्ध केले असून ओळख पटविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दिग्रस-मानोरा रस्त्याकडे जाणारे रामनगर गावाजवळील महामार्गापासून शंभर फूट अंतरावर असलेल्या टेकड्यावरील नवरे यांचे शेताच्या निंबाच्या खाली एक सांगाडा व संबंधित कपडे चप्पल, अंडरवियर, शर्ट, शेला, राऊंड ऑफ ची बॉटल, दारूची बॉटल, पाणी बॉटल इत्यादी मिळून आले आहे. मृतकाची ओळख पटवणे सुरू आहे. मिसिंग असलेले व्यक्ती यांच्या बाबत तपास करणे सुरू करण्यात आले आहे.

# दादासाहेब गवई यांच्या स्मारकाचे काम जलदगतीने करण्याचे निर्देश

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ११ : श्रोतृगृह विद्यापीठाला हस्तांतरित करणार सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अमूल्य योगदान येणारे रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे विद्यापीठानजीक होणारे स्मारक ही जनतेसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कार्याला समर्पित अशा स्मारकाच्या कामाला विविध यंत्रणांनी गती द्यावी, असे निर्देश देतानाच जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी संबंधित यंत्रणांकडून वेळापत्रक मागवले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल सभागृहात रा. सू. गवई यांच्या स्मारकाबाबत विविध यंत्रणांकडून त्यांनी आढावा घेतला. या वेळी सार्वजनिक बांधकाम, संगाबा अमरावती विद्यापीठ आणि महसूल विभागासह इतर कार्यालयांचे प्रमुख उपस्थित होते. आचार्य कमलताई गवई यांनाही बैठकीसाठी बोलावले होते. जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, दादासाहेबांचे स्मारक प्रामुख्याने तीन भागांत विभागले आहे. यात दादासाहेबांचा पुतळा, चित्रप्रदर्शन आणि श्रोतृगृह असेल. पुतळा उभारण्यासाठी मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टशी पाठपुरावा करून पुतळ्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रक्रिया जलद गतीने कराव्यात. यासोबतच गरजेनुसार असलेल्या परवानगी आणि ना



हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे. चित्र प्रदर्शनात लावण्यात येणाऱ्या छायाचित्रांची संख्या आणि त्यानुसार छायाचित्रांची निवड करावी. तसेच याठिकाणी दादासाहेबांचा जीवनपट दाखवणारी भिंत तयार करण्याचे नियोजन करावे. यासाठी आवश्यक प्रसंगांची निवड समितीच्या मान्यतेने घ्यावी. किऑस्क, व्हिडिओ यासह एआयच्या आधारे दादासाहेबांनी केलेली भाषणे याबाबत कार्य करताना समितीचा सल्ला घ्यावा, असेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले. दरम्यान स्मारक पूर्णत्वास जाण्यासाठी प्रत्येक आठवड्यात याबाबत बैठक घेतली जाणार आहे. त्यामुळे स्मारकाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रत्येक यंत्रणेने वेळापत्रक तयार करावे, यातून अप्रतिम स्मारक उभे राहावे, यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले आहे. बैठकीला महसूलचे उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, साबांविचे कार्यकारी अभियंता गिरी, दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव प्राचार्य कमलाकर पायस आदी यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.



# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन साजरा

**अमरावती :** चिखलदरा येथील सिदोकान्हू मुर्मू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ३५१ वा शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. या वेळी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व विभागाच्या अप्पर सचिव मनीषा वर्मा यांचा शिवरायांच्या जीवनावर आधारित प्रेरणादायी संदेश प्रशिक्षणार्थी यांना या वेळी ऐकवण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्था व्यवस्थापन समिती सदस्य श्रीवर्धन करंडे, सदस्य, सामाजिक कार्यकर्ते साबुलाल दहिकर, विकास पंचबुद्धे, कर संकलन अधिकारी इंगळे, अनिल दांडगे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे प्र. प्राचार्य डी. ओ. देशमुख होते. प्रमुख वक्ते म्हणून हेमंत डोंगरे यांनी कुटुंब प्रबोधन, संदीप कर्हालकर यांनी पर्यावरण संरक्षण, साबुलाल दहीकर यांनी स्वदेशी विचाराचा प्रचार या विषयावर प्रबोधन केले.

# मेक इन इंडियाचा डिफेन्समध्ये धमाका

गेल्या ११ वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रात मोठा बदल दिसून आला. भारताची संरक्षण नीती केवळ सुरक्षे इतपत मर्यादित नाहीत. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता, नवकल्पना, जागतिक स्पर्धेत भारताने सशक्त पाऊल टाकले आहे. भारतीय संरक्षण क्षेत्राकडे जग नव्या दृष्टिकोनातून पाहात आहे. केंद्र सरकारची रणनीती, मजबूत इच्छाशक्ती आणि भविष्यासाठीचे धोरण यासाठी कारणीभूत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण क्षेत्रातील उत्पादनात आधुनिकीकरण आणि आत्मनिर्भरतेला अधिक महत्त्व दिले आहे.

---



भारताच्या संरक्षण अर्थसंकल्पात मोठी वाढ झाली आहे. २०१३-१४ मध्ये हे बजेट २.५३ लाख कोटी होते. ते २०२५-२६ या वर्षात वाढून ६.८१ लाख कोटी रुपये इतके झाले. हा केवळ एक आकडा नाही. तर भारताची सुरक्षा, तांत्रिक प्रगती आणि आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने मोठे पाऊल आहे.

भारताने संरक्षण उत्पादनात मोठी झेप घेतली आहे. २०२३-२४ मध्ये देशाने १.२७ लाख कोटी रुपयांचे संरक्षण उत्पादन केले होते. तर २०१४-१५ मध्ये ४६,४२९ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. म्हणजे या काळात १७४% हून अधिकचा खर्च वाढला आहे.

**स्थानिक उद्योगांचा मोठा वाटा**

संरक्षण क्षेत्रात आता खासगी कंपन्या आणि स्टार्टअप्स पण मोठी भूमिका निभावत आहेत. संरक्षण उत्पादनात स्वदेशीचा नारा उपयोगी ठरला आहे. त्यामुळे विविध उपकरणांचे उत्पादन वाढणार आहे. संरक्षण मंत्रालयाने २०२४-२५ मध्ये २.०९ लाख कोटींचे १९३ संरक्षण करार केले होते. त्यातील १७७ करार हे स्थानिक उद्योग आणि स्टार्टअप्सला मिळाले आहेत. हा एक विक्रमच म्हणावा लागेल.

**औद्योगिक कॉरिडॉरमध्ये वाढली गुंतवणूक**

उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये संरक्षण औद्योगिक कॉरिडॉरमध्ये बदल होत आहे. आतापर्यंत इंडस्ट्रीयल कॉरिडोरमध्ये ८,६५८ कोटींहून अधिकची गुंतवणूक झाली आहे. २५३ पेक्षा अधिक टक्के वर स्वाक्षरी झाली आहे. येत्या काळात ही गुंतवणूक ५३,४३९ कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

सरकारने आतापर्यंत ५ सकारात्मक स्वदेशी विषय सूची तयार केल्या आहेत. यामध्ये ५५०० अधिक वस्तूंचा समावेश आहे. यामध्ये ३००० हून अधिक संरक्षण उत्पादनं ही आता स्वदेशी आहेत. यामध्ये दारुगोळा, गन, असॉल्ट रायफल, हलके लढाऊ विमानं, रडार आणि चिलखती वाहनांसारख्या तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक प्रणालींचा समावेश आहे.

**संरक्षण निर्यातीत विक्रमी झेप**

देशातील संरक्षण क्षेत्र केवळ उत्पादनापुरतं मर्यादित राहिलेलं नाही, तर संशोधन, नवकल्पना आणि जागतिक निर्यातीच्या दिशेनं सुसंगत वाटचाल सुरु आहे. यामध्ये iDEX सारख्या नवाचारी उपक्रमांनी आणि सरकारच्या दृढ धोरणांनी क्रांती घडवली आहे.

त्यासाठी आतापर्यंत ४३० हून अधिक iDE करार करण्यात आले आहेत. भारताने संरक्षण क्षेत्रात नव प्रणाली, तंत्रज्ञानाच्या वापरासाठी २०१८ मध्ये iDE (इनोवेशन फॉर डिफेन्स एक्सिलेंस) ची सुरुवात केली होती. संरक्षण दलाने या प्रणालीशी संबंधित २,४०० कोटींहून अधिक खरेदी केली आहे. त्यासाठी २०२५-२६ या वर्षात ४४९.६२ कोटींचे बजेट निश्चित करण्यात आले आहेत.

**निर्यातीत नवीन विक्रम**

भारताच्या संरक्षण क्षेत्राने मोठी कात टाकली आहे. २०१३-१४ मध्ये ६८६ कोटींची निर्यात झाली होती. त्या तुलनेत २०२४-२५ मध्ये २३,६२२ कोटींची निर्यात वाढ दिसून आली. म्हणजे दहा वर्षांहून अधिकच्या काळात संरक्षण क्षेत्रातील निर्यात ३४ पट वाढली आहे. २०२९ वर्षापर्यंत ही निर्यात ५०,००० कोटींवर पोहचेल.

एकूणच काय तर संरक्षण क्षेत्रात गेल्या ११ वर्षात भारताने उत्तुंग भरारी घेतल्याचे दिसून येते.

■ ■ ■

# कामगार लढ्याचा इतिहास

नारायण मेघाजी लोखंडे यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला, मागणी रेटून धरली, दि.९ जून १८९० रोजी ती मंजूर करून घेतली आणि दि.१० जून १८९० पासून रविवार हा साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली. जी आजपर्यंत चालू आहे. गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळवी. दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी. या मागण्या मान्य करून घेतल्या.

---

रविवार हा आठवड्यातील एक वार आहे. सोमवारपासून मोजला तर हा आठवड्यातील शेवटचा, म्हणजे सातवा दिवस येतो. भारतात हा वार रवीचा म्हणजेच सूर्याचा दिवस समजला जातो. त्यामुळे याला आदित्यवार (आदित्य=सूर्य) किंवा बोली भाषेत आइतवार म्हटले जाते आणि इंग्रजीत संडे. ज्या ज्या देशावर कधी काळी ब्रिटिश सत्ता होती, त्या त्या देशात रविवार हा सुट्टीचा दिवस असतो. शिक्षणसंस्था, कार्यालये आणि बँका या दिवशी बंद असतात.



एके काळी भारतात कामगारांना रविवारची सुट्टी नसे. नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत १८८४ मध्ये बॉंबे मिल हँड्स ही भारतातली पहिली कामगार संघटना स्थापन केली. त्यांनी त्या काळच्या फॅक्टरी कमिशनकडे अनेक मागण्या केल्या. त्यातली रोजच्या कामातली अर्ध्या तासाची जेवणाची सुटी आणि रविवारची साप्ताहिक सुट्टी या दोन महत्त्वाच्या मागण्या होत्या. त्यासाठी २४ एप्रिल १८९० रोजी हजारो कामगारांचा मोर्चा निघाला होता.

अखेर ९ जून १८९० रोजी प्रस्तावाला मंजुरी देवून १० जून १८९० पासून दर रविवारची सुट्टी देण्याचे गिरणी मालकांनी सुरू केले. २०१५ साली १० जूनला या रविवारच्या सुट्टीचा १२५ वा वर्धापन दिन साजरा झाला. पुण्यात रविवार हा मिसळवार म्हणून ओळखला जातो.

पाश्चात्त्य कल्पनेप्रमाणे आठवड्याचा पहिला वार परंतु व्यावहारिकदृष्ट्या शेवटचा वार. या वाराचे नाव बहुतेक सर्व देशांत सूर्यवाचकच आहे. भारतीय ज्योतिषशास्त्रीय कल्पनेनुसार या दिवशीच्या सूर्योदयापासून पहिल्या होऱ्याचा अधिपती सूर्य असतो. जगात सर्व ठिकाणी सूर्याला देवता मानतात.

जैन धर्मात नऊ वर्षे केले जाणारे एक व्रत आपादमासाच्या शेवटच्या रविवारपासून पुढे ९ रविवार चालते. मुसलमान बांधव दर चांद्रमासातील पहिल्या रविवारी मंत्र-तंत्र करतात. काही ख्रिस्ती पंथ रविवार हा प्रभूच्या प्रार्थनेचा व विश्रांतीचा दिवस म्हणून पाळतात. येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा साप्ताहिक स्मृतिदिन म्हणून सर्वच ख्रिस्ती लोक रविवार हा प्रार्थनेचा दिवस पाळतात.

कॉन्स्टंटाइन या सम्राटांनी आज्ञापत्र काढून रविवार हा सुट्टीचा दिवस ठरविला. ईस्टरच्या अलीकडच्या रविवार पामसंडे म्हणून प्रसिद्ध आहे. ख्रिस्तांचा जेरूसलेममध्ये विजयी प्रवेश झाला, तेव्हा त्यांच्या मार्गावर पामवृक्षाच्या फांद्या पसरल्या होत्या. म्हणून याला पामसंडे म्हणतात. रविवार विशेष शुभ मानला जात नसल्याने कोणताही उपक्रम या दिवशी सुरू करीत नाहीत. मात्र या दिवशी इष्टदेव दूर करणारी यंत्रे वापरून उपचार करण्यास हरकत नसते, असे मानतात.

रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे (१८४८-१८९७) हे भारतातील कामगार संघटना चळवळीचे जनक होते. १९ व्या शतकात कापड गिरणीच्या कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठीच नव्हे तर जातीय आणि सांप्रदायिक मुद्द्यांवर त्यांनी केलेल्या धाडसी पुढाकारासाठीही त्यांची आठवण ठेवली जाते.

याशिवाय सन १८९५ मध्ये हिंदू-मुस्लिमांदरम्यान झालेल्या दंगलीत केलेल्या कामाबद्दल त्यांना रावबहादूर ही पदवीही देण्यात आली होती.

तत्कालीन ब्रिटिश भारत सरकारने त्यांना जस्टिस ऑफ पीस हा सन्मान देऊन सन्मानित केले होते. भारत सरकारने २००५ मध्ये त्यांच्या छायाचित्रासह एक टपाल तिकीट जारी केले.

नारायण मेघाजी लोखंडे हे महात्मा जोतिराव फुले यांचे प्रमुख सहकारी होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील कण्हेरसर येथील माळी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण हायस्कूलपर्यंत झाले होते. त्यांच्या पत्नीचे नाव गोपिकाबाई होते. गोपीनाथ नावाचा त्यांना एक मुलगा होता.

१८७४ मध्ये माहिती मिळाल्यानंतर ते सत्यशोधक चळवळीचे सदस्य झाले. सन १८८० पासून त्यांनी मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या दीनबंधूचे व्यवस्थापन हाती घेतले. सुरुवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यावर त्यांना मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली.

तेथे त्यांना दहशतीच्या वातावरणात दिवसातून १३-१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार आढळले; त्यांना आठवड्याची सुट्टीही मिळत नसे; परिणामी लोखंडे यांनी नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले.

त्याकरिता ते कामगार वस्तीतच राहू लागले. त्यांनी भारतातील पहिली कामगार संघटना बॉम्बे मिलहँड्स असोसिएशन २३ सप्टेंबर १८८४ रोजी स्थापन केली आणि समाजसेवेत स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले.

नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतातील ट्रेड युनियन चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांच्यासह महात्मा फुले यांनी मुंबईतील कापड कामगारांच्या सभांनाही संबोधित केले.

त्यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला आणि ९ व १० जून १८९० पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली जी आजपर्यंत चालू आहे. एन.एम.लोखंडे यांच्यामुळे गिरणी कामगारांना मिळालेले काही हक्क हे होते.

गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळवी.

दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी.

मिलच्या कामाला सकाळी साडेसहा वाजल्यापासून सुरुवात करावी आणि सूर्यास्तानंतर बंद करावी.

कामगारांचे पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत करावेत.

ब्रिटिश राजवटीने त्यांना रावबहादूर ही पदवी बहाल केली होती. त्यांनी मुंबई कामगार संघ स्थापन केला. कष्टकरी वर्गाने एकजुटीने अन्यायाचा कडाडून प्रतिकार केला पाहिजे, अशी सशक्त प्रेरणा ते आज ठरले आहेत.

फुले व त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर आणि लोखंडे यांनी शेतकरी आणि कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न कोणत्याही संघटनेने केला नाही, हे विशेष!



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली,**
**९४२३७१४८८३**

■ ■ ■

# मुलगी श्रीमंत घरी खरंच सुखी राहील का?

आजकाल प्रत्येक आई वडिलांना वाटते की, आपली मुलगी श्रीमंत घरातील श्रीमंत मुलाला द्यावी. म्हणजे श्रीमंत घरी आपली मुलगी चैन विलासात राहील. तिला कोणत्याच गोष्टीची कमतरता भासणार नाही. तिला सर्व भौतिक सुख-सुविधा जाग्यावर उपलब्ध होतील.

ती ऐश्वर्यसंपन्न व राणीसारखे जीवन जगेल. सर्व भौतिक सुख-सुविधा तिच्या पायावर लोळण घेतील. समाजात व गावात आपली प्रतिष्ठा वाढेल. भावकीत व गावकीत मोठ्या अभिमानाने सांगता येईल की, माझी मुलगी खूप मोठ्या घरी दिली आहे. तिच्या घरी अमाप पैसा व संपत्ती आहे. अलिशान गाडी व अलिशान बंगला आहे.तिच्या घरात नोकर चाकर आहेत. तिच्या घरी कोणतीच व कशाचीच कमी नाही. असे नातेवाईकांना व भावकीला ठणकावून सांगण्यासाठी आणि आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढावी म्हणून प्रत्येक आई वडील आपल्या मुलींना श्रीमंत घरी देण्याचे स्वप्न पाहत आहेत.

पण त्यासाठी तो मुलगा दारुडा व व्यसनी आहे का? आपल्या मुलीला खरंच सुखी ठेवेल का? का दारू पिऊन आपल्या मुलीला रोजच त्रास देईल? या गोष्टींचा विचार करणे हे प्रत्येक आई-वडिलांचे परम कर्तव्य आहे. केवळ मुलगा श्रीमंत आहे म्हणून कोणताही मागचा पुढचा विचार न करता मुलीला त्या घरी देणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेण्यासारखे आहे.

पण आजकाल तेवढा विचार कोण करतोय? केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या मुलीला मनपसंत श्रीमंत स्थळ बघतोय. आणि आपल्या मुलीचे लग्न एकदाचे उरकून टाकतोय. म्हणूनच आजकाल समाजात व गावात आपल्या मुलीला श्रीमंत घरी देण्याची प्रत्येक आई-वडिलांची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. त्यासाठी मुलींचे बिचारे आई-वडील दिवसभर शेतात जीवाचे रान करतात. वीट भट्टीची किंवा ऊसाची उचल घेऊन पैसा गोळा करतात, नसेल तर सावकाराचे कर्ज काढतात आणि ऐपत नसताना देखील केवळ सामाजिक प्रतिष्ठेसाठी मुलाला मागणी हुंडा देऊन आपल्या मुलीला मोठ्या घरी देतात.

सोनं नाणं देऊन मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करतात. लग्न राजेशाही थाटात लावून देतात. लग्नाला गाव जेवण देतात. सर्व पाहुणे रावळे बोलावतात. आणि आपली व आपल्या मुलीची एकदाची हौस पूर्ण करतात. मुलगी नवऱ्या घरी नांदायला जाते. एक-दोन महिने नवरा व सासू-सासरे तिला चांगली वागणूक देतात. पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळतात. तिला खूप खूप जीव लावतात.

तिकडे मुलीचे आई-वडील मात्र आता आपली मुलगी सुखाने व आनंदाने नांदत आहे म्हणून समाधानी असतात. त्या दोघांचा संसार सुखाने चालत असतो. पण त्यांच्या सुखी संसाराला कोणाची कुदृष्ट व कशी नजर लागते हे कळायला मार्ग नसतो. त्या मुलीचा नवरा दारुडा व व्यसनी निघतो. तिथूनच मुलीचा मानसिक व शारीरिक छळ सुरू होतो. तिच्या बावनकशी चारित्र्यावर संशय घेतला जातो. तिला नाहक नावे ठेवून बदनाम केले जाते. नवरा रोज दारू पिऊन येतो आणि तिला मारहाण करतो. तिला घाण घाण शिव्या देऊन तिच्या भावना दुखावतो. तुझ्या आई-वडिलांनी मला लग्नात काय दिले? तुझ्या आई वडिलांनी मला लग्नात खूप कमी हुंडा दिलाय. आता आणखीन हुंडारूपी म्हणून काहीतरी पैसे किंवा गाडी घेऊन द्यायला सांग. नाहीतर तू आमच्या घरातून निघून जा आणि तुझ्या आई-वडिलांकडेच जाऊन रहा. इकडे आमच्याकडे येऊ नकोस. अशा मागणीचा तगादा मुलीकडे लावतात, छळ करून तिला घरातून बाहेर काढतात आणि माहेरचा रस्ता दाखवतात.

ती बिचारी मुलगी मात्र आपल्या आई-वडिलांकडे जाते. आणि त्यांना सर्व हकीकत सांगते. तेव्हा आई-वडिलांना हे ऐकून खूप खूप दुःख वाटते. मुलीच्या आई वडिलांच्या मनात तर वेगळ्याच अपेक्षा राहतात. पण इथे तर वेगळेच काहीतरी होऊन जाते. त्यांच्या पायाखालची जमीन सरकते. त्यांना आभाळ फाटल्यासारखे होते. एवढे अतोनात दुःख त्यांना होते. आणि मग ते पश्चातापात पडतात. स्वतःला दोष देत बसतात.

आता आपल्याला समाज काय म्हणेल? भावकी व नातेवाईक काय म्हणतील? या विचारांनी ते हतबल होतात. हे प्रकार सध्या सर्वत्र सुरू आहेत. नुकतेच घडलेले वैष्णवी हगवणे प्रकरण सध्या महाराष्ट्रात गाजत आहे. हे आपल्याला माहित आहे. वैष्णवी हगवणे हिला तिच्या आई-वडिलांनी मागेल तितका हुंडा देऊन तिला श्रीमंत घरी दिले होते. पण श्रीमंत घरी तिच्यावर तिच्या नवऱ्याने व सासू-सासऱ्याने कसा अमानुषपणे मानसिक व शारीरिक छळ केला. हे आपण जाणून आहोत.

आई-वडिलांना चांदीचे भांडे घेऊन द्यायला सांग म्हणून तिच्यावर वारंवार अमानुषपणे अत्याचार केला जात होता. नाहक तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला बदनाम केले जात होते. या रोजच्या शारीरिक व मानसिक छळाला कंटाळून तिने आपली जीवनयात्रा संपवली. ही महाराष्ट्राला हादरवून टाकणारी घटना आहे. याचा प्रत्येक आई-वडिलांनी जरूर विचार करावा.

मुलगी श्रीमंत घरी दिल्यावरच सुखी राहते हा आई-वडिलांचा गैरसमज आहे. हा गैरसमज प्रत्येक आई-वडिलांनी मनातून काढून टाकावा. आपली मुलगी श्रीमंत घरी द्या किंवा गरीब घरी द्या याला माझा विरोध नाही. पण मुलगी केवळ श्रीमंत घरीच सुखी राहील हे मीच काय? कोणीही सांगू शकत नाही. जो मुलगा निर्व्यसनी व होतकरू आहे आणि आपल्या मुलीला आयुष्यभर चांगल्या प्रकारे जीव लावून सांभाळू शकतो अशाच निर्व्यसनी, होतकरू व चारित्र्यसंपन्न मुलाला आपली मुलगी जरूर द्या. तो आपल्या मुलीला राणी सारखा ठेवेल...त्यांच्या सुखी संसाराला कोणाचीच नजर लागणार नाही. आणि श्रीमंत घरी द्याल तर आपल्या मुलीचे वैष्णवी हगवणे प्रकरण झाल्याशिवाय राहणार नाही... एवढे ध्यानात ठेवा...

---

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी, ता.अहमदपूर, जि. लातूर**
**७४९८७१५६६१**

■ ■ ■

# लाडक्या बहिणींसाठी दारूधोरण





**दिपक कैतके**
**मुंबई.**

माझी लाडकी बहीण योजनेचा हप्ता वेळेवर देण्यासाठी आता राज्य सरकारने दारूबंदीलाच नवा अर्थ दिला आहे. राज्याच्या इतिहासात प्रथमच सर्व प्रकारच्या मद्यावर तब्बल ५०% पेक्षा अधिक करवाढ करून महसूलवाढीचा दारूचा उपाय मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीत दरवर्षी सुमारे १४ हजार कोटी रुपये भर पडणार असून, परकीय मद्यावर तर ७० टक्क्यांपर्यंत दरवाढ करण्यात आली आहे.

**लाडक्या बहिणींसाठी खडखडाट मग दारूपट्टीचे टॉनिक!**

राज्य सरकारने महिलांसाठी जाहीर केलेल्या माझी लाडकी बहीण योजनेसाठी दरमहिना १५०० रुपये आणि भविष्यात २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. मात्र, या योजनेसाठी लागणाऱ्या ३५ ते ४० हजार कोटींच्या वार्षिक खर्चामुळे सरकारला आर्थिक तंगीतून मार्ग काढावा लागतो आहे. परिणामी, राज्य उत्पादन शुल्क विभागाने दारूच्या दरांमध्ये भरमसाठ वाढ करण्याचा निर्णय घेतला आणि मंत्रिमंडळाने त्यावर शिक्कामोर्तब केलं.

**देशी-विदेशी मद्यावर एकदम हैवाना दरवाढ**

| मद्य प्रकार | जुना दर (१८० मि.ली.) | नवा दर | वाढ (%) |
|---|---|---|---|
| देशी दारू | रू.७० | रू.८० | १४% |
| महाराष्ट्रात निर्मित दारू | रू.१४८ | – | |
| भारतीय बनावटीचे विदेशी मद्य | रू.१२० | रू.२०५ | ७०% |
| प्रिमियम विदेशी मद्य | रू.२१० | रू.३६० | ७०% |

सर्वसामान्य ग्राहकांपासून प्रिमियम ब्रँडचे चाहते सर्वांनाच याचा फटका बसणार असून, मुंबईतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्समध्ये विदेशी मद्य विक्रीसाठी १५% अतिरिक्त शुल्क आकारले जाणार आहे. बीयर मात्र यापासून वगळण्यात आली आहे, कारण देशात सर्वाधिक बीयर दर आधीच महाराष्ट्रातच आहेत.

**दारूपासून आता राज्याच्या तिजोरीत भरभरून राजस्व**

सध्या उत्पादन शुल्क व दारू विक्रीतून राज्याला ४५ हजार कोटींचा वार्षिक महसूल मिळतो. आता नव्या दरवाढीनंतर हा महसूल ६० हजार कोटींवर जाण्याची शक्यता आहे. यामुळे राज्याच्या महसुली उत्पन्नाच्या १० टक्क्यांहून अधिक वाटा केवळ दारू विक्रीतून मिळणार आहे.

**विभागीय बळकटी व एआय नियंत्रण**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या यंत्रणेसाठी ७४४ नवीन पदे व ४७९ पर्यवेक्षक पदे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच एआय प्रणालीद्वारे संपूर्ण मद्य उत्पादन-साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी एकात्मिक नियंत्रण कक्ष स्थापन केला जाणार आहे.

महायुती सरकारच्या महिलांसाठीच्या लोकप्रिय योजनेला आर्थिक बळ देण्यासाठी राज्यातील दारू प्रेमींना आता अधिक मोल मोजावे लागणार आहे. एका बाजूला लाडक्या बहिणींची काळजी, दुसऱ्या बाजूला दारूचे वाढते दर – हे सध्याच्या सरकारचे नवे आर्थिक समीकरण ठरू लागले आहे.

# रेल्वेचा पुढाकार, शिक्षण क्षेत्र मागे का?

छत्रपती शिवाजी महाराज केवळ भारतीयांचेच नव्हे, तर परदेशातही आराध्य आहेत. अनेक देशांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये शिवरायांची युद्धनीती, राज्यनीती इत्यादींचा समावेश आहे. शिवाजी महाराज केवळ हिंदवी स्वराज्याचे संस्थापक नव्हते, तर ते कुशल प्रशासक, पराक्रमी योद्धा आणि दूरदृष्टी असलेले शासक होते. ते जनकल्याण आणि आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहेत.

**वाचक लिहितात**

त्यांची युद्धनीती, शासनपद्धती आणि धर्मनिरपेक्ष विचार आजही प्रेरणादायी आहेत. त्यांच्या जीवनातून आणि कार्यातून विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण, देशभक्ती आणि सामाजिक ऐक्य यांसारखी मूल्ये शिकायला मिळवी. या उद्देशाने मुंबई येथून भारत गौरव टुरिस्ट ट्रेन अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज सर्किट या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. ही गाडी महाराष्ट्रात ५ दिवस फेरफटका मारणार असून रायगड, प्रतापगड, पन्हाळा अशा ऐतिहासिक गडांच्या जवळच्या रेल्वेस्थानकांवर तसेच शिवरायांच्या इतिहासाशी संबंधित अन्य ऐतिहासिक स्थळांजवळ थांबणार आहे.या अभिनव उपक्रमासाठी भारतीय रेल्वेचे अभिनंदन! रेल्वे विभागाने शिवचरित्र प्रचारासाठी पुढाकार घेतला आहे, पण शिवरायांचा वसा पुढील पिढीमध्ये रुजविण्यासाठी शिक्षण क्षेत्रानेही पुढाकार घेण्याची वेळ आली आहे.

केवळ राज्य सरकारच नव्हे, तर केंद्र सरकारनेही प्राथमिक इयत्तेपासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांपर्यंत शिवाजी महाराजांचे जीवन, कार्य व पराक्रम यांचा समावेश अभ्यासक्रमात करावा, ही सर्व शिवप्रेमींची इच्छा आहे.

■ दीपक जमनारे, वर्धा.

# नसांमध्ये साचलेले खराब कोलेस्ट्रॉल होईल कमी

आजकाल उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या सामान्य झाली आहे. लोकांची बदलती जीवनशैली तसेच खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी यामुळे ही समस्या उद्भवते. शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढल्याने अनेक गंभीर आजार होऊ शकतात. हृदयरोग, मज्जातंतूंचे आजार, हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकसारखे गंभीर आणि जीवघेणे आजार होऊ शकतात. त्यामुळे शरीरात वाढत्या कोलेस्ट्रॉलची समस्या वेळीच नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे.



वाढत्या कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी जीवनशैलीत काही बदल करणे आणि आहार सुधारणे आवश्यक आहे, अनेक प्रकरणांमध्ये यासाठी औषधे घ्यावी लागतात. मात्र काही घरगुती उपायांच्या मदतीने शरीरात साठलेले खराब कोलेस्ट्रॉल बाहेर काढू शकतात. उच्च कोलेस्ट्रॉलची समस्या असेल, तर ते नियंत्रित करण्यासाठी स्वयंपाकघरात असलेली एक पांढरी गोष्ट वापरावी लागेल.

**लसूण कोलेस्ट्रॉल साफ करेल**

वाढत्या कोलेस्ट्रॉलवर नियंत्रण ठेवण्यासाठी लसूण वापरू शकता. यासाठी लसूण तुपात भाजून खावा लागेल. तूप आणि लसूण एकत्र कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. लसणात असलेले अँटी-ऑक्सिडंट्स आणि तुपात असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. याशिवाय, तुपात भाजलेल्या लसूण आरोग्यासाठी बरेच फायदे प्रदान करते. जर पचनाच्या समस्या असतील तर लसूण फायदेशीर ठरेल. विशेषतः तुपामध्ये ते भाजून खाल्ल्याने पचनाच्या समस्या दूर होण्यास खूप मदत होते. यामुळे बद्धकोष्ठता आणि आम्लपित्त यापासूनही आराम मिळतो. लसणात असे अनेक पोषक घटक आढळतात जे हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात. तुपात तळलेला लसूण खाल्ल्याने हृदयाशी संबंधित आजार दूर राहतात.

तुपात तळलेला लसूण खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ते शरीराचे संसर्गांपासून संरक्षण करते. तसेच लसणात असलेले अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म तुपासोबत मिसळल्यास सर्दी आणि खोकल्यापासून आराम मिळतो.

**पुरुषांसाठी फायदेशीर**

तुपात भाजलेले लसूण पुरुषांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. नियमित सेवन केल्यास टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढते आणि शुक्राणूंची संख्या वाढते.

■ ■ ■

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१९९४३२१)**

# डोळस विचार

अरे डोळस बांधवांनो
अंधांच्या समस्यांची
ठेवा थोडी जाणीव
बंद डोळ्याने चालून पहा
समजेल तुम्हा उणीव ...

असेल दृष्टी तर
दिसेल सृष्टी
म्हणवा नाही खोटा
मरणोत्तर नेत्रदान करून
अंधांना दृष्टी देण्यात
सांगा काय आहे तोटा ?

## आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफने पारंपरिक पॉलिसींवर ९०० कोटींपेक्षा अधिक कर्ज वितरित

**नागपूर, ११ जून :** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये पारंपरिक अर्थात ट्रॅडिशनल पॉलिसींवर ग्राहकांना ९०० कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज वितरित केले आहे. पॉलिसीवर कर्ज हे उपयुक्त सुविधा असून, यामुळे ग्राहकांना त्वरित निधी मिळतो आणि त्यांच्या दीर्घकालीन बचत योजनेवर कोणताही परिणाम होत नाही. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कंपनीने ४२,७०० पेक्षा अधिक ग्राहकांना कर्ज दिले.

आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सचे चीफ ऑपरेशन्स ऑफिसर श्री. अमीश बँकर यांनी सांगितले, लाईफ इन्शुरन्स हे दीर्घकालीन उत्पादन आहे आणि पॉलिसी सुरु असताना ग्राहकांना आर्थिक अडचणी येऊ शकतात. पॉलिसीवर कर्ज ही सुविधा ग्राहकांची बचत योजना योग्य ट्रॅकवर ठेवण्यास मदत करू शकते. विशेष म्हणजे, ग्राहकांना त्यांच्या पॉलिसीच्या सरेंडर व्हॅल्यूच्या ८०% पर्यंत कर्ज घेता येते. पॉलिसीवर कर्ज घेण्याची प्रक्रिया पेपरलेस आणि जलद आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ९८% पेक्षा अधिक कर्ज २४ तासांच्या आत वितरित करण्यात आले. ग्राहक कंपनीच्या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर कर्जासाठी अर्ज करू शकतात.

आमच्या ग्राहकांनी पॉलिसीवर कर्ज या सुविधेचा मोठ्या प्रमाणात स्वीकार केला आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कर्ज वितरणामध्ये ६०% वाढ झाली आहे. आमचे ग्राहक दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी वचनबद्ध आहेत आणि त्यांनी हे उत्पादन ज्या आर्थिक उद्दिष्टांसाठी घेतले, ते साध्य करू इच्छितात हे यातून दिसून येते.

विशेष म्हणजे, हे कर्ज प्रीमियम भरण्यासाठीही वापरता येते, ज्यामुळे पॉलिसी चालू राहते आणि तिचे फायदे ग्राहकांना मिळत राहतात.

## जगातील सर्वात मोठे कंटेनर जहाज एमएससी इरिनाचे विझिंजम आंतरराष्ट्रीय बंदरात ऐतिहासिक पदार्पण

**अहमदाबाद, १० जून :** जगातील टीईयू (ट्वेंटी-फूट इक्विव्हलेंट युनिट) क्षमतेनुसार सर्वात मोठे कंटेनर जहाज म्हणून ओळखले जाणारे एमएससी इरिना हे जहाज सोमवारी सकाळी विझिंजम आंतरराष्ट्रीय बंदरात दाखल झाले आणि ते मंगळवारपर्यंत तेथे थांबणार आहे.

या कंटेनर जहाजाचं आगमन या बंदरासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ मे रोजी हे बंदर राष्ट्राला समर्पित केले होते.

एमएससी इरिना ची एकूण क्षमताच २४,३४६ टीईयू (२० फूट समतुल्य युनिट) असून, हे जहाज जागतिक शिपिंग क्षेत्रातील एक शक्तिशाली घटक आहे. याची लांबी ३९९.९ मीटर आणि रुंदी ६१.३ मीटर आहे. हे जहाज फिफाद्वारे मान्यताप्राप्त मानक फुटबॉल मैदानापेक्षा जवळजवळ चारपट लांब आहे.. हे जहाज आशिया आणि युरोपदरम्यान मोठ्या प्रमाणात कंटेनर वाहतुकीसाठी खास डिझाइन करण्यात आले असून, व्यापार मार्ग सुलभ करणे आणि लॉजिस्टिक



कार्यक्षमतेत वाढ करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

हे जहाज दक्षिण आशियातील बंदरात प्रथमच आले आहे, ज्यामुळे विझिंजम बंदराची अल्ट्रा-लार्ज कंटेनर व्हेसेल्स (युएलसीव्ही) हाताळण्याची क्षमता अधोरेखित होते. या बंदरात याआधीही एमएससी तुर्कीए आणि एमएससी मिशेल कॅपेलिनी यांसारखी आयकॉन-क्लास जहाजे आली आहेत, ज्यामुळे हे बंदर सागरी व्यापारातील एक महत्त्वाचे केंद्र ठरत आहे.

एमएससी इरिना' मार्च २०२३ मध्ये लाँच करण्यात आले आणि त्याच वर्षी एप्रिलमध्ये त्याचा पहिला प्रवास सुरू झाला. हे जहाज एकाच वेळी २६ (टियर उंचीपर्यंत) थरांमध्ये कंटेनर साठवू शकते, जे कंटेनर स्टॅकिंगमध्ये एक अद्वितीय क्षमता दर्शवते.

लक्षवेधी बाब म्हणजे एमएससी इरिनाने आपल्या पूर्ववर्ती 'ओओसीएल स्पेन' ला १५० टीईयूच्या फरकाने मागे टाकले आहे. पर्यावरणीय मानकांना अनुसरून, या जहाजात ऊर्जा-बचतीसाठी विशेष वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे कार्बन उत्सर्जनात सुमारे ४% घट होते आणि कार्यक्षमतेवर परिणाम न करता पर्यावरणाचा भार कमी होतो.

एमएससी एरिनाचे विझिंजम बंदरातील आगमन केवळ या बंदराचे जागतिक शिपिंगमधील धोरणात्मक महत्त्व अधोरेखित करत नाही, तर सस्टेनेबल मेरीटाइम प्रॅक्टिसेसकडे एक महत्त्वाची झेप दर्शवते आणि या क्षेत्रातील भविष्यातील विकासासाठी एक नवीन मानदंड तयार करते.

## कलाकारांनी सांगितल्या फादर्स डेबाबतच्या हृदयस्पर्शी आठवणी!



**मुंबई, ११ जून :** फादर्स डे वडिलांचे प्रेम, त्याग आणि अविरत पाठिंब्याचे हृदयस्पर्शी सेलिब्रेशन आहे. या दिवशी मुले आपुलकी, गोड आठवणी आणि विचारशील गेस्चर्सचे प्रतीक म्हणून वडिलांचा सन्मान करतात. यंदा फादर्स डे निमित्त एण्ड टीव्ही कलाकार जुन्या आठवणींना उजाळा देत आहेत, तसेच हृदयस्पर्शी गाथा सांगत आहेत, ज्यामधून पितृत्वाचा आनंद व अभिमान दिसून येतो. हे कलाकार आहेत योगेश त्रिपाठी (दरोगा हप्पू सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). दरोगा हप्पू सिंग म्हणून लोकप्रिय असलेले योगेश त्रिपाठी म्हणाले, ''माझी दोन मुले माझे विश्व आहेत आणि माझ्या जीवनात त्यांचे असणे खूप आनंद देते. काही वर्षांपूर्वी माझा मुलगा दक्षेशने, जो लहान हप्पू बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, मला प्रेमळ सरप्राइज दिले. त्याने हप्पू सिंगप्रमाणे अगदी हुबेहूब माझ्यासारखा पेहराव केला, जेथे सुव्यवस्थित विंचरलेले केस, सिग्नेचर मिशी आणि लहान 'न्योछावर' पॉकेट देखील होते. तो माझ्या प्रमाणे उच्चार आणि आत्मविश्वासाने म्हणत होता, 'न्योछावर कर दो', जे पाहून आम्ही सर्व अचंबित झालो. मी हसत होतो आणि सोबत माझ्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू आले होते. त्या क्षणी मी माझा सर्वात मोठा चाहता आणि माझा सर्वात मोठा समीक्षक पाहिला. ते अनुकरण, निरागसता, प्रेम आणि उत्साह पाहून मी खूप भारावून गेलो.''

## मेट्रोपोलिस हेल्थकेअरचा विदर्भात विस्तार गोंदिया येथे आधुनिक डायग्नोस्टिक लॅबची स्थापना



**गोंदिया, १० जून :** भारतातील दुसऱ्या क्रमांकाची आणि अत्यंत प्रतिष्ठित पॅथॉलॉजी साखळी असलेल्या मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेडने विदर्भात आपली उपस्थिती आणखी भक्कम करत गोंदिया येथे उच्च तंत्रज्ञानयुक्त डायग्नोस्टिक लॅब सुरू केली आहे. राष्ट्रीय स्तरावर गोंदिया जिल्ह्यात लॅब सुरू करणारी मेट्रोपोलिस ही पहिली प्रमुख डायग्नोस्टिक कंपनी आहे. सुमारे १,००० चौरस फूट क्षेत्रफळ असलेली ही लॅब प्रत्येकी महिन्याला ६,००० सॅम्पल्स तपासण्याची क्षमता बाळगते आणि रुटीन तपासण्यांपासून ते ॲडव्हान्स मॉलेक्युलर डायग्नोस्टिक्सपर्यंत सेवा पुरवते.

या लॅबचे उद्घाटन मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेडचे चीफ बिझनेस ऑफिसर (पश्चिम, मध्य व उत्तर भारत) भूपेंद्रसिंह राजावत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. राहुल कावणकर (एव्हीपी व बिझनेस युनिट हेड रेस्ट ऑफ महाराष्ट्र), डॉ. स्मिता सुदके (चीफ ऑफ लॅब पुणे व रेस्ट ऑफ महाराष्ट्र), डॉ. पूजा बांबोर्डे (चीफ ऑफ लॅब गोंदिया) आणि श्री. विक्रांत पवार (क्लस्टर सेल्स मॅनेजर) हेही उपस्थित होते.

भूपेंद्रसिंह राजावत म्हणाले, गोंदिया ही मेट्रोपोलिसची विदर्भातील पाचवी डायग्नोस्टिक लॅब आहे. यापूर्वी नागपूर, अमरावती, अकोला आणि चंद्रपूर येथेही आमच्या सुविधा आहेत. मागील चार दशकांपासून महाराष्ट्रात आम्ही दर्जेदार आरोग्यसेवा देत आहोत. टियर २ व टियर ३ शहरांमध्ये अचूक, जलद आणि विश्वासार्ह निदान सेवा देणे हे आमचे ध्येय आहे. स्थानिक हॉस्पिटल्स, डॉक्टर व सार्वजनिक आरोग्य व्यवस्थांबरोबर भागीदारी करत आरोग्य सुधारण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

डॉ. स्मिता सुदके म्हणाल्या, गोंदिया येथे उभारलेल्या या लॅबमुळे मेट्रोपोलिसच्या वैज्ञानिक गुणवत्ता व विशिष्ट निदान सेवेचा लाभ स्थानिक लोकांपर्यंत पोहोचेल. ही लॅब वेलनेस तपासणी, क्रॉनिक डिजीज मॉनिटरिंग, तसेच गॅस्ट्रोएंटेरॉलॉजी, नेफ्रॉलॉजी, न्यूरॉलॉजी, ऑन्कॉलॉजी, महिला व बाल आरोग्य, संसर्गजन्य रोग आदी क्षेत्रांतील सखोल निदानासाठी उपयुक्त ठरेल. अचूक निदान, नाविन्यपूर्ण दृष्टिकोन व रुग्ण-केंद्रित सेवा ही आमची मूलभूत मूल्ये आहेत.

ही नवी लॅब गोंदिया येथील गांधी चौक, अग्रसेन गेटजवळील राईस सिटी बिल्डिंगमध्ये कार्यरत झाली आहे.

मेट्रोपोलिस हेल्थकेअर ही भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह डायग्नोस्टिक साखळी असून अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्रांची मानकरी आहे. या संस्थेने भारतीय संदर्भ रेंज विकसित केली आहे, जी आज देशभरातील हजारो लॅब्समध्ये वापरली जाते.

## तनेएराने जाहीर केली पहिल्यांदाच साड्यांवर ४०% सवलत आर्थिक वर्ष २५ मध्ये साध्य केलेल्या ३०% वाढीच्या आधारावर मजबूत सुरुवात

**नागपूर, ११ जून :** टाटाचा ब्रँड असलेल्या तनेएराने आर्थिक वर्ष २५ मध्ये सुमारे ३०% वाढ नोंदवली असून आर्थिक वर्ष २६ च्या सुरुवातीलाही लग्नसराईच्या मजबूत खरेदीचा प्रभाव आहे. त्यातून ब्रँडच्या वाढीचा कल, प्रवाह कायम राहत आहे. या सकारात्मक प्रवासास चालना देत तनेराने आपल्या पहिल्यावहिल्या राष्ट्रीय सेलची घोषणा केली आहे. त्यामध्ये साड्या, रेडी-टू-वेअर सेट्स, अनस्टीच्ड कुर्ता सेट्स आणि सणासुदीसाठीच्या लेहेंगासारख्या विविध श्रेणींमध्ये तयार केलेल्या शुद्ध व नैसर्गिक धाग्यांपासून बनवलेल्या उत्पादनांवर ४०% पर्यंत सवलत दिली जात आहे.

४१ शहरांमध्ये ८० दालनांचे मजबूत राष्ट्रीय जाळे असलेल्या तनेएराने पारंपरिक वस्त्रप्रावरण परिधानसाठी प्रमुख पर्याय म्हणून आपले स्थान अधिक दृढ केले आहे. यावर्षी सणासुदीचा हंगाम लवकर सुरु होत असताना हा सेल या हंगामाची सुरुवात झाल्याचे जाहीर करण्यासाठी आणि ग्राहकांना तनेएराच्या वैशिष्ट्यपूर्ण डिझाइन ठळकपणे सिद्ध करणाऱ्या शुद्ध आणि अस्सल उत्पादनांचा संग्रह करण्याची संधी देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे.

या प्रसंगी बोलताना मुख्य विक्री आणि विपणन अधिकारी सोमप्रभ कुमार सिंग म्हणाले, पहिल्यांदाच इतक्या विस्तृत श्रेणीवर आम्ही एवढी सवलत देत असून उत्पादने ४०% पर्यंत सवलतीत उपलब्ध आहेत. ही सवलत योजना म्हणजे तनेएरा ब्रँड ज्यासाठी ओळखला जातो त्या शुद्धता व समृद्धतेच्या अनुभवाबरोबर मिळणारा एक अतिरिक्त लाभ आहे. अस्सलरीत्या मिळवलेली हस्तकला उत्पादने तसेच प्रत्येक पोषाखात मिळणारी शुद्धतेची आणि गुणवत्तेची हमी याद्वारे आमच्या चोखंदळ ग्राहकांसाठी हा अनुभव खास बनविण्याचे आमचे ध्येय आहे.

बनारसी, कांजीवरम, जामदानी ते टसर यांसारख्या विविध प्रकारच्या साड्या ब्रँडच्या पोतडीत असून त्या भारतातील विणकाम परंपरा जपणाऱ्या कारागिरांना एक सलाम आहे. प्रत्येक तनेएरा दालन साडीप्रेमींसाठी एक निवासस्थानासारखे डिझाइन केलेले असून येथे लग्नासाठी विशेष विभाग, सणासुदीच्या कार्यक्रमाच्यावेळी परिधान करायच्या कपड्यांचा वेगळा विभाग आणि रोजच्या वापरातील आवश्यक गोष्टी एकाच छताखाली उपलब्ध आहेत. ग्राहकांसाठी सिल्क, कॉटन इकत, कोटा डोरिया, चंदेरी आणि महेश्वरी, साउथ सिल्क्स, संबळपुरी आणि व्हेगन कलेक्शन्ससारख्या विविध विणकाम केंद्रांमधून खास निवडलेली उत्पादनेही उपलब्ध आहेत. हर एक पोषाखातून भारताच्या समृद्ध वस्त्र परंपरेचा गौरव करत गुणवत्तेच्याबाबतीत तडजोड न करणाऱ्या तनेएरा कडून अस्सल कारागिरीचे चिन्ह म्हणून शुद्ध झारी कांजीवरम असे प्रमाणपत्र दिले जाते. ग्राहक स्टेशन रोड, नागपूर येथील तनेएरा शोरूम मध्ये ही सवलत घेऊ शकतात.

## भारती सिंहने शब्बीर अहलूवालियाला टेलिव्हिजनचा अजय देवगण म्हटले



**मुंबई, ११ जून :** मनोरंजन क्षेत्रातील एक लोकप्रिय जोडी भारती सिंह आणि हर्ष लिंबाचिया यांनी अलीकडेच आपल्या एलओएल पॉडकास्टमध्ये टेलिव्हिजन वरील लाडका चेहरा शब्बीर अहलूवालिया आणि आशी सिंह या दोघांना आमंत्रित केले होते. शब्बीर आणि आशी सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत युग आणि कैरी या अगदी विरुद्ध स्वभावाच्या व्यक्तिरेखा साकारत आहेत. या पॉडकास्टमध्ये त्या दोघांनी शूटिंग दरम्यान पडद्यामागे घडलेल्या गमतीजमती, किस्से, त्यांची पडद्यावरची केमिस्ट्री आणि या मालिकेच्या वेगळेपणाविषयी हितगुज केले.

शब्बीरच्या व्यक्तिमत्त्वाचे भारती सिंहने तोंड भरून कौतुक केले. तो एक ज्येष्ठ अभिनेता आहे आणि बऱ्याच वर्षांपासून टेलिव्हिजनवर काम करत असल्याने तिने आशी सिंहला शब्बीरसोबत काम करण्याचा अनुभव कसा आहे हे विचारले. भारती पुढे म्हणाली की तिला शब्बीर हा टेलिव्हिजनचा अजय देवगण वाटतो, कारण तो फारसा हसत नाही. त्याची चर्या गंभीर असते आणि परफॉर्मन्स उत्कट असतो. तिने आशीला हे देखील विचारले की शब्बीरसोबत पहिले दृश्य करताना तिला भीती वाटली होती का.

या हलक्या फुलक्या क्षणांमुळे स्टुडिओत हशा पिकला. सुरुवातीला या कसलेल्या कलाकारासोबत काम करताना आपल्याला कशी भीती वाटत होती, हे आशी सिंहने सांगितले. पण शब्बीरच्या साधेपणामुळे आणि आपलेपणामुळे कामात लवकरच मोकळेपणा आला असेही ती म्हणाली.

## तेनाली रामा मालिकेत तेनाली आणि लक्ष्मण तडकणाऱ्या काचांच्या मागचे रहस्य शोधणार



**मुंबई, ११ जून :** सोनी सबवरील तेनाली रामा ही मालिका तेनाली (कृष्ण भारद्वाज) या चतुर दरबारी कवीच्या सुरस कथा सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. तेनालीला आता लक्ष्मणची (कुणाल करण कपूर) साथ मिळाली आहे. ते दोघे मिळून विजयनगरात घडणाऱ्या गूढ घटनांचा छडा लावत आहेत.

आगामी भागांमध्ये, विजयनगरात विचित्र गोष्टी घडताना दिसतील. संपूर्ण शहरात अचानक रहस्यमय रीतीने काचा फुटू लागतील. रामा शोध घेतो, तेव्हा त्याच्या ध्यानात येते की, या रहस्याचे केंद्र आचार्य भास्कर (विनायक भावे) यांच्या घरात आहे. आचार्य भास्कर एक वेंधळा संशोधक आहे. जेव्हा तेनाली गायब झालेल्या आचार्यांचा शोध घेऊ लागतो आणि काचा फुटण्यामागचे गूढ शोधू लागतो, तेव्हा एका लपलेल्या घुसखोराशी त्याचा सामना होतो. या झटापटीत तेनालीच्या जीवाला धोका निर्माण होतो, त्यावेळी लक्ष्मण प्रकट होतो आणि हल्लेखोरापासून त्याचे रक्षण करतो. त्यांना लक्षात येते की भास्करचा जीव धोक्यात आहे. रामा आणि लक्ष्मण आणखी कसून शोध घेऊ लागतात. त्यांच्याकडे वेळ कमी आहे आणि आचार्य भास्करला वाचवणे आवश्यक आहे. त्यासाठी या भयंकर कट रचणाऱ्याचा शोध त्यांना घ्यावा लागणार आहे.

## सागर पारेखने जागृति एक नयी सुबहच्या सेटवर आपल्या सहकलाकार आर्य बब्बर आणि विजयेंद्र कुमेरिया यांना घरी बनवलेले लिट्टी-चोखा खाऊ घालून एक खास ट्रीट दिली!



**मुंबई, ११ जून :** प्रत्येक मालिका त्यामधील पात्रांमधील केमिस्ट्रीवर फुलते मग ती भावनिक नाती असोत किंवा संघर्षमय. झी टीव्हीवरील जागृति एक नयी सुबह या मालिकेत सागर पारेख हा आर्य बब्बर (कलिकांत ठाकूर) आणि विजयेंद्र कुमेरिया (सूरज) यांच्यासोबत काम करत आहे आणि जसे हे तिघे ऑन-स्क्रीन एक आकर्षक कौटुंबिक नाते उभे करत आहेत, तसेच त्यांची ऑफ-स्क्रीन मैत्रीही तितकीच सुंदर आहे. अलीकडेच सागरने सेटवर आपल्या सहकलाकारांसाठी आणि क्रू सदस्यांसाठी एक सुंदर गोष्ट केली त्याने घरी बनवलेला लिट्टी-चोखा सर्वांसाठी आणला. हा त्याच्या मूळ गावचा एक पारंपरिक स्वादिष्ट पदार्थ आहे, ज्याने सर्वांनाच त्यांच्या घरची आठवण करून दिली.

प्रत्येकाने या पारंपरिक चवीचा आनंद घेतला आणि घरगुती स्वादाची प्रशंसा केल्याशिवाय राहूच शकले नाहीत. कलाकार आणि क्रूने जेवताना खूप मजा केली आणि भरभरून कौतुक केले, ज्यामुळे तो शूटिंगचा दिवस एक खास आठवणीत बदलला. सागरच्या या सुंदर कृतीमुळे केवळ पोटच भरलं नाही, तर त्यांच्यातील नातेही अधिक दृढ झाले.

## ओला इलेक्ट्रिकची स्टायलिश रोडस्टर एक्सची नागपूर डिलिव्हरी सुरू

नागपूर, ११ जून : भारतातील सर्वात मोठी इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) कंपनी असलेल्या ओला इलेक्ट्रिकने आज नागपूर त्यांच्या रोडस्टर एक्स पोर्टफोलिओमधील मोटरसायकल्सची डिलिव्हरी सुरू केल्याची घोषणा केली. ओला इलेक्ट्रिक कंपनीने 'राइड द फ्युचर' मोहिमेअंतर्गत पहिल्या ५,००० ग्राहकांसाठी रुपये १०,००० च्या ऑफरची घोषणा केली आहे. यामध्ये ग्राहकांना एक्स्टेंडेड वॉरंटी, मुव्हओ यस प्लस आणि एसेन्शियल केअर मोफत मिळणार आहे.

रोडस्टर एक्स सिरीजमध्ये मिड-ड्राइव्ह मोटर आहे, जी कार्यक्षमता आणि सुरक्षितता वाढवते. रोडस्टर सिरीजच्या पॉवरट्रेनमध्ये चेन ड्राइव्ह आणि कार्यक्षम टॉर्क हस्तांतरणासाठी एकात्मिक एमसीयू (मायक्रोकंट्रोलर युनिट) देखील आहे, ज्यामुळे उत्कृष्ट एक्सलरेशन आणि सुधारित रेंज मिळते. रोडस्टर एक्स सिरीजमधील मोटरसायकल्समध्ये फ्लॅट केबल्सचा वापर करण्यात आला आहे - जी उद्योगातील पहिली नावीन्यपूर्णता आहे. या केबल्समुळे पॅकेजिंगची कार्यक्षमता सुधारते, वजन कमी होते आणि थर्मल कार्यक्षमता वाढते, ज्यामुळे एकूण टिकाऊपणा आणि विश्वसनीयता वाढते.

ओला इलेक्ट्रिकचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक भाविश अग्रवाल म्हणाले, स्कूटर्स ही फक्त सुरुवात होती. रोडस्टर एक्स हे मोटरसायकलिंग सेगमेंटमध्ये आमचे एक मोठे पाऊल आहे. रोडस्टर एक्स भारतात डिझाइन, इंजिनीअर आणि तयार केले आहे, ज्या पिढीला भविष्यातील बाईक चालवायची आहे त्यांच्यासाठी हे खास तयार केले आहे. आजपासून डिलिव्हरी सुरू झाल्याने, रोडस्टर एक्स २-चाकी श्रेणीतील ईव्हीची खरी क्षमता समोर आणेल, ज्यामुळे ईव्हीचा स्वीकार आणि वापर वाढवून येंड आएस येज शक्य होईल.

रोडस्टर एक्स सिरीज मोटरसायकल तंत्रज्ञानात एक क्रांती घडवून आणते आणि यात सेगमेंटमधील पहिले पेटंटेड ब्रेक-बाय-वायर तंत्रज्ञान सिंगल एबीएससह (अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम) आणि प्रगत रीजनरेशन (पुनर्निर्मिती), क्रूझ कंट्रोल आणि रिव्हर्स मोड यांसारखी स्मार्ट मुव्हओ यस ५ वैशिष्ट्ये आहेत. रोडस्टर एक्स सिरीजच्या बॅटरी सिस्टिमला आयपी ६७ वॉटरप्रूफ आणि डस्ट-प्रूफ सर्टिफिकेशन मिळाले आहे, तसेच प्रगत वायर बॉन्डिंग तंत्रज्ञान आणि सहज देखभालीसाठी सर्व्हिसेबल बॅटरी मॅनेजमेंट सिस्टिम (बीएमएस) आहे.

रोडस्टर एक्स सिरीजच्या किमती रोडस्टर एक्स २.५ kWh साठी रुपये ९९,९९९, ३.५ साठी रुपये १,०९,९९९ आणि ४.५ kWh साठी रुपये १,२४,९९९ पासून सुरू होतात. रोडस्टर एक्स+ ४.५ kWh ची किंमत १,२९,९९९ आहे, तर रोडस्टर एक्स+ ९.१kWh (४६८० भारत सेलसह) जे प्रति चार्ज ५०१ किमीची अतुलनीय रेंज देते, त्याची किंमत रुपये १,९९,९९९ आहे.

## शब्दकोडे क्रमांक २१३५



आडवे शब्द :-
१) वृषभाचा सण
३) इंदिरा गांधीजींच्या नाव
७) देशाचे नाणे
९) मुलीचा नवरा
१०) सामान
११) व्यय
१२) गोंधळून जाणे
१४) चेष्टा
१६) आश्चर्य
१७) एक चतुर्थांश भाग
१८) अन्न, जेवण, गिळंकृत करणे
१९) जपान देशाचे चलन
२१) थोडक्यात महानगरपालिका
२३) माळी
२४) थंड
२५) गीत म्हणणे
२६) जहाज
२७) काल व उद्या मधील दिवस
२८) ताबडतोब(हिं )
२९) विशेष
३२) दुलई
३५) उगाच
३६) अनेकांच्या हाती असलेली सत्ता, गोंधळ
३९) गावाखालची जमीन
४१) धमनी
४२) चांदी
४४) अंबाड्यासारखी एक तंतुमय वनस्पती
४५) लापशी, दुधाचा एक गोड पदार्थ
४७) दही घुसळून केलेले पेय
४८) व्रत
४९) उसनवार
५२) भांडण, दुही
५३) मोठी उथळ वाटी
५४) तफावत, भेद
५५) जनक
५७) गुणांची कदर करणारा
६०) रेडा, कोकिळ
६२) तमाशातील आख्यान
६४) जिव्हा
६६) आपला देश
६८) सारथी
७१) नष्ट, नासाडी ७२) ऐट, दिमाख
७३) मरेपर्यंत
७४) न्यूनता, चणचण
७५) समीक्षा, विरोधी अभिप्राय

उभे शब्द :-
१) निर्बुद्ध माणूस
२) आगमन होणे
३) एक बारीक धान्य
४) खराब
५) लक्ष्मी
६) संगोपन
७) ख्रिश्चनांचे प्रार्थनास्थळ
८) श्रेष्ठ पुरुष
९) राबता, वहिवाट
११) गुप्तपणे चर्चा करण्याची जागा
१३) माल साठविण्याची जागा
१५) दारूचा एक प्रकार
१७) पुष्पदल
२०) एक मोठे चर्मवाद्य
२२) नगरात राहणारा
२४) ज्याला कशाचीही पारख नाही असा
२५) समुद्राच्या लाटांचा आवाज
२७) जनकजननी
३०) प्रभात
३१) रणात, युद्धात धीट असलेला
३३) धन्यवादाचा एक शब्द
३४) अकस्मात
३५) दुधाचे दह्यात रुपांतर करणारा घटक
३७) कासोटा, ओटी, खोकला
३८) हमाल
४०) लाकूड कापण्याचे हत्यार
४३) वेळूचे, किंवा गहू, जव यांचे सत्व
४६) गप्प बसण्याचे व्रत
४७) घाई त्वरा
५०) मंत्रीमंडळ, शासन - कर्त्यांचा समूह
५१) शेत, कुरण, मळा
५३) खळबळजनक
५४) अगदी छोटा भाग
५६) बारीक, मऊ केस
५८) दयाळू
५९) दरवाजा
६१) सदोदित
६३) तृण
६५) नासलेला
६६) गवताची पेंढी
६७) शरीर
६९) सत्ता
७०) नूतन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## वीर हनुमानमध्ये आपले आराध्य दैवत श्रीरामाला भेटण्यास निघाला हनुमान



**मुंबई, ११ जून :** भक्ती आणि दिव्य नियती यांची हृदयस्पर्शी कथा विशद करून सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेने आपल्या प्रेक्षकांना प्रभावित आणि प्रेरित केले आहे. या मालिकेत आन तिवारी छोट्या हनुमानाच्या भूमिकेत आहे, तर सायली साळुंखे आणि आरव चौधरी अनुक्रमे माता अंजनी आणि केसरीची भूमिका करत आहेत. तरुण खन्ना भगवान शिवाच्या रूपात दिसत आहेत आणि माहिर पांधी वाली आणि सुग्रीव यांची दुहेरी भूमिका करत आहे. मालिका आता एका दिव्य टप्प्यावर येऊन पोहोचली आहे. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, हनुमान अयोध्येला पोहोचला आहे, पण हनुमान-श्रीरामाच्या (तन्मय नानी) भेटीत देव काही ना काही विघ्न उभे करत आहेत.

मनातील निःस्सीम भक्तीने प्रेरित झालेला हनुमान श्रीरामाला भेटण्यासाठी सतत एकामागून एक आलेल्या विघ्नांवर मात करत आहे. तो रानावनातून एकाकी, उपाशी भटकत आहे, भयंकर संकटे त्याच्यापुढे येत आहेत मात्र तरीही त्याचा निर्धार डळमळीत होत नाही आणि तो अत्यंत श्रद्धेने आपला प्रवास सुरूच ठेवतो. श्रीरामासाठी एक फुलांचा हार करण्याच्या त्याच्या प्रयत्नांत त्याच्यापुढे नवी विघ्ने उभी राहतात. आपल्या मार्गात त्याला एक गूढ पण दयाळू स्वभावाची व्यक्ती भेटते. ही व्यक्ती त्याला भक्तीचा गहन अर्थ जाणण्यास मदत करते. ही व्यक्ती दुसरी तिसरी कुणी नसून भोला रूपातील साक्षात भगवान शिव असते, पण त्याबद्दल हनुमान मात्र अनभिज्ञ आहे. या भेटीनंतर हनुमानाला हे ज्ञान होते की, खरी भक्ती संपूर्ण शरणागतीत असते; आपला अहंकार, भीती आणि शंका सोडून देण्यात असते- आणि निर्मळ मनाने श्रीरामाच्या प्रेमाचा अनुभव घेण्यात असते.

भगवान शिवाची भूमिका करणारा अभिनेता तरुण खन्ना म्हणतो, जेव्हा जेव्हा मी रुद्राक्ष घालतो आणि महादेवाच्या भूमिकेत शिरतो, तेव्हा मनात एक जबाबदारीची जाणीव येते. मन श्रद्धेने भरून जाते. या भूमिकेसाठी केवळ संवाद बोलून आणि कृती करून चालत नाही, तर भगवान शंकरात असलेली अथांग शांतता, करुणा आणि विश्वव्यापक शक्ती देखील मनातून अनुभवावी लागते.


## आज का अंदाज

गुरूवार १२ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १५७ | ३३० | १३३ | ११८ | ४५५ | ४४७ | १३४ | १४४ |
| ४९० | ४४८ | २२३ | ५७८ | २४८ | ११३ | २६० | ५६८ |
| ५८० | २५९ | ३७७ | ६७७ | ३४६ | ६९० | ३७८ | ४७८ |
| ३२ | ६२ | ७५ | ०५ | ४३ | ५३ | ८१ | ९१ |
| ३४ | ६४ | ७८ | ०८ | ४६ | ५६ | ८२ | ९२ |
| ३० | ६० | ७९ | ०९ | ४७ | ५७ | ८० | ९० |

**१२ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५७ | ८७ |
| १४ | २४ | ५९ | ८९ |
| १६ | २६ | ५३ | ८३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला अडकलेले पैसे मिळतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने आर्थिक लाभ होतील. तुमच्या वडिलांकडून अपेक्षित आर्थिक मदत मिळेल. उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**वृषभ :** तुमच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष द्या. तणाव कमी करण्यासाठी आणि स्वत:ला फ्रेश ठेवण्यासाठी काळजी घ्या. कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन त्यावर मात कराल.

**मिथुन :** आज कुटुंबात अनावश्यक तणाव निर्माण होऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील.

**कर्क :** तुमच्या बॉसशी बोलताना किंवा महत्त्वाच्या चर्चा करताना शहाणपणाने आणि विचारपूर्वक बोला. तुमच्या शब्दांनी परिस्थिती बिघडणार नाही याची काळजी घ्या.

**सिंह :** कुटुंबासोबत विशेषत: आई-वडिलांसोबत वेळ घालवाल. यामुळे नातेसंबंध अधिक मजबूत होतील. आर्थिक बाबतीत चढ-उतार दिसू शकतात. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे.

**कन्या :** आपल्या प्रियजनांसोबत वेळ घालवण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी हा एक उत्तम दिवस आहे. आज तुम्हाला आरोग्याच्या किरकोळ समस्या सतावतील. खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** स्वत:च्या आरोग्याकडे आणि मानसिक स्थितीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आज तुम्हाला कामात भरपूर उत्साह जाणवेल. तुम्ही तुमच्या जबाबदाजया अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**वृश्चिक :** आज तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. चांगलं काम मिळेल. महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना बाहेरच्या देशात जावे लागू शकते.

**धनु :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न असल्याने आर्थिक स्थिती मजबूत असेल. पैशाच्या मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. यामुळे भविष्यात आर्थिक लाभ होतील.

**मकर :** कामाच्या ठिकाणी जास्त मेहनत करावी लागेल. सहकाजयांशी समन्वय साधण्याची गरज भासेल. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. यामुळे नात्यात गोडवा येईल. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.

**कुंभ :** आज तुमची आर्थिक परिस्थिती थोडी गडबडू शकते. त्यामुळे कोणत्याही मोठ्या निर्णयांमध्ये सावधगिरी बाळगा. सतत काम करण्याऐवजी छोटे ब्रेक घ्या. यामुळे तुमची कार्यक्षमता टिकून राहील.

**मीन :** आपल्या कामाचे संतुलन योग्य प्रकारे राखण्याचा प्रयत्न करा. करिअरमध्ये पुढे जाण्यासाठी विचारपूर्वक आणि रणनीती आखा. कोणताही निर्णय घाईघाईने घेऊ नका. आर्थिक स्थिती चांगली आणि मजबूत राहील.

# कर्जमुक्ती, पीकविम्यासाठी शेतकऱ्यांचा शेगावातून एल्गार



■ महासागर प्रतिनिधी,
शेगाव , दि. ११ : शेगाव येथे बैलगाडीतून मिरवणुकीत सहभागी झालेले रविकांत तुपकर. शेगाव येथे बैलगाडीतून मिरवणुकीत सहभागी झालेले रविकांत तुपकर. सोयाबीन-कापूस, कांद्याला भाव नाही,उसाचाही प्रश्न बिकट आहे.,नुकसान भरपाई नाही,पेरणी तोंडावरील परंतु पीक कर्ज नाही,कर्जमाफी नाही आज राज्यातील शेतकरी संकटात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठीएल्गार पुकारला आहे. सरकारने जर शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले तर येणाऱ्या काळात मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशारा शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनीदिला. शेगाव येथील माहेश्वरी भवन येथे आयोजित एल्गार मेळाव्यात बोलत होते. यावेळी तुपकर म्हणाले की,गेल्या २२वर्षापासून शेतकऱ्यांसाठी संघर्ष करीत आहे,त्याचेच फळ म्हणून या जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता आणि शेतकऱ्यांनी मला लोकसभेत अडीच लाख मते दिली.

एका अपक्ष उमेदवाराने अडीच लाख मते घ्यावी ही इतिहासातील पहिलीच वेळ आहे. घाटाखालील मतदारांनी मला साथ दिली असती तर आज चित्र वेगळे असते. परंतु या भागातील लोकांना निकालानंतर पश्चात्ताप झाला.

शेतकरी हीच माझी जात आहे आणि शेतकरी हाच माझा धर्म आहे.मी अजून केवळ शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठीच लढत आलो आणि यापुढेही शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठीच लढत राहील. केस गळती,नख गळतीबाबत अजूनही संशोधन झालं नाही.ते केंद्रीय मंत्रीच काय पंतप्रधान जरी झाले तरी या जिल्ह्याचा जे काही भलं करू शकत नाही, असा टोला तुपकर यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री प्रतापराव जाधव यांना यावेळी यांनी लगावला.

ते म्हणतात मी मोदींच्या जवळ आहे जर ते मोदींच्या एवढे जवळ आहेत तर मग पीक विमा बद्दल,सोयाबीन कापूस भावाबद्दल शेतकऱ्यांच्या कर्जमाफी बद्दल एक शब्द इथे का बोलत नाही असा सवालही यावेळी रविकांत तुपकर यांनी केला.

# भाच्याने दिली मामाला लुटण्याची टीप

## नरसी पोलिसांनी २४ तासांत आरोपींना केली अटक



■ महासागर प्रतिनिधी,
हिंगोली, दि. ११ : मालकाकडे पैसे असून आम्ही हिंगोलीकडे जात आहोत अशी टीप मामाने दिल्यानंतर भाच्याने त्याच्या मित्राच्या मदतीने ब्रम्हपुरी शिवारात जेष्ठ नागरिकाची रक्कम लुटली. या प्रकरणात नर्सी नामदेव पोलिसांनी अवघ्या चोविस तासात मंगळवारी ता. ६ घोटा येथील मामा, भाच्यासह एकास अटक केली असून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली येथील प्रभाकर देशमुख हे त्यांचा चालक रामा राऊत याच्या सोबत दुचाकी वाहनावर रविवारी ता. ४ दुपारच्या सुमारास सेनगाव येथून हिंगोलीकडे येत होते. यावेळी ब्रम्हपुरी पाटीजवळ त्यांचे दुचाकी वाहन आले असतांना दुसऱ्या दुचाकीवर आलेल्या दोघांनी त्यांच्या दुचाकीसमोर दुचाकी आडवी लावली. त्यानंतर प्रभाकर देशमुख यांच्या हातातील दोन लाख रुपये असलेली बॅग व मोबाईल पळविला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे देशमुख घाबरून गेले. त्यांनी दुचाकी चालक रामा यास नर्सी पोलिस ठाण्याकडे चल असे सांगितले. मात्र रामा याने त्यांना हिंगोली येथे घरी आणून सोडले. त्यानंतर देशमुख यांनी सोमवारी ता. ५ नर्सी पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. पोलिसांनी देशमुख यांच्याकडून घटनेची माहिती घेतल्यानंतर सहाय्यक पोलिस निरीक्षकअशोक घारगे, उपनिरीक्षक नागोराव जाधव, जमादार शैलेश चौधरी, किरण चव्हाण, कळंबे, महाजन, राजू पोले यांच्या पथकाने सर्व प्रथम रामा राऊत याचा शोध घेऊन त्याची चौकशी सुरु केली. पोलिसांच्या प्रश?नांच्या भाडीमारामुळे रामा गडबडला अन पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची अधिक चौकशी केली असता त्याने त्याचा भाच्चा राजेश पवार याला टीप दिल्याचे कबुली दिली. राजेश व त्याचा मित्र प्रतिक शेळके यांनीच रक्कम लुटल्याचे कबुल केले. त्यानंतर पोलिसांनी राजेश पवार व प्रतिक शेळके यांना ताब्यात घेतले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून गुन्हयात पळिवलेल्या रकमेपैकी ८३ हजार रुपये व मोबाईल जप्त केला आहे. या शिवाय एक सोन्याची अंगठी, दुचाकी वाहन जप्त केले आहे. पोलिसांनी त्यांची अधिक चौकशी सुरु केली आहे.

# वारकऱ्यांसाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

## जिल्हाधिकाऱ्यांचे यंत्रणांना आदेश





**हिंगोली :** हिंगोली जिल्ह्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यातील यंत्रणांना दिले आहेत. हिंगोली जिल्ह्यातून सुमारे ७० पेक्षा अधिक दिंड्या आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरकडे जातात. या दिंडी सोहळ्यामध्ये हजारो वारकरी सहभागी असतात. या वारकऱ्यांना त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी यंत्रणांना सूचना दिल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने पालखी मार्गावर असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्र आरोग्य उपकेंद्रांची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या भ्रमणध्वनी सह प्रसिद्ध करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या दिंड्यांचा हिंगोली जिल्ह्यात प्रवेश झाल्यानंतर त्यांच्यासोबत पोलिस बंदोबस्त ठेवावा. दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी पोलिस कर्मचारी तैनात करण्याच्या सूचना त्यांनी पोलिस विभागाला दिले आहेत. याशिवाय दिंडीच्या प्रवासामध्ये अडचणी येऊ नये यासाठी वाहतूक व्यवस्थापन करावे आवश्यक त्या ठिकाणी जड वाहनांची वाहतूक वळिवण्याच्या सूचनाही त्यांनी पोलिस विभागाला दिल्या.

दिंडी सोहळा ज्या ठिकाणी मुक्कामी असेल त्या ठिकाणी नगरपंचायत ग्रामपंचायत नगरपालिका प्रशासनाने फिरते स्वच्छतागृह उपलब्ध करावे. तसेच स्वयंपाकाच्या ठिकाणी अग्निशामक यंत्रणा तैनात ठेवावी. मुक्कामाच्या ठिकाणाचा परिसर स्वच्छ ठेवावा. वारकऱ्यांचे मुक्कामासाठी शाळा महाविद्यालयाच्या खोल्या उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. आरोग्य विभागाने पालखी मार्गावरील दवाखाने वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मोबाईल नंबर ची यादी प्रसिद्ध करावी तसेच मुक्कामाच्या ठिकाणी आरोग्य पथक तैनात ठेवावे. वारकऱ्यांच्या आरोग्याकडे लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. त्यासाठी पुरेसा औषधी साठा उपलब्ध ठेवावा अशा सूचना आरोग्य विभागाला दिल्या.

# ‘सक्षम’अंतर्गत शालेय जीवनात उद्यमशीलतेला चालना



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ११ : युवकांमधील उद्योजकतेला चालना देण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच अनुषंगाने शासनाच्या बरोबरीने सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून गत दोन वर्षांत अमरावती जिल्ह्यात शासकीय व अनुदानित शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या माध्यमातून सक्षम हा विशेष उपक्रम राबवण्यात आला. यातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये उद्यमशील मानसिकता विकास कार्यक्रम प्रभावी ठरल्याचे निष्पन्न झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून हा उपक्रम राबवण्यात आला होता. उद्यम लर्निंग फाउंडेशन ही मेकिन महेश्वरी यांनी ना-नफातत्वावर स्थापन केलेली संस्था असून १४ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांमध्ये प्रकल्पाधारित शिक्षणातून उद्यमशील मानसिकता व कौशल्ये विकसित करणे तसेच शिक्षकांना अध्यापनाच्या कौशल्यामध्ये प्रावीण्य मिळवून देणे ही या संस्थेमार्फत राबवण्यात येणाऱ्या ‘सक्षम’ कार्यक्रमाची उद्दिष्टे निश्चित केली होती. विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता, आत्मविश्वास आणि समस्या सोडवण्याची क्षमता वाढवण्यास हा कार्यक्रम मदत करणार असून, या माध्यमातून राज्यातील १७ हजार शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधून ४५ लाख विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. संस्थेने आतापर्यंत १२ राज्यांतील सरकारी शाळा, महाविद्यालय, आयटीआय संस्थांमध्ये २९ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना उद्योजकीय शिक्षण दिले आहे.. महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे १४ लाख युवा मनुष्यबळ दाखल होत असल्याने त्यांच्या हातांना अधिक कौशल्यपूर्ण करण्यासाठी ‘सक्षम’सारख्या कार्यक्रमाच्या माध्यमातून दिले जाणारे प्रोत्साहन अधिक उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. राज्य शासनाच्या यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये समन्वय साधून ‘सक्षम’ सारखे कार्यक्रम अधिक व्यापक पातळीवर राबवल्यास शिक्षणाच्या माध्यमातून उद्योजकतेचा पाया रुजवण्याचे हे एक प्रभावी उदाहरण ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. तत्पूर्वी २०२३-२४ मध्ये नागपूर जिल्ह्यातील निवडक शाळांमध्ये सक्षम उपक्रम राबवण्यात आला. जिल्ह्यातील २१२ शाळांमधील ८ हजार विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रम अमरावती जि. प.च्या २१२ शाळांमधील आठ हजार विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रम राबवण्यात आला असून, २०२५-२६ मध्ये ४०० शाळांमध्ये विस्तार करण्यात येणार आहे. राज्यात १५ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या सक्षम कार्यक्रमामार्फत २५०० हून अधिक व्यवसाय कल्पना सादर करण्यात आल्या, १५०० प्रोटोटाइप तयार झाले, तर ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्पादनांची विक्री केली.

एकूणच विद्यार्थ्यांच्या मनोवृत्तीत सकारात्मक बदल दिसून आला असून, ५०० शिक्षकांना उद्योजकतेसंबंधी प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती उद्यम लर्निंग फाउंडेशनच्या वतीने देण्यात आली आहे.

# शहरामधील अस्वच्छतेवरून मनपा प्रशासनाची कानउघाडणी



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि. ११ : शहरातील कचरा, अस्वच्छता आणि प्रत्येक भागातील साचलेले घाणीचे साम्राज्य याबाबत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात मंगळवारी सकाळी ११ वाजता आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत शहरातील अस्वच्छतेबाबत खा. बळवंत वानखडे यांनी मनपा प्रशासनाची कानउघाडणी केली. तत्पूर्वी, खा. वानखडे व माजी आ. डॉ. सुनील देशमुख यांनी मनपाला भेट दिल्याबद्दल त्यांचा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी शाल व पुष्पगुच्छ देत सत्कार केला. यावेळी खासदारांनी शहरातील कचरा, अस्वच्छता आणि प्रत्येक भागातील घाणीचे साम्राज्य या विषयांवर सविस्तर चर्चा करून संबंधित विभागांना तत्काळ कारवाईचे निर्देश दिले. या बैठकीत पावसाळ्यापूर्वीच्या उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. याबाबत मोहीम हाती घ्यावी, असे निर्देश खासदारांनी दिले. प्रत्येक वॉर्डासह नाले, गटार साफ सफाई करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले. परिसरातील नाल्यांची साफसफाई बाबत आढावा घेतला. परिसरातील निघणाऱ्या कचऱ्याचे नियोजन करून तांत्रिक पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावावी. नाल्यात कचरा फेकणाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, असे उपस्थित काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सुचवले.प्रत्येक अधिकाऱ्याने समन्वयाने काम करावे. कर्मचाऱ्यांनी दिलेली जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडावी. जनतेची कामे वेळोवेळी करून त्यांना सहकार्य करावे, अशी सूचनाही करण्यात आली. या


## Change Of Name

MY OLD NAME WAS **RESHMA BANO MOHD FAROOQUE.** NOW MY NEW NAME IS **RESHAMA SHAHID VIRANI.**
**ADD** : WARD NO.1 JUNI VASTI, BORI, NAGPUR 441108

**I PAYAL SAURABH PUNYANI** CHANGE MY SON NAME IN HIS PASSPORT NO. **P5522309**
OLD NAME WAS **VIHAAN VIG.** NEW NAME IS **VIHAAN SAURABH PUNYANI.**
**ADD** : PLOT NO. 25 RAJ NAGAR SBI COLONY NAGPUR - 440013

MY OLD NAME WAS **RESHMA MOHAMMAD MUSHTAQUE.** NOW MY NEW NAME IS **RESHMA PARVEEN ASHFAQUE AHMED.**
**ADD** : P. NO.843 KAMGAR NAGAR QAMAR COLONY NAGPUR - 440026

**I PANKAJ JAIN** CHANGE MY SON NAME IN HIS PASSPORT NO. **K6777741.**
OLD NAME WAS **PAWAN JAIN** AND NOW NEW NAME IS **PAAWAN JAIN.**
**ADD:** HOUSE NO 5490 NIKALAS MANDIR ROAD ITWARI NAGPUR 440002

I WANT TO CHANGE MY NAME IN MY PASSPORT NO **N8913197**. MY OLD NAME WAS **MOHAMMED ENAMUL HAQUE.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD ENAMUL HAQUE.**
**ADD** : P. N9. 128 GANPATI NAGAR NASHEMAN HOUSING SOCIETY MANKAPUR NAGPUR 440030

MY OLD NAME WAS **SHAIKH GULNAZ TABASSUM AMIR.** NOW MY NEW NAME IS **GULNAZ NASIR ALI.**
**ADD :** PLOT NO.117 RATHOD LAYOUT ANANT NAGAR, KATOL ROAD, NAGPUR-440013

MY OLD NAME WAS **AMANDEEP KAUR SANTOKH SINGH.** NOW MY NEW NAME IS **AMANDEEP KAUR.**
**ADD** : HOUSE NO.658,C/O-15/21, NEAR MANDOVKAR HOSPITAL, LASKARIBAGH, NAGPUR - 440017

MY OLD NAME WAS **MOHAMMAD IQBAL AFSAR.** NOW MY NEW NAME IS **MOHD. IQBAL AFSAR.**
**ADD** : DARZIPURA NAYA BAZAR KAMPTEE 441002

MY OLD NAME WAS **MANPREET SINGH.** NOW MY NEW NAME IS **MANPREET SINGH** AND SURNAME IS **PELIA.**
**ADD** : PLOT NO.59, GURU TEG BAHADUR NAGAR NEAR GURUDWARA, NARI RING ROAD NAGPUR.
PASSPORT NUMBER : **U3323676**


# देशी बिजांचे रोपे तयार करून मोफत वितरण



## २८ वर्षापासून उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी,
खामगाव , दि. ११ : गत २८ वर्षापासून देशी बिजांचे संकलन करुन त्याचे रोपटे स्वनिर्मित रोपवाटिकेत करायचे. तर या रोपटयांसाठी प्लास्टिकच्या पिशव्या स्वत: जमा करुन आणायच्या. त्यामुळे जनावरांच्या पोटात त्या जाणार नाहीत व पर्यावरणाचा समतोलही राखल्या जाईल.

यातून निर्माण झालेले रोपटे मोफत वितरण करायचे काम पर्यावरण प्रेमी संजय गुरव हे करत आहेत. खामगावयेथील संजय गुरव हे नोकरी सांभाळून हा छंद जोपासत आहे. रोपटे तयार करण्यासाठी लागणारी कडुलिंब, साग, करंज, गोंधन, बेल, बाभूळ सिंगापूर कार्नेट, सिसम, भिंगरी, गुलमोहर, आंबा, चिंच, शिवण, सागरगोटी कांचन बहावा आदी देशी जातीचे बीज जंगल टेकड्या आदि ठिकाणी जाऊन गुरव हे संकलित करीत आहे. या कार्यात मंगला गुरव, संदेश गुरव, श्रुती वारकड, मनोज सुळोकार, गणेश कोकाटे, गौरव इंगळे , पल्लवी चंचल, अश्विनी कल्याणी, विजय खंडागळे, संतोष डवले, राजेंद्र राजपूत, गजानन कराळे, सुभाष बोचरे, संजय वाघ, शिवाजी वाघ, वीरेंद्र शहा, चंद्रकांत केडिया, राजेश शर्मा आदींचे सहकार्य लाभले आहे आणि लाभत आहे.

सहा क्विंटल बिजांचे संकलन : संजय गुरव व त्यांच्या सहकाऱ्यांनी ऊन जीवाची पर्वा न करता जंगल टेकड्यावर जाऊन वेगवेगळ्या जातीची सहा क्विंटल बीज संकलित केले आहे. संकलित केलेले हे बीज वाळवून त्याची योग्य निगा राखून वेळेवर त्याचे रोपण केले आहे. आज टेकड्यावरील झाडे पाहून मला मानसिक समाधान मिळत असल्याचे गुरव यांनी सांगितले.

### घराच्या परिसरात नर्सरीची निर्मिती

घराच्या परिसरात गुरव यांनी १९९६ साली नर्सरी श्रमदानातून तयार केली. यामध्ये विशेष करून नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या झाडांबरोबरच ज्या झाडांची नागरिकांना ओळख नाही , अशी रोपे तयार करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. दरवर्षी ते एक हजारच्या वर रोपे तयार करीत आहे. बाजारात एक किलो प्लास्टिकच्या पिशवीत खाण्याचे तेल मिळते.

या पिशव्या जमा करण्यास त्यांचे प्राधान्यक्रम राहिलेले आहे. या पिशव्या वर्षभर खराब होत नाही आणि त्या सडत सुद्धा नाही.

# संत वासुदेव महाराज पालखी सोहळ्याचे भक्तिमय प्रस्थान



■ महासागर प्रतिनिधी,
अकोट , दि. ११ : ‘आमुची मिरासी पंढरी, आमुचे घर भिमातीरी, पांडुरंग आमुचा पिता, रखुमाई आमुची माता’, अशा सर्व संतांच्या माहेर असणाऱ्या पंढरपूर वारीकरिता सर्व संतांप्रमाणेच सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज यांच्या पालखीचे शनिवारी ज्येष्ठ शुद्ध भागवत एकादशीच्या पावन पर्वावर श्री क्षेत्र श्रद्धासागर येथून टाळ, मृदंगाच्या गजरात भक्तिमय प्रस्थान झाले. दरम्यान पहाटे श्रींचा अभिषेक संपन्न होऊन सकाळी प्रस्थानाचे कीर्तन, श्रींच्या रजत मुखवटा व पादुकांचा अभिषेक, फराळ महाप्रसाद घेऊन दुपारी एक वाजता श्रींचा भव्य दिव्य पालखी सोहळा रथयात्रा निघाली. पालखी मार्गाने ज्ञानोबा तुकाराम, ॐ वासुदेव नमो नमः तथा अनेक संतांच्या अभंग गायन भजनानंदात पालखी सोहळा मार्गस्थ झाला. अकोटवासियांनी ठिकठिकाणी सडा संमार्जन, रांगोळ्या, पुष्पवृष्टी करून गुरुवर्य श्री संत वासुदेव महाराज यांचे श्रद्धापूर्वक स्वागत केले. हरिनामाच्या गजराने अकोट नगरी दुमदुमली होती. पताकधारी दिंडीच्या मागे स्वानंद सुख निवासी सद्गुरु श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्रीक्षेत्र आळंदी देवाची अंतर्गत महाराष्ट्रामध्ये सर्वात प्रथम उपशाखा असलेल्या श्री संत वासुदेव महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्रीक्षेत्र श्रद्धासागर, अकोट येथे अलिकडेच निवड झालेले सर्व विद्यार्थी वारकरी पोशाखामध्ये पावल्या व अभंग गायन करत असताना बघून अकोटचे वैभव वृद्धिंगत होत असल्याच्या भावना भाविकांमध्ये व्यक्त झाल्या.

पालखी सोहळा प्रस्थान प्रसंगी संस्थाध्यक्ष श्री वासुदेवराव महाराज महल्ले यांचे प्रस्थानाचे कीर्तन झाले. पालखी प्रस्थान सोहळ्याकरिता विश्वस्त मंडळाचे महादेवराव ठाकरे, पुरुषोत्तम लाजुरकर, रवींद्र वानखडे, मोहनराव जायले, अविनाश गावंडे, सुनंदाताई आमले, अशोकराव पाचडे, जयदीप सोनखासकर, नंदकिशोर हिंगणकर, शिरीष ढवळे, अनिल कोरपे, केशवप्रसाद राठी, गजाननराव दुधाट यांसह दिंडी व्यवस्थापक अंबादास महाराज मानकर, विष्णू महाराज गावंडे, राम महाराज गाढे, सागर महाराज परिहार, तेजराव महाराज म्हसाये, रथसारथी मदन महाराज मोहोकार, बाळकृष्ण आमले, प्रा. साहेबराव मंगळे, सुरेंद्र चिकटे, बाळकृष्ण वाकोडे, अमोल मानकर, दिलीप कुलट, महादेवराव बोरोकार, श्रीराम कोरडे, ज्ञानेश्वर नराजे, नागोराव बायस्कार, यांसह गावोगावची असंख्य महिला पुरुष भक्तमंडळी उपस्थित होती.

श्रींच्या पालखी सोहळ्याचे क्षेत्र श्रद्धासागर येथे राहुल हिंगणकर अकोट, हरिओम सुभाषराव ठाकरे? राजूरा, श्रीमती ललितादेवी किशोर अग्रवाल रिधोरा यांनी वारकऱ्यांना फराळ सेवा देऊन त्याचप्रमाणे पालखी मार्गाने कालवाडी फाटा -अनंतराव हिंगणकर, श्री शिवाजी कॉलेज -सुशील पुंडकर मित्र परिवार, उज्व नगर - पुरुषोत्तम लाजुरकर नंदकिशोर जांभुळकर, सरस्वती नगर -अविनाश सावरकर, शनिवारा -सुरज धनंजय वाघ, कालंका चौक माजी आमदार संजय गावंडे, बिट्टू पाचडे, श्री नरसिंह मंदिर प्रांगण -डॉ. सुहास कुलट, श्रद्धा स्थळ -दिलीप बोचे, श्री संत वासुदेव महाराज निवासस्थानी - माधवराव मोहोकार, जवाहर रोड -गुरुनानक किराणा रामूसेठ पारवाणी, निशांत सहकारी पतसंस्था, पुष्पांजली मंगल कार्यालय -पुष्पाताई दादारावजी पुंडेकर आदी भक्तांनी ठिकठिकाणी चहा, फराळ, फळ आदी अर्पण करून वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली.

# घोरगवरी येथील जबरी चोरीतील लुटारू अद्यापही मोकाट

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगोली, दि. ११ : सेनगाव तालुक्यातील घोरदरी येथील जबरी चोरी प्रकरणात पोलिस यंत्रणा मागील चार दिवसांपासून गावात ठाण मांडून बसली आहे. आता पर्यंत पोलिसांनी १५ जणांची चौकशी केली असून कुठलेही धागेदोरे हाती लागत नसल्याने पोलिसांनी आता विदर्भाकडे मोर्चा वळवला आहे. दुसरीकडे घटनेतील आरोपींच्या अटकेपर्यंत पथकांनी परत येऊ नये अशा स्पष्ट सूचना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिल्या आहेत. सेनगाव तालुक्यातील घोरदरी गावालगत असलेल्या माणिक साबळे यांच्या घरी शुक्रवारी ता. ६ पहाटे चार चोरट्यांनी हाती चाकू घेऊन जबरी चोरी केली.

यामध्ये चोरट्यांनी माणिक साबळे व त्यांचा मुलगा अशोक साबळे यांना मारहाण केली. तर महिलांना चाकूचा धाक दाखवून त्यांच्या अंगावरील दागिने व घरातील पेटीत ठेवलेली ३.५० लाख रुपयांची रोख रक्कम असा ४.१७ लाखांचा मुद्देमाल पळवला. या प्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. दरम्यान, घटनास्थळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकासह सेनगाव पोलिस ठाण्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी श्वान पथकाला पाचारण केले होते. मात्र घटनास्थळी कुठलीही वस्तू मिळाली नसल्याने श्वान पथकाचा उपयोगच झाला नाही.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# 'हाऊसफुल ५' १०० कोटींच्या क्लबमध्ये?

२०२५ हे वर्ष बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमारसाठी लाभदायी ठरले आहे. या वर्षी त्याचा तिसरा चित्रपट प्रेक्षकांकडून खूप प्रेम मिळवत असल्याचे दिसून येत आहे. साजिद नाडियाडवालाचा हिट फ्रँचायझी चित्रपट 'हाऊसफुल ५' अलिकडेच प्रदर्शित झाला. यावेळी नाडियाडवालाने चित्रपटाला सर्वोत्कृष्ट बनवण्यात कोणतीही कसर सोडलेली नाही. चित्रपट वेगवेगळ्या क्लायमॅक्ससह प्रदर्शित झाला. रिलीज होण्यापूर्वीच त्याबद्दल बरीच चर्चा होती. यात अक्षय कुमार, अभिषेक बच्चन आणि रितेश देशमुख यांच्यासह अनेक प्रसिद्ध चेहरे आहेत. चित्रपटाला आयएमडीकडून ४.० रेटिंग मिळाले. सुरुवातीला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला. पण आता तो प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यशस्वी होताना दिसत आहे. 'हाऊसफुल'च्या या पाचव्या भागात अनेक खास गोष्टी पाहायला मिळत असून मागील भागातील काही दृश्ये 'हाऊसफुल ५' मध्ये दाखवण्यात आली आहेत. यामुळे कथेत एक कनेक्शन दिसते. बॉबी देओलच्या प्रवेशाने थिएटरमध्ये लोक आश्चर्यचकित होतात. तो चित्रपटाच्या क्लायमॅक्समध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो कारण आणि त्याच्या एका घोषणेने जहाजावर उपस्थित असणाऱ्या सर्व लोकांचे नशीब उजळते. अर्थात चित्रपटाच्या कथेची आणि सस्पेन्सची माहिती तुम्हाला 'हाऊसफुल ५' पाहिल्यानंतरच मिळेल.

अक्षय कुमारच्या या चित्रपटाने पहिल्या दिवशी भारतात २४ कोटींचा गल्ला जमवला. शनिवारी कलेक्शन वाढले आणि हा आकडा ३१ कोटींवर पोहोचला. रविवारीही त्याने चांगली कामगिरी केली. यानंतर हा चित्रपट आता १०० कोटींच्या अगदी जवळ पोहोचला आहे.

# ग्लॅम वर्ल्ड



# ...मग ही तर पर्वणीच

'बाहुबली' आणि 'आरआरआर' सारख्या सुपरहिट चित्रपटांनंतर आता चाहते एसएस राजामौलीच्या पुढच्या चित्रपटाची वाट पाहत आहेत. सध्या ते महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा यांच्यासोबत एक जंगल ॲडव्हेंचर बनवत आहे. ताजी बातमी म्हणजे यात 'रहना है तेरे दिल में' फेम अभिनेता आर माधवनचा प्रवेश निश्चित झाला आहे.

आर माधवन या १,००० कोटींच्या महाकाव्यात्मक चित्रपटात अत्यंत मजबूत भूमिका साकारू शकतो, असे म्हटले जात आहे. तथापि, निर्मात्यांनी अद्याप याची पुष्टी केलेली नाही. पृथ्वीराज सुकुमारन देखील या चित्रपटात आहे. तेव्हा माधवन यात दिसला तर राजामौली आणि माधवन एकत्र काम करण्याची ही पहिलीच वेळ असेल. स्वाभाविकच प्रेक्षक या पर्वणीची वाट पहात आहेत.

राजमौली यांच्या या बहुचर्चित चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता असली तरी त्याबद्दल सर्व काही अतिशय गुप्त ठेवले जात आहे. हा एक ॲक्शन–ॲडव्हेंचरपट असेल, एवढीच माहिती समोर येत आहे. राजामौली यांनी २०२४ मध्येच केनियामध्ये एक लोकेशन पाहून ठेवले होते. कदाचित आता या चित्रपटाचा काही भाग तेथे शूट केला जाऊ शकतो. या चित्रपटाचे संगीत एमएम कीरावानी यांच्या हाती आहे. यापूर्वी त्यांनी 'आरआरआर' मधील 'नाटू नाटू' साठी ऑस्कर जिंकला आहे.

या व्यतिरिक्त आर. माधवन 'आप जैसा कोई' या प्रोजेक्टवर देखील काम करत आहे. यामध्ये फातिमा सना शेख त्याच्यासोबत पडदा शेअर करत आहे. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. तेव्हा आर. माधवन यांच्या चाहत्यांसाठी ही आनंदाची बाब ठरु शकते.

# वाद चिघळला आणि...

दक्षिणेतील सुपरस्टार कमल हासन यांचा बहुप्रतिक्षित 'ठग लाईफ' देशभरात प्रदर्शित झाला असला तरी वादांमुळे तो कर्नाटकात प्रदर्शित होऊ शकलेला नाही. या चित्रपटाला कर्नाटकात मोठ्या प्रमाणात निषेध नोंदवला गेला. पुढे तो इतका वाढला की थिएटर मालकांना धमक्या येऊ लागल्या. परिस्थितीचे गांभीर्य पाहून कर्नाटक थिएटर असोसिएशनने सुरक्षेची मागणी करत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. परंतु न्यायालयाने त्यावर त्वरित सुनावणी घेण्यास नकार दिला. त्यामुळेच ही बाब सध्या चांगलीच चर्चेत आहे. सिनेमागृहांना सुरक्षा प्रदान करण्याची मागणी मान्य झाली असती तर चित्रपटाचे सुरक्षित प्रदर्शन शक्य झाले असते. मात्र तसे न झाल्याने मोठा फटका सहन करावा लागत आहे, असे म्हणावे लागेल.

या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने तात्काळ दिलासा देण्यास नकार दिला आणि याचिकाकर्त्यांना प्रथम कर्नाटक उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. 'तुम्ही प्रथम राज्याच्या उच्च न्यायालयाशी संपर्क साधावा. आम्ही या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करू शकत नाही...' असे मत त्यांनी व्यक्त केले.

'ठग लाईफ' वरील हा वाद कसा सुरू झाला हे वाचक जाणतात. कमल हासन यांनी चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान कन्नड भाषेबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केली, आणि तेव्हापासून हा मुद्दा चिघळला. या टिप्पणीनंतर कर्नाटकात त्यांच्या विरोधात निदर्शने सुरू झाली आणि अनेक संघटनांनी त्यांच्या चित्रपटाच्या प्रदर्शनावर बंदी घालण्याची मागणी केली. या प्रकरणी अभिनेत्याला माफी मागण्यास सांगण्यात आले होते, परंतु त्यांनी माफी मागितली नाही. त्यामुळे कर्नाटकात त्यावर बंदी घालण्यात आली. त्याचमुळेच कमल हासन यांचा हा चित्रपट पाच जून रोजी देशभरात प्रदर्शित झाला असला तरी कर्नाटकातील प्रेक्षकांपुढे तो येऊ शकलेला नाही.



# कसा असेल 'अखंड २'

नंदमुरी बालकृष्ण आगामी चित्रपटांमुळे सध्या चांगलेच चर्चेत आहेत. काही हिट चित्रपटांच्या सिक्वेलची सर्वांनाच उत्सुकता आहे. त्यांचा 'अखंड' २०२१ मध्ये प्रदर्शित झाला होता. प्रेक्षकांना त्यांचे काम खूप आवडले होते. आता ते त्याच्या सिक्वेलने सर्वांचे मन जिंकण्यास सज्ज आहेत. 'अखंड २' प्रदर्शित होण्यासाठी सज्ज असून निर्मात्यांनी टीझर रिलीज करून सगळ्यांनाच आश्चर्यचकित केले आहे.

ज्येष्ठ तेलुगू अभिनेता नंदमुरी बालकृष्ण आणि दिग्दर्शक बोयापती श्रीनु यांनी 'अखंड २' साठी पुन्हा एकदा हातमिळवणी केली आहे. यापूर्वी दोघांनीही तीनदा प्रोजेक्टवर काम केले आहे. अशातच त्यांच्या आगामी चित्रपटाचा अद्भुत टीझर रिलीज झाला आहे.

'अखंड २' ची निर्मिती राम अचंता आणि गीपचंद अचंता यांनी केली आहे. प्रदर्शित झालेल्या टीझरमध्ये बालकृष्ण पूर्णपणे नवीन अवतारात दिसत असून त्यामध्ये आध्यात्मिक प्रतिमेसह जोरदार ॲक्शन दिसून येते. यामध्येही त्यांचे पात्र पहिल्या भागात होते तसेच दिसले आहे. टीझर पाहिल्यानंतर सोशल मीडियावरील वापरकर्त्यांनी भरघोस प्रतिक्रिया दिल्या असून अभिनेत्याच्या कामाचे कौतुकही केले आहे.

'अखंड २' चा टीझर पाहिल्यानंतर, चित्रपटप्रेमींमध्ये याबद्दलची उत्सुकता वाढली आहे. नंदमुरीच्या चाहत्यांनीही टीझरला पसंती देण्यास सुरुवात केली आहे. रिलीज तारखेबद्दल बोलायचे झाले तर प्रेक्षकांना चित्रपटासाठी जास्त वाट पाहावी लागणार नाही. हा चित्रपट २५ सप्टेंबर २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. त्याच्या पहिल्या भागाबद्दल बोलायचे तर 'अखंड' ने बॉक्स ऑफिसवर १०० कोटींहून अधिक कमाई केली होती. आता त्याचा सिक्वेल कशी कामगिरी करतो हे पाहणे मनोरंजक असेल.



# हिनाचे हात मेहंदीने सजले

'ये रिश्ता क्या कहलाता है' मधील 'अक्षरा' म्हणजेच हिना खानने प्रियकर रॉकी जयस्वालशी अचानक लग्न करून सर्वांनाच आश्चर्यचकित केले. तिने रॉकीबरोबर साधेपणाने आणि कोणत्याही डामडौलाशिवाय लग्न केले असले तरी त्यांची झलक सोशल मीडियावर प्रचंड वेगाने पसरली.

हिना खान आणि रॉकी जयस्वाल हे लोकप्रिय टीव्ही जोडपे आहे. दोघांनीही नेहमीच परस्परांमधील नाते सार्वजनिकरित्या स्वीकारले आहे. पण ते अचानक आणि इतक्या साध्या पद्धतीने लग्न करतील असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र त्यांनी अगदी साध्या पद्धतीने लग्न केले. इतकेच नाही तर या अभिनेत्रीने लग्नाचा लूकही अगदी मिनिमलिस्ट ठेवला होता.

मात्र आता तिने लग्नाचा लूक मिनिमलिस्ट का ठेवला हे सांगितले. तिने लग्नाचे नवीन फोटो शेअर केले असून त्यात ती खूप सुंदर दिसते. तिने लग्नाच्या दुपट्ट्यावर 'हिना आणि रॉकी' असे लिहिलेले दाखवले आहे. हे फोटो शेअर करताना हिनाने लेहेंगा, भारी दागिने आणि भारी मेकअपऐवजी लग्नाचा साधा लूक का निवडला हे सांगितले. तिने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, या सुंदर दिवशी मी मिनिमलिस्ट राहायला हवे होते तितके राहू शकले, याचा आनंद आहे. कोणताही हेवी लेहेंगा नाही, जास्त मेकअप नाही किंवा जड दागिने नाहीत, मोठी केशरचना नाही किंवा जास्त ॲक्सेसरीजही नाहीत. मला यापैकी काहीही करण्याची गरज नव्हती कारण मी आतून समाधानी होते. माझ्यासाठी तेवढेच महत्त्वाचे होते...!

हिना खानने लग्नात मनीष मल्होत्राने डिझाइन केलेली ओपल ग्रीन रॉ सिल्क साडी नेसली होती. त्यामध्ये ती कमालीची सुंदर दिसत होती. तिच्या लूकला कमीत कमी दागिन्यांनी स्टाईल केले गेले होते. रॉकीने मनीष मल्होत्राने डिझाइन केलेला ऑफ व्हाइट कुर्ता–पायजमा घातला होता.



# थोडी वाट बघा

बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री नीना गुप्ता आपल्या वाढदिवसाच्या जंगी पार्टीमुळे, त्यातील पेहरावामुळे प्रकाशझोतात राहिल्या. यात मुलगीही मागे नाही. डिझायनर मसाबा गुप्ता नुकतीच आई झाली आहे. काही महिन्यांपूर्वी तिने पहिल्या मुलाचे स्वागत केले. पण आता दुसऱ्या गरोदरपणाच्या बातमीमुळे पुन्हा एकदा तिच्याबाबत चर्चा होत आहे. अलीकडेच तिचा एक व्हिडिओ व्हायरल झाला असून ती गरोदर असल्याच्या अटकळींना उधाण आले आहे. चाहत्यांपासून माध्यमांपर्यंत सर्वजण मसाबा गुप्ता पुन्हा आई होणार आहे का? हा एकच प्रश्न विचारत आहेत.

नुकतेच सोनम कपूरने तिच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त एका पार्टीचे आयोजन केले होते. त्यावेळी बॉलिवूड आणि फॅशन इंडस्ट्रीतील अनेक प्रसिद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. करीना कपूर, जान्हवी कपूर,



शिल्पा शेट्टी आणि इतर मोठ्या स्टार्सबरोबर मसाबा गुप्ता देखील पती सत्यदीप मिश्रासोबत पार्टीला पोहोचली होती. हे जोडपे पार्टीतून बाहेर पडले आणि त्यांनी पापाराझींसमोर पोज दिली तेव्हा लोकांचे लक्ष मसाबाच्या लूककडे गेले. त्यानंतर ती पुन्हा एकदा आई होणार असल्याची बातमी पसरली.

पार्टीत मसाबाने काळ्या रंगाचा बॉडीकॉन ड्रेस घातला होता आणि त्यावर सुंदरसे जॅकेट देखील घातले होते. मात्र या पोशाखात तिचे पोट थोडे मोठे दिसत होते. ते पाहून अनेकांनी ती दुसऱ्यांदा गर्भवती असल्याचा अंदाज बांधला. व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच मसाबाच्या गरोदरपणाबद्दल बोलले जाऊ लागले. काही वापरकर्त्यांनी तिचे थेट अभिनंदन करण्यास सुरुवात केली तर काहींनी याला केवळ गैरसमज म्हटले. तथापि, आतापर्यंत मसाबा किंवा तिच्या कुटुंबाकडून या विषयावर कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही. त्यामुळे चाहत्यांनी आनंदाच्या बातमीसाठी थोडी वाट पहावी हे उत्तम.

# नावात बदल?

विवेक अग्निहोत्री चित्रपटांमधून महत्त्वाचे विषय मांडण्यासाठी ओळखले जातात. 'द काश्मीर फाइल्स'च्या यशानंतर त्यांना असे अनेक चित्रपट बनवण्याची संधी मिळाली असून सध्या ते 'दिल्ली फाइल्स'वर काम करत आहेत. मध्यंतरी याची घोषणा करण्यात आली होती. पण आता चर्चा आहे की, अग्निहोत्री यांच्या आगामी चित्रपटाचे नाव पूर्वी सांगितलेल्या नावासारखे नसेल.

'द ताश्कंद फाइल्स' आणि 'द काश्मीर फाइल्स' सारख्या चित्रपटांसाठी प्रसिद्ध असणारे हे चित्रपट निर्माते आता चित्रपटाचे नाव बदलण्याची योजना आखत आहेत. मग प्रश्न असा उद्भवतो की, सर्व गोष्टी निश्चित झाल्यानंतर चित्रपटाचे शीर्षक बदलण्याची गरज का पडली? हा प्रश्न अद्याप तरी अनुत्तरित आहे.

विवेक अग्निहोत्री यांना पुढील चित्रपटाचे नाव 'द बंगाल फाइल्स' असे ठेवता येईल. यामागील कारण म्हणजे चित्रपटाची संपूर्ण कथा बंगालच्या इतिहासावर आधारित असणार आहे. अशा परिस्थितीत दिल्लीचे नाव कथेशी जुळणार नाही. विवेक अग्निहोत्री यांनी नुकतेच त्यांच्या इंस्टाग्राम स्टोरीवर एक फोटो शेअर केला आणि लिहिले की, 'तुम्हापैकी अनेकांनी 'द दिल्ली फाइल्स' किंवा 'द बंगाल फाइल्स' या नावावर प्रतिक्रिया शेअर केली आहे. मात्र आता माझ्याकडे एक मोठी अपडेट आहे, पण मी आत्ता त्याबद्दल माहिती देणार नाही. त्यासाठी तुम्ही वाट पाहा.'

या चित्रपटाचा टीझर आधीच प्रदर्शित झाला आहे. त्यात बंगालमधील एक दुखद घटना दाखवण्यात आली आहे. चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारा अभिनेता मिथुन चक्रवर्तीची झलकही त्यात पाहायला मिळते. हा अभिनेता जळलेल्या जिभेने भारतीय संविधानाची प्रस्तावना वाचत असल्याचे टीझरमध्ये बघायला मिळाले. यावरूनच त्याला काही वेदनादायक घटनांना सामोरे जावे लागले आहे, हे स्पष्ट होते. चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेबद्दल बोलताना, निर्मात्यांनी २०२५ च्या अखेरीस तो मोठ्या पडद्यावर आणण्याची योजना आखली असल्याचे स्पष्ट केले. त्यात अनुपम खेर आणि पल्लवी जोशी मुख्य भूमिकेत दिसतील. मात्र सध्या सर्वांना अग्निहोत्रींच्या नावाच्या घोषणेची उत्सुकता आहे.



# येतो आहे 'बिग बॉस १९'

चाहते टीव्हीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो 'बिग बॉस'च्या नवीन सीझनची आतुरतेने वाट पाहत आहेत. 'बिग बॉस' चाहत्यांना होस्ट म्हणून सलमान खान खूप आवडतो. एकंदरच सध्या 'बिग बॉस १९' बद्दल चर्चा सुरू असून तो आतापर्यंतचा सर्वात मोठा सीझन असेल असे म्हटले जात आहे. हा शो सुमारे पाच महिने चालेल. निर्मात्यांनी स्पर्धकांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. अपडेट असे की, निर्मात्यांनी शोसाठी एका प्रसिद्ध युट्यूबरशी संपर्क साधला आहे.

'बिग बॉस १९' बद्दल सुरुवातीला सोशल मीडियावर म्हटले जात होते की यावेळी कोणत्याही युट्यूबर किंवा सोशल मीडिया स्टार्सशी संपर्क साधला जाणार नाही. तथापि, आता दिसते की ती फक्त अफवाच होती कारण एका प्रभावशाली व्यक्तीचे नाव सतत या शो शी जोडले जात आहे. मुख्य म्हणजे तो तुरुंगवास आणि घटस्फोटामुळे चर्चेत राहिलेला आहे.




'बिग बॉस' च्या इंस्टाग्राम पोस्टनुसार, सलमान खानच्या या शोसाठी 'फ्लाइंग बीस्ट' नावाचे चॅनल चालवणाऱ्या युट्यूबरला ऑफर देण्यात आली आहे. तो कधीकधी घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत येतो तर कधी अन्य एखाद्या कारणासाठी त्याच्या नावाची चर्चा असते. एकदा तर तो वाढदिवस साजरा करण्यासाठी तुरुंगात गेला होता. तर हा युट्यूबर दुसरा तिसरा कोणी नसून गौरव तनेजा आहे. त्यालाच 'बिग बॉस' ची ऑफर देण्यात आली आहे. तथापि, अद्याप यासंबंधीची कोणतीही अधिकृत पुष्टी झालेली नाही.

# महायुती म्हणून एकत्र लढणार

## युतीबाबत चंद्रशेखर बावनकुळेंचे विधान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :
महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका पार पडणार आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पक्षांनी जोरदार तयारी देखील सुरू केली आहे. या निवडणुका महायुती एकत्र लढणार की वेगवेगळे लढणार यावर महसूल मंत्री व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे विधान केले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुकीतील युतीबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले, राज्यातील सर्व निवडणुका आम्ही एकत्र महायुती म्हणून लढणार आहोत. याबाबतचे आदेश आम्ही पक्षातील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना दिले आहेत.

आमचे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते एकमेकांशी याबाबत चर्चा करत आहेत. जर एखाद्या ठिकाणी एखाद्या जागेवरून वाद निर्माण झाला तर त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल. मात्र इतर ठिकाणी युतीत निवडणुका लढल्या जातील, त्यामुळे संभ्रम बाळगण्याची गरज नाही.

दरम्यान, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी युतीबाबत बोलताना म्हटले की, स्थानिक स्वराज्य संस्थानच्या निवडणुका आम्ही एकत्र लढणार आहोत, शक्य असेल तिथे युती केली जाईल. मात्र, शक्य नसेल तिथे आपण आपल्या ताकदीवर लढू. आतापासूनच कार्यकर्त्यांनी तयारीला लागले पाहिजे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे.

अलीकडेच राज्य सरकारने महापालिकांना प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता प्रशासनाकडूनही या निवडणुकांची तयारी केली जात आहे. त्यामुळे या निवडणुका लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.



**महायुती म्हणून आम्ही निवडणूक लढणार**
आमची भूमिका पक्की आहे, महायुती म्हणून आम्ही निवडणूक लढणार आहोत. मात्र, एखाद्या ठिकाणी जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढत होईल, असे विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या विधानाला मुख्यमंत्र्यांनी दुजोरा दिला आहे.

*राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार असून, पुढील काही महिन्यातच या निवडणुका होणार आहेत. महायुतीत सहभागी तीन पक्षात विसंवाद असल्याची चर्चा सुरू असताना अजित पवार यांनीही आपण महायुतीत जागेचे व टप करून लढू असे स्पष्ट केले. दुसरीकडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील कोणतीही कटुता नसून एकत्रच लढणार असल्याचे माध्यमांसमोर सांगितले आहे.*

# उपोषणादरम्यान बिघडली बच्चू कडूंची प्रकृती

## आंदोलनाचा चौथा दिवस : मनोज जरांगेंनी घेतली भेट : दिव्यांगांचे मंत्रालयासमोर आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ११ :
प्रहार संघटनेचे अध्यक्ष आणि माजी आमदार बच्चू कडू यांचे अमरावतील अन्नत्याग आंदोलन सुरू आहे. बच्चू कडूंना समर्थन देण्यासाठी प्रहारच्या दिव्यांग कार्यकर्त्यांकडून मुंबईत मंत्रालयासमोर आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान, पोलिसांनी प्रहारच्या कार्यकर्त्यांना अटक केली. तिकडे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी बच्चू कडू यांची उपोषणस्थळी भेट देत तब्येतीची काळजी घेण्याची विनंती केली. यावेळी त्यांनी बच्चू कडूंच्या मागण्या मान्य करण्याची मागणी सरकारकडे केली.

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन पुकारले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आजचा चौथा दिवस आहे. अन्नाचा कणही पोटात न गेल्याने बच्चू कडू यांची प्रकृती खालावली असून सुमारे ३ ते ४ किलो वजन घटले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आज बच्चू कडू यांची आंदोलनस्थळी भेट घेतली. यावेळी वनराईचे गिरीश गांधी उपस्थित होते.

बच्चू कडू आपल्या गोरगरीबांसाठी अनेक वर्षांपासून मोठ्या ताकदीने आणि हिमतीने संघर्ष करत आहेत. बच्चू भाऊंनी तब्येतीची काळजी घेतली पाहिजे. आंतरवालीत येऊन ते मला तब्येतीची काळजी घेण्यास सांगतात. मी इथे येऊन त्यांना तब्येतीची काळजी घेण्यास सांगतो. बच्चू भाऊंनी अन्नत्याग आंदोलनाचे माझे हत्यार उगाच घेतले. तुमचे पहिले हत्यार चांगले होते, असे मनोज जरांगे म्हणाले.

बच्चू भाऊ एकटे नाहीत. इथे प्रत्येक जण येत असेल. भाषण ठोकून जात असेल. पाठिंबा देत असतील. ही प्रथा या राज्याची अगोदर मोडली पाहिजे. प्रत्यक्ष रस्त्यावर प्रत्येकाने उतरले पाहिजे. कुठल्या बाबतीत न्याय मिळवायचा असेल, तर प्रत्यक्षात रस्त्यावर यावे लागते. आज बच्चू भाऊ आपल्यासाठी जीव द्यायला तयार असतील, तर समाजाने सगळ्या शेतकरी ताकदीने रस्त्यावर उतरले पाहिजे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले.

तुमच्या मागण्या मान्य नाही केल्या, तर बघा आम्ही काय करतो. आम्ही सगळे तुमच्या सोबत आहोत. सरकारला सळो की पळो करून सोडतो. आमच्यात तेवढी ताकद आहे, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

देवेंद्र फडणवीस साहेबांनी लक्षात ठेवावे, विरोधाला विरोध करायचा अशांपैकी आम्ही नाही. मी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सांगतो, तुम्ही बच्चू भाऊंच्या मागण्यांची तातडीने दखल घ्या. फोनाफोनी बंद करा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी यावेळी बोलताना केली.





### मंत्रालयासमोर आंदोलन

बच्चू कडू यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दिव्यांगांनी मुंबईत मंत्रालयासमोर आंदोलन केले. यावेळी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले. यावरून बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. कार्यकर्त्यांना त्रास दिल्यास मुंबई गाठू, असा इशारा बच्चू कडू यांनी सरकारला दिला आहे.

### बच्चू कडूंच्या प्रमुख मागण्या

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी.
दिव्यांग व विधवा महिलांना रु. ६०००/- मानधन देण्यात यावे.
आपत्कालीन संकटमुळे शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफ करून शेतमालाला किमान दरावर २०% अनुदान देण्यात यावे.
दिनांक ६ एप्रिल २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार शासन निर्णय काढण्यात यावे.
वंचित घटकांना वगळता सर्व गोरगरीब समांतर राहणा?या व सन्मानजनक वागणूक हवी असलेल्या व सध्या विविध अडचणीत असलेल्या घटकांनाही सन्मानजनक घरकुल द्यावे.
शहरासारख्या ग्रामीण भागातील घरकुलासाठीही समान निकष लागू करून किमान रु. ५ लाख अनुदान घरकुल लाभार्थ्यांना देण्यात यावे.
आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना स्वतंत्र मंडळ स्थापून रु. १० लाख आर्थिक मदत व संपूर्ण कर्जमाफी द्यावी.
रोजंदारी करणाऱ्या सर्व मजुरांना एमआरईजीएस मध्ये घेण्यात यावे तसेच फळपीकांत ३:५ प्रमाण लागू करून एमआरईजीएस मध्ये जोडण्यात यावे.
दररोज होणाऱ्या श्रमाच्या बदल्यात रु. १०००/- मजुरी दिली जावी.
संजय गांधी योजनेत पात्र लाभार्थ्यांना तात्काळ संपूर्ण मंजूर रक्कम देण्यात यावी.
शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना स्वतंत्र शिष्यवृत्ती योजना लागू करून उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती द्यावी.
१००% दिव्यांग व अपंग व्यक्तींना शासकीय नोकरीत ५% आरक्षण देण्यात यावे.
शासकीय नोकर भरतीत इतर मागास प्रवर्गचे आरक्षण २७% ठेवावे.
शेतमाल विमा योजनेचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर द्यावा. विमा हप्त्याचे ५०% पेक्षा जास्त शुल्क शासनाने द्यावे.

# सरकार आणि प्रशासनात पैसे खाण्यासाठी शेतकऱ्यांचा वापर

## वडेट्टीवार यांचा गंभीर आरोप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :
गेल्या काही महिन्यात मराठवाड्यात विशेषतः जालना जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि गारपिटीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात घोटाळा करून ३५ कोटी हडप केल्याचा आरोप केला जात आहे. यावरुन काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.

या संदर्भात विजय वडेट्टीवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून या प्रकरणाची माहिती शेअर केली आहे. जालना जिल्ह्यातील २६ तलाठ्यांनी अतिवृष्टी आणि गारपिटीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात घोटाळा करून ३५ कोटी हडप केल्याचा आरोप यात करण्यात आला आहे.

तसेच ज्या तलाठ्यांनी हा भ्रष्टाचार केला त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे, या तलाठ्यांकडून वसुली करून शेतकऱ्यांचा पैसा त्यांना मिळायला हवा अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.



जालना जिल्ह्यातील २६ तलाठ्यांनी अतिवृष्टी आणि गारपिटीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपात घोटाळा करून ३५ कोटी हडप केल्याची घटना पुढे आली आहे. सरकार आणि प्रशासनात पैसे खाण्यासाठी शेतकऱ्यांचा वापर कसा होत आहे ह्याचे हे उत्तम उदाहरण आहे. त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो..

## पित्याने टोचले पोराचे कान

■ वृत्तसंस्था, धाराशिव, दि. ११ :
मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो. मी नितेशला समज दिली आहे, असे भाजप खासदार नारायण राणे यांनी म्हटले आहे.

भाजप आमदार व मंत्री नितेश राणे यांनी काही दिवसांपूर्वी धाराशिव येथे बोलताना महायुतीमध्ये भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप आहे, असे वक्तव्य केले होते. त्यावरून महायुतीमध्ये अंतर्गत वाद पेटला होता. त्यानंतर नीलेश राणे यांनी देखील ट्विट करत नितेश राणे यांना विधाने जपून करावीत असा सल्ला दिला होता. आता नारायण राणे यांनी देखील समज दिल्याचे समजते.



नारायण राणे म्हणाले, मुख्यमंत्री कोणाचा बाप नसतो. मी नितेशला समज दिली आहे. मुख्यमंत्री हा जनतेचा सेवक असतो. कोणाचा निधी अडवणे हे चुकीचे आहे, त्याबद्दल मी सूचना देणार असल्याचे देखील राणे यांनी म्हटले आहे.

### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह ९ मंत्र्यांच्या उपस्थितीत

# आज राष्ट्रवादी काँग्रेसचा संकल्प मेळावा

## माजी आमदार सानंदासह २५ हजार कार्यकर्त्यांचा प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. ११ :
उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे गुरुवार १२ जून रोजी खामगाव शहराच्या दौऱ्यावर येत असुन अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ९ मंत्र्यांच्या उपस्थितीत सायंकाळी ५ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिषद मैदान येथे राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा भव्य संकल्प मेळावा व पक्ष प्रवेश सोहळा संपन्न होणार आहे.

याप्रसंगी खामगाव विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांच्यासह अनेक आजी-माजी जिल्हा परिषद , पंचायत समिती सदस्य, लोकप्रतिनिधी यांच्यासह बुलढाणा जिल्हयातील अनेक दिग्गज नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश करेणार आहेत.

खामगाव विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ११ हजार क्रियाशिल सदस्यांची नोंदणी करुन त्यांच्या नावांची यादी प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांना सुपुर्द करण्यात येणार आहे.




याप्रसंगी खासदार प्रफुलभाई पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, बाबासाहेबजी पाटील, हसन मुश्रीफ, माणिकराव कोकाटे, अदिती तटकरे, पालकमंत्री मकरंद जाधव पाटील, इंद्रनील नाईक, सौ. रुपालीताई चाकणकर, संजय खोडके , अमोलजी मिटकरी,आमदार मनोज कायंदे, सुरज चव्हाण , यांच्यासह अनेक खासदार,आमदार, विधान परिषद सदस्य व प्रदेश पातळीवरील राष्ट्रवादी काँग्रेसचे मान्यवर नेते मंडळींची उपस्थिती लाभणार आहे.

शहरातील प्रमुख मार्गाने रॅली काढुन थोर महापुरुषांच्या पुतळ्यांना माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात येणार आहे.

### उद्यानाची भिंत कोसळली

# दोन महिला ठार

■ वृत्तसंस्था, संभाजीनगर, दि. ११ :
छत्रपती संभाजीनगर शहरात सायंकाळी सहाच्या सुमारास धुळीचे वादळ निर्माण झाले होते. सोसाट्याच्या वाऱ्यासह धुळीचे लोट सर्वत्र पसरले होते. दरम्यान, सिद्धार्थ उद्यानातील प्रवेशद्वाराच्या भिंतीचा भाग कोसळला आणि यामध्ये दोन महिलांचा मृत्यू झाला. या दोन्ही महिला उद्यानात कर्मचारी होत्या.

पावसामुळे प्रवेशद्वाराच्या भिंतीचा काही भाग कोसळला आणि या घटनेत दोन महिलांचा जागीच मृत्यू झाला. तर, इतर ५ जण जखमी झाले आहेत. स्वाती खैरनाथ,(३५ हल्ली मुक्काम रांजणगाव मुळगाव लासलगाव), रेखा गायकवाड (वय ३८ सौभाग्य चौक एन ११ हडको) असे मयत झालेल्या महिलांची नावे आहेत.

सकाळपासूनच पावसाळी वातावरण निर्माण झाले होते. त्यात सायंकाळी वादळी वाऱ्याने शहराला घेरले होते व धुळीत संपूर्ण शहर गुडूप झाले होते. त्यातच उद्यानाची भिंत कोसळून दोन महिलांचा मृत्यू झाला .






नागपूर

महासागर

# वृत्तसागर

■ गुरूवार, दि. १२ जून २०२५ ■

## नागपूरची अपहृत मुलगी इंदोरमध्ये सापडली

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणारी १५ वर्षीय मुलगी ट्युशनला जातो म्हणून घरून बाहेर पडली. पण परतलीच नाही. मुलीला फूस लावून पळवण्यात आल्याची तक्रार पालकांनी पोलिसांकडे तक्रार केल्यावर पोलिसांनी तिचा शोध घेतला असता ती इंदूरमधील एका झोपडपट्टीत आढळून आली. पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधीन केले.

३ जून रोजी मुलीला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार तिच्या पालकांनी एमआयडीसी पोलिसांकडे केली होती. पोलिसांनी प्राथमिक तपास केला असता ती होशंगाबाद (म.प्र)मध्ये गेल्याची माहिती मिळाली.

पोलिसांचे पथक तेथे पोहचले असता ती अजमेर (राजस्थान)मध्ये गेल्याची माहिती मिळाली. पोलीस तेथे पोहचले. ह्यसीसीटीव्ही फुटेजह्व तपासले तेव्हा मुलगी जयपूर व तेथून इंदूरला गेल्याचे सांगण्यात आले. इंदूरला पोलिसांनी एका झोपडपट्टीत १४ तास या मुलीचा शोध घेतल्यावर ती एका झोपडीवजा घरात सुरक्षित आढळून आली. तिला ताब्यात घेऊन पथक नागपूरला पोहचले. तिचे समुदेशन करण्यात आले. त्यानंतर पालकांच्या स्वाधीन केले.

पोलिसांनी तपासात दाखवलेल्या सातत्यामुळे मुलगी सुखरूप घरी येऊ शकली. एमआयडीसी पोलिसांचे मुलीच्या पालकांनी आभार मानले.

# नागपुरात २०१७ ची प्रभाग रचना

## महापालिकेत असणार ४ सदस्यीय प्रभाग

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :**
नागपूर महापालिका निवडणुकी ऑक्टोबरमध्ये होण्याची शक्यता आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने मंगळवारी प्रभागरचनेसाठी अधिसूचना जारी केली आहे.

यानुसार २०१७ प्रमाणे महापालिका निवडणूक ४ सदस्यीय प्रभाग पद्धतीनेच होणार हे स्पष्ट झाले आहे. सध्या नागपूर महापालिकेत ३८ प्रभाग असून, पण ही संख्या ४२ पर्यंत वाढू शकते.

अंतिम प्रभाग ३ किंवा ५ सदस्यीय असू शकतो. त्यामुळे आता वाढीव लोकसंख्या, त्यानुसार आरक्षण व प्रभागाचे सिमांकन करण्यात येईल.

प्रभागांची संख्या वाढल्याने प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या सध्या जवळपास ६० हजार आहे, ती वाढून ७० ते ७५ हजार होण्याची शक्यता आहे. ही अधिसूचना अ वर्गातील महापालिकांमध्ये नागपूर, पुणे; ब वर्ग ठाणे, नाशिक, पिंपरी-चिंचवड; आणि क वर्ग नवी मुंबई, वसई-विरार, छत्रपती संभाजीनगर, कल्याण-डोंबिवलीसाठी लागू केली आहे.

राज्य सरकारने मनपा आयुक्तांना अधिसूचना जारी करून प्रारुप प्रभागरचना तयार करून ती राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यास सांगितले आहे.

आयुक्तांनी मसुदा तयार केल्यानंतर, तो आयोगाकडून मंजूर केला जाईल. त्यानंतर हा प्रारूप प्रसिद्ध करण्यात येईल आणि जनतेकडून सूचना व हरकती मागवण्यात येतील. त्यावर सुनावणी होईल आणि अधिकृत अंतिम प्रभागरचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे मंजुरीसाठी पाठवतील. अंतिम मंजुरीनंतर ती रचना जनतेसाठी प्रसिद्ध केली जाणार आहे.

नगरविकास विभागाच्या आदेशानुसार प्रभाग रचना करताना ती उत्तरेकडून सुरुवात करायचे नमूद केले आहे. त्यामुळे उत्तरेकडून उत्तर-पूर्व त्यानंतर पूर्वेकडून पश्चिमेकडे पुढे जात शेवट दक्षिणेत करण्याचे स्पष्ट केलेले आहे. प्रभाग क्रमांकाचीही उत्तरेकडून सुरुवात करण्यात येईल. त्यामुळे उपराजधानीतील प्रभागरचना जवळपास यापूर्वीच्या (२०१७) निवडणूक प्रमाणेच असणार आहे, हे निश्चित झाले आहे.

दरम्यान, मनपा निवडणूक लवकरच लागण्याचे संकेत पाहून ईच्छूक कामाला लागले आहेत.

### सरकारच्या निर्णयाविरोधात पोस्ट महाग पडणार

## अधिकारी, कर्मचाऱ्यांवर निर्बंध

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
राज्य सरकारला आपल्या उणिवा कोणी दाखवू नये, सरकारच्या धोरणाचा विरोध करू नये, त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या क्लुप्त्या केल्या जात आहेत.

आता सोशल मीडियावर सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे मत, टीका किंवा आक्षेप नोंदविता येणार नाही. तसे केल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

संचालनालयाच्या आस्थापनेवरील काही अधिकारी, कर्मचारी नेहमी सोशल मीडियावर व्यस्त असतात. फेसबूक, यूट्यूब, एक्स, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, लिंक्ड इन या सारख्या सोशल मीडियावर कॉमेंट्स करीत असतात. त्या कॉमेंट कधी सरकारच्या धोरणात्मक निर्णयांवर, तर कधी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांवर असतात.

असे करून कर्मचारी सरकार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांवर टीका व आक्षेप घेतात. हे सरकार आणि अभियोग संचालनालयास आढळून आले आहे.

सरकारी अधिकारी-कर्मचारी हे सरकारचा भाग आहेत. असे असताना सरक्वारच्या धोरणात्मक निर्णयांवर, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांवर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे मत, टीका किंवा आक्षेप नोंदविणे, ही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ शी विसंगत आहे. हे कृत्य कर्मचाऱ्यांच्या सचोटी, कर्तव्यतत्परता राखण्यात बाधा आणणारे असल्याने अत्यंत गंभीर आहे.

त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी फेसबूक, यूट्यूब, एक्स, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप, लिंक्ड इन यासह कोणत्याही सोशल मीडियावर सरकारच्या धोरणात्मक निर्णयांवर, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयांवर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे मत, टीका किंवा आक्षेप नोंदविल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा अभियोगग संचालनालयाचे संचालक अशोककुमार भिल्लारे यांनी १५ मे रोजी काढलेल्या परिपत्रकाद्वारे दिला आहे.

अभियोग संचालनालयाने काढलेले परिपत्रक सर्व सहायक संचालक, सरकारी अभियोक्ता, सर्व उपसंचालक, परिक्षेत्रीय कार्यालये यांना पाठविण्यात आले आहे. अधिपत्याखालील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना ही बाब निदर्शनास आणून देऊन त्याचा अनुपालन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## रिपब्लिकन फेडरेशनची निर्मिती

### आंबेडकरवादी राजकारणाचे अस्तित्व राखणार



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :**
मनपाच्या निवडणुका समोर ठेवून आंबेडकरी सामाजिक चळवळीला एकसंघ करण्यासाठी समाजातील नव्या नेतृत्वाला संधी देण्यासाठी रिपब्लिकन फेडरेशनची निर्मिती करण्याचा प्रयोग करण्यात येत आहे, अशी माहिती रिपब्लिकन फेडरेशनचे संयोजक मिलिंद पखाले यांनी दिली.

पत्र परिषदेत ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या रिपब्लिकन पक्षातील अंतर्गत गटबाजीमुळे अनेक समांतर पक्ष व संघटना स्थापन झाल्या. सामाजिक उत्थान करण्याचे डॉक्टर बाबासाहेबांच्या स्वप्नांना तडा जाणारी राजकीय अनैतिकता निर्माण झाली. परिणामतः आंबेडकरवादी राजकारणाचे अस्तित्व शून्य झाले आहे. महानगरपालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून एकसंघ समाज निर्मिती करण्याच्या हेतूने नव्या नेतृत्वाला संधी देण्यासाठी रिपब्लिकन फेडरेशनची स्थापना करण्यात आली आहे. राजकीय पार्श्वभूमी नाही असे डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक यांच्याशी गेल्या सात आठ महिन्यापासून संपर्क करून मनपा निवडणुकीत त्यांना उभे करण्यात येणार आहे. यामध्ये पन्नास टक्के महिला उमेदवार राहतील. केवळ राजकारण न करता समाजकारणातून सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न या प्रयोगातून करण्यात येईल असा मानस मिलिंद पखाले यांनी पत्रकार परिषदेत बोलून दाखविला.

पत्र परिषदेला समता सैनिक दलाचे राष्ट्रीय संघटक सुनील सारेपुत्त, एस. के. बोरकर, छाया खोब्रागडे, ज्योती आवळे, उज्वला गणवीर, नरेश वाहने, विशाल वानखेडे, प्रकाश दार्शनीक उपस्थित होते.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम १५ जूनला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. १५ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच (आवश्यक कागदपत्रे जोडून) आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मंत्र्यांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

## सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाच्या सिडनीत होणार आयसीएसआयची चौथी आंतरराष्ट्रीय परिषद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया, नागपूर विभागातर्फे डब्ल्यूआयआरसीच्या (वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल) पहिल्या अर्धवार्षिक दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथे पत्रकार परिषद संपन्न झाली.

चौथी आंतरराष्ट्रीय परिषदेत ३ ते ५ सप्टेंबर दरम्यान सिडनी ऑस्ट्रेलिया येथे आयोजित करण्यात येणार आहे. एम्ब्रेसिव्ह इनोवेशन एन हॅन्सिग या विषयावर आधारित परिषद होणार आहे. त्यावेळी अध्यक्ष सीएस धनंजय शुक्ला, उपाध्यक्ष सीएस पवन चांडक, सचिव सीएस महादेव तिरुनागरी, डब्ल्यूआयआरसीच्या नागपूर विभागाच्या अध्यक्षा सीएस सारा कटवाल तसेच केंद्रीय व प्रादेशिक समिती सदस्य उपस्थित होते.

आयसीएसआयचे अध्यक्ष सीएस धनंजय शुक्ला यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले, आयसीएसआयमध्ये आम्ही व्यावसायिक उत्कृष्टतेला राष्ट्रीय व जागतिक उद्दिष्टांशी संरेखित करण्यासाठी कटिबद्ध आहोत. आमच्या परिषदांद्वारे, शैक्षणिक उपक्रमांद्वारे, डिजिटल नवकल्पनांद्वारे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे आम्ही आमच्या सदस्य आणि विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील वातावरण तयार करत आहोत. हे उपक्रम नैतिक आचरण, चांगल्या प्रशासन आणि सामाजिक जबाबदारीला प्रोत्साहन देण्याचे आमचे ध्येय अधोरेखित करतात.




डब्ल्यूआयआरसीच्या नागपूर विभागाच्या अध्यक्षा सीएस सारा कटवाल म्हणाल्या, पत्रकार परिषद आणि दीक्षांत समारंभ आमच्या विभागाच्या व्यावसायिक उत्कृष्टता आणि स्थानिक स्तरावरील सहभागासाठी असलेल्या बांधिलकीचे प्रतीक होती.

त्या पुढे म्हणाल्या, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया ने व्यावसायिक संधी वाढविणे, जागतिक सहभाग वृद्धिंगत करणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काही महत्त्वपूर्ण उपक्रम आणि आगामी परिषदांची घोषणा केली आहे. हे उपक्रम चांगले प्रशासन, जबाबदारीची गुंतवणूक, डिजिटल परिवर्तन आणि सर्वसमावेशक शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहेत.

## तडीपारसह दोन गुंड जेरबंद

■ **नागपूर, दि. ११ :**
वाडी आणि अंबाझरी पोलिसांनी गस्तीदरम्यान एका तडीपारसह दोन गुंडांना अटक केली. नीलेश उर्फ छोटू ज्ञानेश्वर गवई (३३) रा. आंबेडकरनगर, वाडी आणि सूरज उर्फ आवा विजय रामटेके (२९) अशी आरोपींची नावे आहेत.

वाडी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान तडीपार गुंड छोटू गवई आठवा मैल परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिस परिसरात पोहोचले. पोलिसांना पाहताच छोटूने पळ काढला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्याला पकडले. ठाण्यात आणून त्याचा गुन्हेगारी अभिलेख तपासला असता परिमंडळ क्र. १ च्या पोलिस उपायुक्तांनी त्याला १२ नोव्हेंबर २०२४ रोजी नागपूर जिल्ह्यातून २ वर्षांसाठी तडीपार केल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी छोटूविरुद्ध मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदवून त्याला अटक केली.

दुसरी कारवाई अंबाझरी पोलिसांनी केली. रात्री अंबाझरी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान पांढराबोडीच्या संजयनगरात माता मंदिरजवळ एक तरुण शस्त्राचा धाक दाखवून हैदोस घालत असल्याची माहिती मिळाली. पोलिस परिसरात पोहोचले असता सूरज सत्तूरचा धाक दाखवून धामधुम करताना आढळला. पोलिसांनी घेराबंदी करून सूरजला अटक केली. त्याच्याजवळून शस्त्रही जप्त केले.

### बियाणे ठेवले म्हणून पोलिसांचा

## शेतकऱ्याच्या घरी छापा?

### सदाभाऊ खोत संतप्त; मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून कारवाईची मागणी



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ :**
राज्यात खरीप पेरणीचा हंगाम सुरू असतानाच, शेतकऱ्यांच्या घरावर पोलिसांकडून सुरू असलेल्या धाडसत्रामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे.

नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील बिडगाव येथे शेतकरी रमेश घाटोडे यांच्या निवासस्थानी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अचानक छापा टाकत एचटीबीटी बियाण्यांची जप्ती केली. याप्रकरणी त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडीही सुनावण्यात आली. या घटनेने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली असून, शेतकरी नेते आणि माजी मंत्री आमदार सदाभाऊ खोत यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.

सदाभाऊ खोत यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रकरणी तातडीची कारवाई करण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या घरी फौजफाटा घेऊन छापा टाकणं हे पोलीस अधिकारांच्या कक्षेबाहेरचं असून, बळीराजाच्या आत्मसन्मानाचा अपमान आहे,ह्व असं त्यांनी आपल्या पत्रात ठणकावून सांगितलं आहे.

**कृषी विभागाचं काम पोलिसांकडून?**

कृषी बियाण्यांच्या तपासणीचा अधिकार कृषी विभागाच्या गुणवत्ता नियंत्रण विभागाकडे असून, पोलिसांनी थेट शेतकऱ्यांच्या घरावर छापे टाकणं हे बेकायदेशीर आहे, असं कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ सांगतात.

महासागर




: प्रभाग मित्र :

धाडसी आहात? काही करून दाखवायची धमक आहे?

पत्रकारितेच्या क्षेत्रात येवू इच्छिता?

या... महासागर प्रभाग मित्र व्हा!

अनेकांना सामाजिक कार्यासोबतच लेखनाची आवड असते. आपण राहतो, त्या परिसरातील अनेक समस्या कुठे आणि कुणाकडे मांडाव्यात, असाही प्रश्न निर्माण होतोच. लोकप्रतिनिधी लक्ष पुरवत नाही आणि अधिकारी कुणाचे ऐकत नाहीत. अर्थात समस्या जैसे थे.. राहतात. हीच बाब लक्षात घेता, लेखनाची आवड असणाऱ्यांसाठी दैनिक महासागर मध्ये नवे दालन सुरू करण्यात आले आहे.

आपल्या भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य असेल, अवैध धंदे, सिवर लाईन, अस्वच्छता, तुटलेल्या नाल्या आणि तुंबलेली गटारे असतील किंवा सर्वसामान्यांना भेडसावणाऱ्या समस्या असतील... मग, वाट कसली बघताय? बिनधास्तपणे मांडा.

महासागर प्रभाग मित्र पदासाठी आजच अर्ज करा.

अर्जाच्या पाकिटावर 'महासागर प्रभाग मित्र' असा उल्लेख आवर्जून करा.

आपले अर्ज दैनिक महासागर, कॉटन मार्केट, जयश्री सिनेमा मागे, नागपूर. ४४००१८ या पत्यावर तातडीने पाठवा.

: अधिक माहितीसाठी :

9881717811, 9881717816

### स्पर्धा परीक्षार्थींसाठी वरदान ठरतेय

# मनपाची ज्ञानयोगी डॉ. जिचकार ई-लायब्ररी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
नागपूर महानगरपालिकेच्या पाच वर्षांपूर्वी सुरू झालेल्या जयताळा येथील ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ई-लायब्ररीचा लाभ घेऊन अभ्यास करणारे अनेक विद्यार्थी व स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे अनेक जण शासकीय सेवेत दाखल झाले आहेत.

शहराच्या एका टोकाला असलेली ही ई-लायब्ररी आर्थिकदृष्या दुर्बल घटकातील विद्यार्थी व स्पर्धा परीक्षांची तयारी करणार्या विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे.




मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांच्या नेतृत्त्वात आणि शिक्षणाधिकारी श्रीमती साधना सयाम यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेचे ग्रंथालये अधिकाधिक अभ्यास केंद्र म्हणून विकसित करण्यात येत आहे.

महानगरपालिकेने २०१९ पासून अध्ययन कक्षाचे स्वरुप ई-लायब्ररीत बदलविण्यात आले. सन २०२१ पासून विद्यार्थ्यांना ई-लायब्ररीत अभ्यास करण्याची संधी मिळू लागली आहे. विद्यार्थ्यांपुढे ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार यांचा आदर्श असावा, अभ्यास करणारा विद्यार्थी हा डॉक्टर, इंजिनियर, सीए असा उच्चविद्याविभूषित व्हावा, आयएएस,आयपीएस या सारख्या मोठया परीक्षा उत्तीर्ण कराव्यात, बॅंक, रेल्वे व इतर सरकारी पदावर त्यांची निवड व्हावी, विद्यार्थ्यांनी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या सारखे मोठे यश मिळवावे याकरीता या लायब्ररीला ज्ञानयोगी डॉ. श्रीकांत जिचकार ई-लायब्ररी नाव देऊन एक मोठा आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवण्यात आला आहे. बॅंक व पोलीस भरतीच्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सर्वाधिक कल या लायब्ररीकडे आहे.

या ई-लायब्ररीची सभासद संख्या ही ९१० आहे. महानगरपालिकेतर्फे मान्यता प्राप्त भारतीय शिक्षण संस्था, जयताळा या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून नागरिकांसाठी अध्ययन कक्ष बरोबर विद्यार्थ्यांकरीता ई-लायब्ररी चालविली जात आहे. सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत ही लायब्ररी चालविली जाते. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार संदर्भ साहित्य, पुस्तके आणले जाते तर परीक्षेंच्या काळात अभ्यासिकेची वेळ रात्री १० वाजेपर्यंत वाढविली जाते.

लायब्ररीत चांगले टेबल खुर्च्यांची सोय करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांकरिता निःशुल्क अभ्यासिका, निःशुल्क कंप्यूटर व इंटरनेट सुविधा, एअर कंडिशनर रुम, भोजनासाठी वेगळे टेबल, पिण्याच्या पाण्याची सुविधा दिली जात आहे. एकाच दिवशी २५० च्यावर विद्यार्थ्यांना अभ्यासाची सुविधा उपलब्ध होत असल्याची माहिती भारतीय शिक्षण संस्थांचे संचालक ज्ञानेश्वर चौधरी यांनी माहिती दिली.

जिल्हयातील विविध ग्रामीण भागातील आणि चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, भंडारा, गोंदिया सारख्या जिल्ह्यातील विद्यार्थी या लायब्ररीचा लाभ घेत आहेत. दरवर्षी वेगवेगळ्या पदावर नोकरी मिळविलेल्या उमेदवारांचा सत्कार, त्यांचे कौतुक आणि त्यांचे अनुभवकथनाचे कार्यक्रम आयोजित केले जात असल्यामुळे इतर विद्यार्थ्यांना सुद्धा यश मिळविण्याकरीता प्रेरणा मिळत आहे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता काही खोल्यात अभ्यासिकेची सुविधा सुद्धा वाढविली जाणार आहे अशी माहिती भारतीय शिक्षण संस्थांचे संचालक ज्ञानेश्वर चौधरी यांनी दिली.

# कोंढाळी चे आधार केंद्र तीन महिन्यांपासून बंद

## शाळेकरी विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक अडचणीत

■ महासागर प्रतिनिधी
**कोंढाळी ,दि. ११ जून:**

कोंढाळी सह व परिसरासाठी सुरू करण्यात आलेले आधार सुविधा केंद्र सध्या बंद आहे.या मुळे शाळा , महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांची आधार कार्ड काढण्यासाठी फारच गैरसोय होत आहे. कोंढाळी येथील हे केंद्र बंद असल्याने कोंढाळी नगर पंचायत,कोंढाळी जिल्हा परिषद सर्कल, मेटपांजरा जि प सर्कल व बाजार गाव क्षेत्रातील अनेक गावं व परिसरातील नागरिकांना आधार कार्ड काढणे अथवा नूतनीकरणासाठी शहराच्या ठिकाणी जावे लागत आहे. गैरसोयीमुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी कोंढाळी येथील पालकांनी आमदार चरणसिंग ठाकूर यांचे कडे काटोल/कोंढाळी व अन्य मंजूर आधार केंद्र सुरू करण्यात यावे अशी मागणी केली आहे.

बरेच प्रयत्नांनंतर अडिच वर्षा आधी कोंढाळी येथे आधार केंद्र सुरू करण्यात आले होते. परंतु,ऐन शाळा महाविद्यालये सुरू होण्या आधीच मागील तीन महिन्यांपासून आधार सेवा केंद्र बंदच आहे. सध्या या परिसरात हे एकही आधार सेवा केंद्र नसल्याने विषेत: शाळा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह त्यांचे पालक व अन्य नागरिकांना फारच गैरसोयीस सामोरे जावे लागत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आधार कार्डमधील माहिती बदलासाठी तसेच, अद्ययावत अथवा नवीन आधार कार्ड काढण्यासाठी आधार केंद्रात येतात. मात्र, ते बंद असल्याने ज्येष्ठ नागरिकांना माहितीअभावी हेलपाटे मारावे लागत आहेत.

येथील बंद असलेल्या आधार सेवा केंद्राला लवकरात लवकर सुरू करण्यात यावी अशी मागणी शाळेकरी विद्यार्थ्यां व त्यांचे पालक व ज्येष्ठ नागरिक करत आहेत.. शासकीय अधिकृत आधार केंद्र बंद असल्याने ते कधी सुरु होणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. हे आधार केंद्र कोंढाळी ला येथे असल्याने नागरिकांच्या सोयीचे ठरत होते. त्यामुळे पुन्हा आधार केंद्र सुरू करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

केंद्रातील विविध योजनांसाठी आधार नंबर असणे बंधनकारक आहे मात्र कोंढाळी येथील आधार केंद्र बंद असल्यामुळे आधार कार्ड काढण्यासाठी अथवा दुरूस्तीसाठी शहराच्या ठिकाणी जावे लागते. यामुळे वेळ व पैसा व श्रम वाया जातो. गावातील केंद्र लवकर करावे. अशी मागणी कोंढाळी व लगतचे भागातील पालकांनी केली आहे .

कोंढाळी येथील व परिसरातील अनेक शाळेच्या विद्यार्थ्यांचे अत्यंत किरकोळ व तांत्रिक कारणामुळे परिक्षा फार्म भरण्यासाठी अडचणी येत आहेत. या प्रकरणी काटोल, कोंढाळी,रिधोरा ,मासोद,मेटपांजरा येथील मंजूर आधार यकेंद्र सुरू करण्यासाठी या भागातील आमदार चरणसिंग ठाकूर, तसेच नागपूर जिल्ह्या भा ज पा चे महामंत्री दिनेश ठाकरे यांना आपल्या भावना कळविल्या आहेत.

सध्या शाळा सुरू होत आहे तेंव्हा अनेकांचे आधार अप डेट करणे, तांत्रिक पद्धतीने अन्य प्रमाण पत्र बनविण्यासाठी मंजुर आधार केंद्र सुरू करण्यात यावीत अशी मागणी ही केली आहे.




### या कामासाठी लागते आधार

- केंद्र, राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ
- बँकेत खाते काढणे
- विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम
- बँक खात्यात जमा करणे
- रेशन कार्ड सुविधा

# बसपा ने संत कबीर जयंती साजरी केली

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ११ जून:**

संत कबीर यांची ६२७ वी जयंती बसपाने कही हम भूल न जाये या राष्ट्रीय अभियान अंतर्गत आज शांतीनगर च्या कबीर मठात मोठ्या थाटात साजरी केली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश बसपाचे महासचिव पृथ्वीराज शेंडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बसपाचे प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे व कबीर मठाचे संचालक मुनिंद्रदास कबीर यांनी मार्गदर्शन केले.

संत कबीर हे चौदाव्या शतकातील विज्ञानवादी संत होते. त्यांनी सर्वसामान्यांना समजेल अशा दोह्यातून प्रबोधन केले. बाबासाहेब आंबेडकरांचे वडील सुभेदार रामजी हे कबीर पंथी असल्याने त्यांच्या शिकवणुकीचा प्रभाव बाबासाहेबांवर पडला त्यामुळे बाबासाहेबांनी कबीराला आपल्या जीवनात प्रथम गुरुचे स्थान दिले असल्याची माहिती याप्रसंगी बसपा नेत्यांनी दिली.

पत्थर पूजे हरि मिले तो मै पुजू पहार, ताते यह चकिया भली पीस खाये संसार या दोह्यातून त्यांनी समाजाला वैज्ञानिक दृष्टी दीली. दगडाची पूजा केल्याने जर देव भेटत असेल तर मी पहाडाची पूजा करेल, परंतु हे करण्यापेक्षा जो चक्कीचा दगड आपल्याला पीठ बनवून खायला देते तो दगड माझ्या नजरेत महान आहे अशा प्रकारची भूमिका कबीर आपल्या दोह्यातून कथन करीत होते अशी माहिती बसपा नेते उत्तम शेवडे यांनी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे यांनी, सूत्रसंचालन जिल्हा प्रभारी धम्मपाल गोंगले यांनी तर समापन पूर्व नागपूर विधानसभा अध्यक्ष संजय इखार यांनी केले.

नागपुर च्या शांती नगरातील कबीरमठ हा नागपुरातील सर्वात जुना असून त्याला ९२ वर्षाचा इतिहास असल्याची माहिती या मठाचे चौथ्या पिढीतील गुरु चरणदास यांचे चिरंजीव मुनिंद्रदास कबीर यांनी सांगितले.

कार्यक्रमाला प्रामुख्याने जिल्हा सचिव अभिलेश वाहाने, माजी मनपा पक्षनेते गौतम पाटील, माजी जिल्हा प्रभारी नरेश वासनिक व विलास सोमकुवर, मध्य नागपूरचे अभय डोंगरे, विनोद नारनवरे, अनिल मोहबे, सामाजिक कार्यकर्ते धर्मपाल कीरपान, अनिल खोब्रागडे आदि प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.




# नागपूर जिल्हा माहेश्वरी युवा संघटने तर्फे आयोजित केलेला बॉक्स क्रिकेट स्पर्धा २०२५ राधड कपकार्यक्रम संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ११ जून:**

नागपूर जिल्हा माहेश्वरी युवा संघटना, श्री माहेश्वरी युवक संघ, शुभ टेक इंजिनिअर्स, एसबी राधड ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने ३१ मे २०२५ रोजी महेश नवमी २०२५ निमित्त बॅटल ग्राउंड, जगत रेसिडेन्सीच्या मागे, वर्धमान नगर, नागपूर येथे दोन दिवसीय बॉक्स क्रिकेट स्पर्धा २०२५ राधड कप आयोजित करण्यात आली.

या दोन दिवसीय स्पर्धेचे उद्घाटन ३१ मे २०२५ रोजी सकाळी ९.०० वा. प्रमुख पाहुणे श्याम सोनी (माजी अध्यक्ष, एबीएम महासभा) यांच्या हस्ते आणि दिनेश राठी (सहसचिव, मध्यांचल, एबीएम महासभा),श्रवणकुमार लि., मा.द.म.वि.मा. प्रवीण रंधड (संचालक श्री भगीरथ टेक्सटाइल्स लि.), हरेश सोनी (अध्यक्ष, नागपूर जिल्हा माहेश्वरी सभा), नगर सभेचे अध्यक्ष कमल तापडिया आणि डॉ. मुकेश चांडक (चांडक दंत चिकित्सालय) दोन दिवसीय स्पर्धेचा समारोप समारंभ ०१ जून २०२५ रोजी सकाळी प्रमुख पाहुणे रमेश रंधड (संचालक–श्री भगीरथ टेक्सटाईल्स लिमिटेड), गोविंद पसरी, धर्मेंद्र बजाज, डॉ. राहुल, रमेश रंधड (संचालक–श्री भगीरथ टेक्सटाइल्स लिमिटेड) यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. चांडक, नगर सभा सचिव गिरधर चांडक,भगवान भन्साळी उपस्थित होते.

उपस्थित सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले आणि सर्वांनी आप आपली मत भाषणात व्यक्त केले आणि तरुणांना मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली.

पुरुष गटात, राफेल संघ जिंकला आणि बजाज स्मॅशर्स संघ उपविजेता ठरला. विवेक सारडा यांच्या मुलांनी संघ स्पार्टन संघ जिंकला. यासोबतच, महिलांनीही या स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला आणि खेळाचा खूप आनंद घेतला.

नागपूर जिल्हा माहेश्वरी युवक संघाचे अध्यक्ष विवेक सारडा, सचिव प्रणय डागा, श्री माहेश्वरी युवक संघाचे अध्यक्ष–महेश बजाज, सचिव–मुकुंद दरख, महेश नवमी २०२५ संयोजक आदर्श सोनी, मार्गदर्शक व प्रसिद्ध क्रीडाप्रेमी निरज लोया, क्रीडा मंत्री कृष्णा मानधना, सरचिटणीस महेश सारडा, एस.एस. युवक संघ), प्रकल्प प्रभारी–मनोज लोया, नितेश भट्टड, गोविंद झंवर, प्रकल्प समन्वयक सीए निखिल राठी, सीए यश लोया, सुशील मोदाणी व संपूर्ण कार्यकारिणीने यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.




# बंद घरातून दुचाकी आणि दागिने चोरी

## टेकाडी खोरे ले आऊट परिसरातील घटना, पोलीसात गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
**कन्हान ,दि. ११ जून:**

टेकाडी खोरे ले आऊट , गणेश मंदिर जवळील बंद घरातून चोरट्यांनी दुचाकी आणि दागिने सह एकुण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याने पोलीसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे .

प्रमोदकुमार सिंग बच्चा सिंग (६४ वर्षे) हे आपल्या पत्नी सोबत टेकाडी खोरे ले आऊट , गणेश मंदिर जवळ राहतात . त्यांना दोन मुले आहेत , दोघेही कामामुळे गावाबाहेर राहतात . प्रमोदकुमार यांचे वडिलोपार्जित गाव गाजीपूर येथे आहे. एका नातेवाईकाच्या लग्नामुळे प्रमोदकुमार आणि त्यांची पत्नी शनिवार (दि.२६) एप्रिल रोजी उत्तर प्रदेशातील गाजीपूर येथे घराला कुलुप लाऊन गेले होते प्रमोदकुमार यांची लाल रंगाची पल्सर दुचाकी वाहन क्रमांक एमएच ४० यू ४८६० कंपाऊंडमध्ये ठेवली होती आणि कंपाऊंडलाही कुलूप लावले होते. प्रमोदकुमार यांनी शेजारी रामवतरसिंग यांना घराची काळजी घेण्यास सांगितले होते. अधुन मधुन प्रमोदकुमार रामवतरसिंग यांना फोन करुन घराबद्दल विचारायचे , तेव्हा ते म्हणायचे की सर्व ठीक आहे.

रविवार (दि.८) जुन रोजी सकाळी १०.०० वाजता च्या दरम्यान रामवतरसिंग यांनी प्रमोदकुमार यांना फोन करून सांगितले की तुमच्या घराच्या कंपाऊंडचे कुलूप तुटलेले आहे आणि घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूपही तुटलेले आहे . घराचे शेजाऱ्यांनी घरात जाऊन पाहणी केली तर दोन्ही बेडरूम मध्ये ठेवलेल्या कपाटांचे कुलूप तुटलेले होते आणि त्यातून कपडे बाहेर फेकले गेले होते . कंपाऊंडमध्ये ठेवलेली दुचाकी वाहन क्रमांक एमएच ४० यू ४८६० देखील दिसुन आली नाही . प्रमोदकुमार ताबडतोब गाजीपूरहून टेकाडीला येण्यासाठी निघाले . सोमवार (दि.९) जुन रोजी सकाळी ८ वाजता च्या दरम्यान प्रमोदकुमार आपल्या घरी पोहोचले , घराची पाहणी केली असता कपाटात ठेवलेले १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार किंमत १०,००० रुपए , ४ ग्रॅम वजनाचे कानातले किंमत ४,००० रुपए , २५ तोळे चांदीचे नाणी (लक्ष्मीचे चित्र) किंमत २००० रुपए , १ चांदीचा मासा , ५ तोळे सुपारी , ५ पान नग , १ नारळ यासारखे १० ग्रॅम वजन किंमत १००० रुपए , चांदीचे पायजमा ३ तोळे एकूण वजन ३३० ग्रॅम किंमत ५,००० रुपए , दुचाकी वाहन पल्सर लाल रंग क्रमांक एम एच ४० यु ४८६० एकूण १०,००० रुपए असा एकूण ३२,००० रुपयांच्या वस्तू मिळुन आले नाही . अज्ञात चोरट्यांनी प्रमोदकुमार यांचा घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि कपाटात ठेवलेले दागिने आणि कंपाउंडमध्ये ठेवलेली दुचाकी वाहन असा एकुण ३२,००० रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याने पोलीसांनी प्रमोदकुमार सिंग बच्चा सिंग यांचा तक्रारी वरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे .



**चोरीला गेलेली दुचाकी वाहन सत्रापुर मध्ये सापडली**

टेकाडी खोरे ले आऊट येथे घरफोडी चा घटनेला पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी गांभीर्याने घेत चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्याकरिता डीबी पथकाला मार्गदर्शन केले. डीबी पथकाने तांत्रिक पद्धतीने योग्य तपास करिता असतांना प्रमोद कुमार सिंग बच्चा सिंग यांची चोरी गेलेली दुचाकी वाहन सत्रापुर मध्ये सापडली , अशी माहिती पोलीसांनी दिली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास कन्हान पोलीस करीत आहे .

# जननायक बिरसा मुंडा यांना अभिवादन

## वीर आदिवासी गोंडवाना बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने कार्यक्रम



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी ,दि. ११ जून:**

आदिवासी समाजाचे प्रेरणास्थान आणि ब्रिटिश सत्तेविरोधात जल, जंगल, जमीन यासाठी संघर्ष करणारे जननायक बिरसा मुंडा यांच्या १२५व्या पुण्यतिथीनिमित्त वीर आदिवासी गोंडवाना बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने गंगा नगर येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे प्रमुख मनोज मडावी व अजय मसराम यांच्या हस्ते पुतळ्यास माल्यार्पण करण्यात आले. या वेळी वसंत गेडाम, सचिन आत्राम, सुमित मरापो, आकाश कुमरे, राम धुर्वे, शारदा उईके, काजल मसराम, जयश्री व विजय मडावी यांनीही पुतळ्यास पुष्प अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बिरसा मुंडा यांच्या विचारांना उजाळा देत, त्यांच्या संघर्षमय कार्यातून प्रेरणा घेण्याचा संदेश देण्यात आला.

# पुणे येथील सत्यशोधक रघुनाथ ढोक यांचा आज जाहीर सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ११ जून:**

श्री गुरुदेव सेवामंडळ, नागपूर तर्फे संत कबीर यांच्या ६२७ व्या जंयती निमिताने श्रीगुरुदेव सेवाश्रम, सुभाष रोड, नागपूर येथे १२ जुन २०२५ रोजी, सायंकाळी ६.३० वाजता. पुणे येथील सत्यशोधक रघुनाथ ढोक, पुणे यांचा जाहीर सत्कार आयोजित केलेला आहे. प्रमुख पाहुणे म्हणुन आचार्य हरिभाऊ वेरूळकर, नांदुरा आश्रम, जनार्दन पाटिल,राष्ट्रीय प्रचारक, डॉ.दिलीप नेवसे, सातारा, शिवदास महाजन, माजी न्यायाधीश उपस्थित राहणार आहे. सत्यशोधक रघुनाथ ढोक मागील अनेक वर्षापासुन कार्य करीत आहेत. त्यांचेमुळे कार्यामुळे सत्यशोधक चळवळीस पुन्हा एकदा पुनर्जिवन मिळाले आहे.

सत्यशोधक रघुनाथ ढोक यांनी प्रबोधनात्मक कृतीशील सामजिक उपक्रम राबवून कार्यक्रम यशस्वी केले आहेत. यावेळी संस्थेचे सर्व कार्यकारिणी मंडळ उपाध्यक्ष संगीता जावळे, सहसचिव राजेश कुंभलकर, प्रचारप्रमुख सियाराम चावके, प्रा.रामदास टेकाडे, प्रभाताई ठवकर व प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रसंत साहित्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पदवाड, रुपराव वाघ, डॉ. गणेश चव्हाण, रामराव चोपडे, सुरेंद्र बुराडे, बंडपंत बोढेकर, दिलीप सुरकार उपस्थित रहाणार असल्याची माहिती श्री गुरुदेव सेवामंडळ, नागपूरचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अँड.अशोक यावले व सचिव विठ्ठलराव पुनसे यांनी दिली आहे.



# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ५० प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ११ जून:**

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. बुधवार (ता.११) रोजी शोध पथकाने ५० प्रकरणांची नोंद करून ३९,१००/–रुपयाचा दंड वसूल केला.

हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० /–दंड) या अंतर्गत २३ प्रकरणांची नोंद करून ९,२००/– रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.१००/–) या अंतर्गत ०२ प्रकरणांची नोंद करून २००/– रूपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/–दंड) या अंतर्गत ११ प्रकरणांची नोंद करून ४,४००/– रुपयांची वसुली करण्यात आली.

मॉल,उपहारगृहे,लॉजिंग, बोर्डिंगचे हॉटेल सिनेमाहॉल,मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्त्यावर कचरा टाकणे (रू.२,०००/–)या अंतर्गत ०२ प्रकरणांची नोंद करून ४,०००/– रूपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १२ प्रकरणांची नोंद करून ९,५००/–रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटण विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रू.१०००) या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून १,००० रुपये दंड वसूल करण्यात आला. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १४ प्रकरणांची नोंद करून २,८००/– दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ८ प्रकरणांची नोंद करून ८,००० /–दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.



# नागपूर विभाग क्यूआर कोड व्यवहारात अग्रेसर

## डिजिटल पेमेंट उपक्रमात मध्य रेल्वेत आघाडीवर

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. ११ जून:**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने प्रवाशांना अधिक सुविधा मिळाव्यात यासाठी आरक्षित आणि अनारक्षित तिकीट खिडक्यांवर क्यूआर कोड आधारित डिजिटल पेमेंट प्रणाली सुरु केली आहे. या पुढाकारामुळे रोखरहित व्यवहारांना चालना मिळाली असून तिकीट प्रक्रिया अधिक सोपी व गतिमान झाली आहे.

प्रवासी आता कॅश किंवा सुट्ट्या पैशांशिवाय युपीआय किंवा मोबाईल बँकिंग ॲप्सच्या माध्यमातून सहज व सुरक्षित पद्धतीने तिकीटाचे पैसे भरू शकतात. या सुविधेमुळे व्यवहाराचा कालावधी कमी झाला असून तिकीट खिडक्यांवरील रांगा लक्षणीयरीत्या कमी झाल्या आहेत.

आरक्षित तिकीटांसाठी मोबाईल टिकीटिंग प्रणाली आणि अनारक्षित प्रवासासाठी युटीएस मोबाईल ॲप यांसारख्या यशस्वी डिजिटल उपक्रमांवर आधारित ही सुविधा रेल्वेच्या टिकीट प्रणालीचे आधुनिकीकरण करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री अमन मित्तल यांनी सांगितले की, क्यूआर कोड पेमेंट सुविधेमुळे प्रतीक्षा कालावधी कमी झाला असून अधिकाधिक प्रवाशांनी डिजिटल पद्धती अंगीकारली आहे. ही सुविधा भारतीय रेल्वेच्या तंत्रज्ञानाद्वारे कार्यक्षमता वाढविण्याच्या ध्येयाशी सुसंगत आहे.

सध्या नागपूर विभागात क्यूआर कोडद्वारे होणाऱ्या व्यवहारांचा वाटा २२.१०% इतका असून, ही कामगिरी मध्य रेल्वेत सर्वाधिक आहे. नागपूर विभाग या स्मार्ट व कार्यक्षम व्यवहार प्रणालीचा वापर वाढवण्यासाठी प्रवाशांना सातत्याने प्रोत्साहन देत आहे.




# गोधणी (रेल्वे) नगर पंचायत मध्ये विकासकामाचे भुमीपूजन

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी,दि. ११ जून:**

नागपूर तालुक्यातील गोधनी (रेल्वे) नगरपंचायत अंतर्गत असणाऱ्या वस्तीसाठी २ कोटी २६ लाख १३ हजार ४८३ रुपयाच्या विकास कामाचे भुमीपुजन आमदार समीर मेघे यांच्या हस्ते मुख्याधिकारी डॉ. सुप्रिया राठोड यांच्या उपस्थितीत करण्यात आले. प्रभाग क्रमांक ५ मध्ये अविनाश बिसेन ते अभिजित यादव ते शुभम सहारे यांच्या घरापर्यंत १३ लाख ७६ हजार रुपयाचे सिमेंट रस्ता बांधकाम करणे. श्याम राज त्रिपाठी ते शेंडे ते चमन चित्तोडीया यांच्या घरापर्यत ४० लाख ६८ हजार रुपयाचा सिमेंट रस्ता बांधकाम करणे.आदी विकासकामाचे भुमीपुजन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याधिकारी डॉ. सुप्रिया राठोड यांनी केले. यावेळी माजी पं.स. सभापती नम्रता राउत, माजी माजी जि.प. सदस्य ज्योती राऊत, माजी पं. स. सदस्य विजय राऊत, गोधणीचे माजी सरपंच दिपक राऊत, माजी उपसरपंच विनायक खवले, माजी ग्रा. पं. सदस्य दिनेश डिवरे, शुध्दोधन कोलते, रवि राऊत, रोहित महानंदे, सचिन राऊत, नगर पंचायतचे रचना सहाय्यक योगेश डोंगरे. स्थापत्य अभियंता सचिन धेंडे,प्रशासकीय अधिकारी सचिन सुब्बनवाड,लेखापाल वैभव किटुकले,स्वच्छता निरीक्षक धर्मेंद्र गोतमारे,

प्रणय तिजारे, मोनीश रेवतकर, प्रितम तिजारे, ललित घोंगे, दिपक गहुकर,दिनेश बोबडे उपस्थित होते.

**जाहीरनामा**

**कोर्ट विद्य. श्री राजु रणविर, तहसिलदार काटोल तथा कार्यकारी दंडाधिकारी काटोल यांचे कार्यालय काटोल**

रा.मा.क्र./एल.एन.डी.६४ / २०२४–२५
मौजा – गरमसूर प.ह.नं. ६१
दिनांक :– २७/०५/२०२५

ज्या अर्थी सोबत जोडलेल्या अनुसूचिमध्ये नमूद केलेल्या श्रीमती मिराबाई वसतराव बावनकर रा. काटोल ता. काटोल जि नागपुर यांनी मौजा गरमसूर येथील सर्वे क्रमांक २०९ क्षेत्र २.२९ हे.आर वर्ग २ हीया शेत जमिनीवरील कुळ नोंद कीमी करण्याबाबत अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहेय.

याबाबत ज्यांना आक्षेप अथवा उजर घ्यावयाचा असतील त्यांनी दिनांक २०/०६/२०२५ रोजी पावेतो तहसिल कार्यालय काटोल येथे कार्यालयाच्या वेळी लेखीस्वरूपात सादर करावं. उक्त दिनांका नंतर आक्षेप स्विकारले जानार नाही.

सदर जाहिरनामा माझी सही व शिक्यानिशी आज दिनांक १२/६/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला.

दिनांक १२/ ०६/ २०२५
तहसिलदार काटोल

**जाहिरनामा**

**कोर्ट विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय कामठी, जि. नागपूर**

एम.जे.सी. नं. १३/२०२५ — पे. ता. : २३/०६/२५
प्रोसेस नं. ४६५/२०२५ (०३/०४/२०२५)

Applicants : 1) Nitin Chhanu Manpiya R/o, Gautam Nagar, Juni Chawani, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur
2) Rakhi Devi Dharmkar R/o, Siddharth Nagar, Near Kali Mandir, Durg. Tah Durg, Dist Chattisgarh
3) Poonam durgaprasad Tomaskar R/o Borkar Nagar Jattarodi No. 2, Imamwada, Nagpur, Dist. Nagpur
---- V/S ----
Non applicant :- Nil

सदरहू अर्जदारांनी Late Channu Mallu Manpiya यांचा मृत्यु दिनांक ०६/०४/२०२३ रोजी झाला असुन यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख माननिय कोर्ट विद्यमान २ रे सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांनी दि. ०७/०४/२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविन्याचे असेल तर पेशी तारखेवर ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराना Late Channu Mallu Manpiya यांचा मृत्यु दिनांक ०६/०४/२०२३ यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०२/०४/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## क्राईम कॉर्नर

### सनी गायकवाडवर लावला एमपीडीए

■ **नागपूर, दि. ११ जून:** शहरातील आणखी एका गुंडाविरुद्ध पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी एमपीडीए लावून त्याची कारागृहात रवानगी केली. सनी संताराम गायकवाड (२५) रा. कैकाडीनगर झोपडपट्टी असे स्थानबद्ध करण्यात आलेल्या गुंडाचे नाव आहे.

सनी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर मारहाण, लुटपाट, खुनाचा प्रयत्न, दंगा आणि आर्म्स ॲक्टसह गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. २०२३ आणि २०२४ साली पोलिसांनी त्याच्याविरुद्ध प्रतिबंधक कारवाईही केली होती. दोन वर्षांपर्यंत चांगली वागणूक ठेवण्याचे बंधपत्र लिहून दिल्यानंतरही सनी गुन्हेगारीत सक्रीय होता. बेलतरोडीचे ठाणेदार मुकुंद कवाडे यांनी त्याचा गुन्हेगारी रेकॉर्ड गोळा केला. गुन्हे शाखेच्या एमपीडीए विभागामार्फत पोलिस आयुक्तांकडे प्रस्ताव पाठवला. पोलिस आयुक्तांनी मंगळवारी त्याच्याविरुद्ध एमपीडीए लावून एक वर्षासाठी छत्रपती संभाजीनगर मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले.

### जुन्या वादातून तरुणाला ठार मारण्याचा प्रयत्न

**लोखंडी रॉडने डोक्यावर केले वार, आरोपी २ तासांत गजाआड**

■ **नागपूर, दि. ११ जून:** जुन्या वादातून तीन आरोपींनी एका तरुणावर चाकूने हल्ला केला. लोखंडी रॉडने डोक्यावर मारून रक्तबंबाळ केले आणि फरार झाले. ही थरार घटना तहसील पोलिस ठाण्यांतर्गत नंगा पुतळा चौकात घडली. यशवंत नंदनवार (२५) रा. नाईक तलाव, असे जखमीचे नाव आहे. त्याच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी आरोपींविरुद्ध खुनाचा प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ आरोपींचा शोध घेत दोन तासांच्या आत त्यांना हुडकून काढत अटक केली. प्रेम कुंभरे (२०), सक्षम तांबे (२०) आणि जय गांधी (१९) तिघेही रा. पाचपावली अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

यशवंत हा बांग्लादेश परिसरात तांबुडकर यांच्या घरी भाड्याने राहतो. तो काही दिवसांपूर्वी त्याचा मामा राकेश हेडाऊ याच्यासोबत पाचपावली परिसरात गेला होता. त्यावेळी आरोपी प्रेमने त्याचे वाहन अडवून दुचाकी हळू चालविण्याचा सल्ला दिला होता. तसेच पाहून घेण्याची धमकी दिली होती. दरम्यान सोमवार ९ जून रोजी यशवंत हा मित्रासोबत पाणिपुरी खाण्याकरिता नंगा पुतळा चौकात गेला होता. या दरम्यान आरोपीही दुचाकी वाहनाने तेथे आले. प्रेमने जुन्या वादातून यशवंतला शिविगाळ करीत जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच चाकू आणि लोखंडी रॉडने त्याच्यावर हल्ला चढवला. मात्र, यशवंतने चाकूचा वार हुसकावला आणि जीव मुठीत घेवून पळाला. या दरम्यान सक्षमने लोखंडी रॉडने यशवंतच्या पायावर वार करून त्याला खाली पाडले. त्यानंतर आरोपींनी यशंवतच्या डोक्यावर लोखंडी रॉडने वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. यशवंत रक्तबंबाळ होऊन खाली कोसळला. परिसरात लोकांची गर्दी जमली. त्यामुळे आरोपी शिविगाळ करीत व जिवे मारण्याची धमकी देत तेथून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच गस्तीवर असलेले तहसील पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. यशवंतला उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले. यशवंतच्या तक्रारीवरून आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवत त्यांचा शोध सुरू केला. दरम्यान गुन्हे शाखा युनिट ३ च्या पथकानेही आरोपींचा शोध सुरू केला. खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर तिघांनाही पाचपावली परिसरातून अटक केली. ही कारवाई पोलिस निरीक्षक अनिल ताकसांडे, उपनिरीक्षक मधुकर काठोके, संतोषसग ठाकूर, विजय श्रीवास, भूषण भगत यांनी केली.

### देशीकट्ट्यासह आरोपीला अटक

■ **नागपूर, दि. ११ जून:** गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या युवकाला गिट्टीखदान पोलिसांनी अटक केले. युनूस अंसारी (२०) रा. अयप्पानगर, असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. झडतीमध्ये त्याच्या जवळ देशी बनावटीचा कट्टा व जिवंत काडतूस मिळून आले.

मंगळवारी सायंकाळी गिट्टीखदान पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान रामदेव बाबा मंदिरामागील मोकळ्या मैदानात एक युवक संशयास्पद दिसला. पोलिस पथकाने त्याला आवाज दिला असता तो पळाला. पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली. पंचासमक्ष झडती घेतली असता कंबरेत देशी बनावटीचा कट्टा तसेच एक जिवंत काडतूस मिळून आले. त्याच्याविरुद्ध जरीपटका ठाण्यात गुन्ह्याची नोंद आहे. तो कोणतातरी गुन्हा करण्याच्या तयारीत होता. मात्र, पोलिसांनी त्याला आधीच अटक करून अग्निशस्त्र जप्त केले. त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली. न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली. त्याने देशीकट्टा कुठून आणला, याचा तपास पोलिस करीत आहेत.

### शेजाऱ्यानेच केली रेल्वे कर्मचाऱ्याच्या घरी चोरी

**२ अल्पवयीनसह तिघे ताब्यात**

■ **नागपूर, दि. ११ जून:** अजनी रेल्वे क्वॉर्टर परिसरात रेल्वे कर्मचाऱ्याच्या घरी झालेल्या चोरीचा पर्दाफाश करीत गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकाने २ अल्पवयीनसह तिघांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान शेजारी राहणाऱ्या तरुणानेच आपल्या दोन अल्पवयीन साथीदारांसोबत ही चोरी केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपींकडून चोरीचा मालही जप्त केला. सुमित पवन सोनटक्के (२४) रा. अजनी रेल्वे क्वॉर्टर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. पोलिस अल्पवयीन आरोपींचीही चौकशी करीत आहेत.

फिर्यादी सतीश बैजूलाल शेंद्रे (४६) रा. रेल्वे क्वॉर्टर हे खासगी संस्थेत काम करतात. त्यांची पत्नी रेल्वेत नोकरीला आहे. गत ७ जून रोजी शेंद्रे कुटुंब घराला कुलूप लावून कार्यक्रमासाठी राजनांदगाव येथे गेले होते. या दरम्यान चोरांनी घरफोडी करून १२२ ग्रॅम सोने चोरी केले. सतीश यांच्या तक्रारीवरून अजनी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला होता. गुन्हे शाखा युनिट ४ च्या पथकानेही या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू केला. गोपनिय माहितीच्या आधारावर सुमितला त्याच्या दोन अल्पवयीन साथीदारांसह ताब्यात घेतले. चौकशीत तिघांनीही गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून १६७.४ ग्रॅम सोने आणि ४०० ग्रॅम चांदी जप्त केली. आरोपींकडे मिळालेल्या मोटारसायकलबाबत विचारले असता हुडकेश्वर ठाण्यांतर्गत महात्मा फुलेनगर परिसरातून चोरी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी आरोपींकडून एकूण १४ लाख रुपयांचा माल जप्त केला आहे. पुढील कार्यवाहीसाठी आरोपींना अजनी पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले. ही कारवाई वपोनि कमलाकर गड्डीमे, पोउपनि वैभव बारंगे, पोहवा सतीश ठाकरे, अभिषेक शनिवारे, युवानंद कडू, नजीर शेख, पुरुषोत्तम जगनाडे, काळमेघ, देवेंद्र नवघरे, महेश काटवले, लक्ष्मण कळमकर आणि श्रीकांत मारवाडे यांनी केली.

### सीमेंट मिक्सरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

■ **नागपूर, दि. ११ जून:** लोखंडी पट्टी तुटल्याने ट्रॅक्टरला लागलेला सीमेंट मिक्सर दुचाकीस्वारावर जाऊन धडकला. यात गंभीर जखमी दुचाकीस्वाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत देशपांडे लेआऊट परिसरात घडली. अत्तेसिंह रामदास वर्मा (४९) रा. भगतनगर, भरतवाडा असे मृताचे नाव आहे.

मंगळवारी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास वर्मा काही कामाने देशपांडे लेआऊट परिसरात गेले होते. वैष्णव देवी चौकात नीलकमल कोल्डिंकसमोरून वाहनावर बसून जाण्याच्या तयारीत असतानाच एमएच-४९/बीझेड-०२४३ क्रमांकाचा ट्रॅक्टर मागून आला. ट्रॅक्टरच्या मागे सीमेंट कॉंक्रीट मिक्सर लागलेले होते. अचानक दोघांनाही जोडणारी लोखंडी पट्टी तुटली आणि मिक्सर वेगळे होऊन थेट वर्मा यांच्या वाहनाला जाऊन धडकले. वर्मा जमिनीवर पडून गंभीर जखमी झाले. आसपासचे लोक मदतीला धावले. याच दरम्यान ट्रॅक्टर चालक घटनास्थळावरून फरार झाला. स्थानिक नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. वर्मा यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी वर्मा यांचे जावई स्वप्निल खोब्रागडेच्या तक्रारीवरून ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# डिपी प्लानमुळे हिंगण्याचा सुनियोजित विकास

## मुख्याधिकारी सरनाईक यांची माहिती

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. ११ जून:**

नगर विकास मंत्रालयाने हिंगणा शहराचा नवा डीपी प्लान मंजूर केला आहे यानुसार ९० कोटीचे डिपी रोड मंजूर केले आहे. सांडपाण्याचे नियोजन करण्यासाठी ७० कोटीचा एसटीपी प्लांटचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक नागरिकाला १३५ लिटर पाणी मिळण्याची लवकरच सुविधा उपलब्ध होणार आहे. डिपी रोड तयार होत असलेल्या परिसर या शहराला सुनियोजित शहराची ओळख देईल अशी माहिती पत्रकारांशी संवाद साधताना नगरपंचायत मुख्याधिकारी धनंजय सरनाईक यांनी दिली.

या शहराचे क्षेत्रफळ ७४३ हेक्टर असून बराच भाग रिक्त किंवा शेती ने व्यापला आहे. त्यामुळे नगरपंचायत क्षेत्राला विस्तारीकरणासाठी वाव आहे. या दृष्टीने शहराच्या विस्तारीकरणासाठी डीपी प्लान तयार करण्यात आला. या प्लानला नगर विकास मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. पहिल्या टप्प्यात ९० कोटी रुपयांचे डीपी रोड तयार करण्याचे काम प्रारंभ करण्यात आले आहे. यातील काही रोडचे कामे पूर्ण झाली आहेत. नागरिकांना पिण्याचे पाणी रायपूर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतून पुरवले जाते. आता वानाडोंगरी नगरपरिषदेची नवीन पाणीपुरवठा योजना अस्तित्वात येणार आहे. यामुळे हिंगणा शहराला भविष्यात मुबलक पाणी मिळणार आहे. प्रत्येक नागरिकाला १३५ लिटर पाणी मिळणार आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी लागणाऱ्या पाण्याच्या टाक्या व नवीन पाईपलाईन टाकून शहरात तयार आहे. यामुळे भविष्यकाळात पाण्याची टंचाई जाणवणार नाही, असे सरनाईक यांनी सांगितले.

हिंगणा शहरातील सांडपाणी एकत्र करून त्याचे शुद्धीकरण करण्यासाठी ७० कोटी रुपयाचा एसटीपी (सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प) याचे नियोजन करण्यात आले आहे.



यासाठी निधीची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. हा निधी भविष्यकाळात उपलब्ध झाल्यास शहरातील सर्व नाले एकत्र जोडून पाण्याचे शुद्धीकरण करण्यात येईल. त्यामुळे वेणा नदी प्रदूषित होणार नाही.

हिंगणा शहरात सुसज्ज रस्ते, पिण्याचे स्वच्छ पाणी, पथदिव्याची व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन ही कामे विशेष लक्ष देऊन केली जात आहे. हिंगणा शहर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी राहावे , त्यासाठी नगरपंचायत प्रशासन तत्पर आहे. हिंगणा शहरातील शिवाजी चौकात शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर आधारित चलचित्र लावण्यात येणार आहे. याबाबत कला संचालनालयाकडून परवानगी मिळताच उर्वरित कामे पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.

### पंतप्रधान आवास योजनंतर्गत १० कोटीचा निधी वितरित

पंतप्रधान आवास योजना ( शहरी भाग) दुसरा टप्पा प्रारंभ करण्यात आला आहे. सन २०१९-२०डिपीआर (१)२८० व सन २०२३-२४ डिपीआर (२)२२१ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले.५०१ लाभार्थ्यांपैकी ४८१ लाभार्थ्यांना कागदपत्रा नुसार बांधकाम मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.३०२ लाभार्थ्यांचे बांधकाम काम पूर्ण झाले असून १३७ घरकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. या घरकुल धारकांना १० कोटी २२ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे.डिपीआर १ व २ मधील लाभार्थ्यांना तहसील कार्यालयामार्फत वाळू उपलब्ध करून देण्यात आली. पंतप्रधान आवास योजना टप्पा २ अंतर्गत ४३ लोकांचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला आहे.२ लाख ५० हजार रुपये प्रत्येकाला शासनाकडून अनुदान देण्यात येत आहे. ज्या लोकांना या योजनेत सहभाग घ्यायचा आहे. त्यांनी आपले कागदपत्रासह ऑनलाइन नोंदणी १६ जुन पर्यंत करावी, असे आवाहन नगरपंचायत मुख्याधिकारी धनंजय सरनाईक केले आहे.

## प्रार्थना होती सात जन्मांची...



■ **महासागर प्रतिनिधी**
**मौदा, दि. ११ जून:**

मौदा शहरातील काली माता मंदिर परिसरातील महिलांनी वटपौर्णिमेनिमित्त वटवृक्षाची पूजा करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. पतीच्या दीर्घायुष्यासाठी, तसेच अखंड सौभाग्यासाठी महिला दरवर्षी वटसावित्री व्रत करतात. मंगळवार ला वटपौर्णिमेच्या दिवशी सुवासिनींनी उपवास करत वडाच्या झाडाची पूजा करून आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. मौदा शहरातील काली माता मंदिर परिसरात

# 'अभंगवारी'तून साकारली पंढरीची वारी

## नाट्य, नृत्य आणि संगीतमय सादरीकरणातून आषाढी वारीचे सजीव दर्शन

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. ११ जून:**

नागपूरकरांसाठी एक भक्तिमय, सांगीतिक आणि सांस्कृतिक अनुभव देणारा अनोखा कार्यक्रम अभंगवारी निर्जला एकादशीच्या शुभ पर्वावर शनिवार ७ जुन रोजी सुरेश भट सभागृहात पार पडला. विश्व वारकरी सेवा संस्था आयोजित या कार्यक्रमात शंभराहून अधिक स्थानिक वारकरी कलावंत सहभागी झाले होते. कार्यक्रमात नाट्य, नृत्य व संगीताच्या सादरीकरणातून पंढरपूरच्या आषाढी वारीचे सजीव चित्रण करण्यात आले.

वारीत प्रत्यक्ष सहभागी होण्याची संधी न मिळालेल्या भक्तांसाठी ही एक पर्वणीच ठरली. संतांच्या पालख्या, लाखो वारकऱ्यांचा शिस्तबद्ध प्रवास, टाळ-मृदंगाचागजर, फुगडी, रिंगण, मैदानी खेळ, धावा, आणि आषाढी वारीचा संपूर्ण महिमा यातून रसिकांना अनुभवायला मिळाला.

**भव्य नेपथ्य व रिंगण सोहळ्याचे वैशिष्ट्य**

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले विठ्ठल-रखुमाईच्यमूर्तीचे दर्शन आणि भव्य मंदिराचे नेपथ्य, ज्यामुळे



वातावरणात आध्यात्मिक भार जाणवत होता. रिंगण सोहळ्याच्या सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक भारावून गेले. रसिक आणि कलावंत यांचे अद्वैत अभंगवारीच्या निमित्ताने घडले.

**संयोजन आणि मान्यवरांची उपस्थिती**

कार्यक्रमाचे संयोजन संदीप जिवलग कोहळे, मनीष नीलटकर, उमेश महाराज बारापात्रे, अतुल तायवाडे, सोनाली बोहरपी, वैष्णवी निंबूळकर, नितीन वानखेडे, आशिष गायधन, ऋषिकेश खडसे, आशिष नीलटकर आणि प्रणाली राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन सुवर्णा जांभूळकर यांनी केले.

कार्यक्रमाला स्वप्नील मोंढे, आभा मेघे, भागवताचार्य ह.भ.प. पांडुरंग महाराज बारापात्रे, डॉ. देवेंद्र यादव, संजय बंदेलवार, चंद्रशेखर लांडे, दिनकर कडू, नामदेव राऊत, संदीप ठाकरे, विलास महाराज जिल्हारे, रमेश वनकर, दिलीप खडसे, प्रवीण वानखेडे आदी मान्यवर उपस्थित होते.

'अभंगवारी' ही केवळ एक सांस्कृतिक प्रस्तुती नव्हे, तर ती एक भक्तीमय अनुभूती होती. नागपूरच्या आध्यात्मिक इतिहासात तिची नोंद सुवर्णाक्षरांनी कोरली जाईल, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

# मोहदी धोत्रा येथे ग्रामपंचायत सचिव विनोद गोखे यांचा निरोप समारंभ

## निरोप समारंभ निमित्याने महिलांचा सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नरखेड, दि. ११ जून:**

नरखेड तालुक्यातील मोहदी धोत्रा ग्रामपंचायत येथे ( दि.१०) ला तीन वर्षांपासून कार्यरत असलेले सचिव विनोद गोखे यांचा निरोप समारंभ कार्यक्रम ग्रामपंचायत च्या वतीने घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सरपंच राजेंद्र नाखले, उपसरपंच मारोती कोकोडे, पत्रकार राजेंद्र बागडे, सौ,धूमाळे सचिव, सीमाताई ठाकरे ग्रा. प. सदस्या, निलिमा धुर्वे सदस्या, लक्ष्मणजी सर्रयाम सदस्य, दिपा अनिल गौरखेडे ग्रा.पं. सदस्या आदी उपस्थित होते. सचिव विनोद गोखे यांनी तीन वर्ष निस्वार्थपणे या गावात सेवा केली. त्यांच्या या कामाबद्दल त्यांचे गावकऱ्यांनी तोंड भरून कौतुक केले. त्यांचा निरोप समारंभ सत्कार यावेळी घेण्यात आला. निरोप समारंभ प्रसंगी



समता सैनिक दल नरखेड तालुक्याच्या अध्यक्षा तथा ग्रा. प. च्या सदस्या दिपा गौरखेडे यांच्या सहकार्यातून गावातील उत्साहित व कर्तबगार महिला अंगणवाडी सेविका शोभा भिसे, आशा वर्कर मंगलाताई पंधरे, माजी सरपंच शिल्पाताई टेकाम या होतकरू महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच राजेंद्र नाखले यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन भूषण आगे, प्रास्ताविक दीपा गौरखेडे, तर आभार रूपाली धुमाळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मनोहर धुर्वे ,अंकुश धुर्वे, अनिल गौरखेडे यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमात महिला पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मालमत्ता कर भरून शहराच्या विकासात सहभागी व्हा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ जून:**

स्वच्छ, सुंदर आणि स्वस्थ नागपूर साकारण्याकरिता आपला मालमत्ता कर भरून शहराच्या विकासात सहभागी व्हावे असे आवाहन मनपाद्वारे करण्यात येत आहे.

नागपूर महानगरपालिकेद्वारा लकडगंज झोन येथील सर्व मालमत्ता धारकांना सूचित करण्यात आले आहे. मौजा नागपूर (खास), भरतवाडा, पुनापूर, हिवरी, भाडेवाडी, कळमना, पारडी आणि झोन चिखली (देव) येथील खुल्या भूखंडांसंदर्भातील मालमत्ता कराची देयके झोन कार्यालयात उपलब्ध करण्यात आली आहेत. मालमत्ता करदात्यांनी लवकरात लवकर झोन कार्यालयात संपर्कसाधून आपली कराची देयके प्राप्त करून घेण्याचे आवाहन मनपाद्वारे करण्यात येत आहे.

या वर्षाचा मालमत्ता कर येत्या ३० जूनपर्यंत ऑनलाईन भरल्यास त्यावर करदात्यांना थेट १५ टक्के कर सवलत तात्काळ प्राप्त होणार आहे. यासाठी करदात्यांना संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन कर भरता येणार आहे. तसेच महानगरपालिकांच्या कार्यालयांमध्ये जाऊन काऊंटवर कराचा थेट भरणा केल्यास करदात्यांना १० टक्के सवलतीचा फायदा मिळणार आहे.

# मनपातर्फे साने गुरुजी यांना विनम्र अभिवादन



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ जून:**

नागपूर महानगरपालिकेतर्फे प्रख्यात लेखक, थोर स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत पांडुरंग सदाशिव साने उपाख्य साने गुरुजी यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

मनपा ज्येष्ठ नागरिक कक्ष आणि सिनियर सिटीझन कौन्सील ऑफ नागपूर डिस्ट्रीक्टद्वारे बुधवारी (ता.११) मनपा मुख्यालय परिसरातील ज्येष्ठ नागरिक कक्षात आयोजित छोटेखाणी समारंभात कार्यक्रमाध्यक्ष माजी महापौर श्री. दयाशंकर तिवारी यांच्या हस्ते साने गुरुजी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले.

याप्रसंगी मनपाचे जनसंपर्क अधिकारी श्री. मनीष सोनी, श्री. अमोल तपासे, मनपा ज्येष्ठ नागरिक कक्ष व संस्थेचे सचिव श्री. सुरेश रेवतकर, श्री. भगवान टिचकुले, श्री. वसंतराव पाटील, श्री. देवराव सवाईथूल, श्री. कमल तामडे यांच्यासह श्री. दिलीप देवगडे, इतर ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना माजी महापौर श्री. दयाशंकर तिवारी यांनी सर्वप्रथम थोर स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक चळवळीचे प्रणेते आणि शिक्षक शिक्षक असणाऱ्या साने गुरुजी यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. तसेच श्यामची आई सारख्या कित्येक पुस्तकांचे लेखन करून त्यांनी एक आदर्श जगापुढे आणल्याचे सांगितले. तत्पूर्वी मनपाच्याचमूद्वारे बालोद्यान, सुभाषरोड स्थित साने गुरुजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# सीटीआय लॉबी, नागपूर येथे वाणिज्य विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक आरोग्य तपासणी शिबिर आयोजित

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ११ जून:**

कर्मचाऱ्यांच्या आरोग्य कल्याणासाठी घेतल्या जाणाऱ्या उपाययोजनांचा एक भाग म्हणून, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात १० आणि ११ जून २०२५ रोजी वाणिज्य विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी सीटीआय लॉबी, नागपूर येथे वार्षिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

हे शिबिर श्री विनायक गर्ग, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नागपूर आणि डॉ. निर्मला गुप्ता, मुख्य वैद्यकीय अधीक्षक, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. या शिबिरात प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीवर भर देण्यात आला आणि त्यामध्ये बीएमआय मोजणी, दृष्टि तपासणी, साखर तपासणी, रक्तदाब मोजणी आणि सामान्य आरोग्य तपासणी यांचा समावेश होता.



आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देण्याची क्षमता वाढवण्यासाठी, सहभागी कर्मचाऱ्यांना प्राथमिक उपचार व सीपीआर (कार्डियो पल्मोनरी रिससिटेशन) प्रशिक्षणही तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांद्वारे देण्यात आले.

या शिबिराचे आयोजन डॉ. सुमित गोजे, सीएमपी/नागपूर (१०.०६.२०२५), डॉ. स्निजा, डीएमओ/नागपूर (११.०६.२०२५), मंजुषा मटे, डीईई/नागपूर; महेश लांडे आणि रूही, वरिष्ठ नर्सिंग स्टाफ/नागपूर; आणि गुलजार, अटेंडंट/नागपूर यांच्या समर्पित टीमद्वारे यशस्वीपणे करण्यात आले.

अशा आरोग्य तपासणी शिबिरांमधून नागपूर विभागाची आपल्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, सुरक्षा व आपत्कालीन तयारीसाठी असलेली कटिबद्धता दिसून येते, जी एक सक्षम व कार्यक्षम रेल्वे प्रणाली साकारते.

# विना रॉयल्टी वाहतूक करणारा टाटा कंपनीचा योद्धा वाहन जप्त , आरोपी अटक

■ **महासागर प्रतिनिधी**
**कन्हान, दि. ११ जून:**

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा घाटरोहणा शिवार कडुन कन्हान कडे अवैधरित्या चोरीच्या वाळुची वाहतुक करणाऱ्या टाटा कंपनीचा योधा वाहनाला पोलीसांनी जप्त करुन कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेऊन ५ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

प्राप्त माहिती नुसार मंगळवार (दि.१०) जुन रोजी रात्री कन्हान पोलीस अवैध धंध्यावर कारवाई करणे कामी पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात पोहवा नरेश बाटबरई , पोशि नवीन पाटील सह अन्य पोलीस कर्मचारी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि मौजा घाटरोहणा शिवार कडुन कन्हान कडे टाटा कंपनीचा योधा वाहन क्रमांक डब्लु.बी ९५ ए ५५८० वाहना मध्ये अवैधरित्या चोरीच्या वाळुची वाहतुक होत आहे.



अशा मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी हनुमान मंदिर टेकाडी चौक येथे नाकाबंदी केली असता टाटा कंपनीचा योधा वाहन येतांना दिसली . पोलीसांनी त्यास थांबवुन वाहनाची पाहणी केली असता वाळु दिसुन आली. वाहन चालक राहुल हिरालाल नामुते (वय ३१) रा.कोराडी याला वाळु बाबत कागदपत्रे विचारले असता त्याने कुठल्याही प्रकारचे कागदपत्रे परवाना नसल्याचे सांगितले . पोलीसांनी वाहन चालकास ताब्यात घेऊन त्याचा जवळुन १ ब्रास वाळु किंमत ४००० रुपये आणि टाटा कंपनीचा वाहन किंमत ५,००,००० रुपए असा एकुण ५,०४,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे .

# स्लॅब कोसळून मजुरांचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी**
**काटोल, दि. ११ जून:**

काटोल येथे सोन्या चांदीचे व्यापारी चंदू घोडे यांच्या जुन्या घराचे नूतनीकरण सुरू असताना इमारतीचा स्लॅब कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात मजूर तुळशीदास लक्ष्मण सोनवणे लिंगा वय ३८ याचा जागीच मृत्यू झाला. माहितीनुसार, ही घटना सकाळी नऊ वाजताच्या सुमारास घडली. बुधवारला काम बंद असताना कामावरून तुळशीदास याला सकाळी सहा वाजता दरम्यान फोन आला असता तुळशीदास याची कामावर जाण्याची इच्छा नसताना सुद्धा त्याला कामावर बोलण्यात आले आणि अचानक ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले असता ठेकेदार दिलीप सलाम याला या घटनेची माहिती देण्यात आली परंतु ठेकेदार दिलीप सलाम हा फरार झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली मृतदेह ग्रामीण रुग्णालय येथे पोस्टमार्टम करीता पाठवण्यात आला. लिंगा येथील सरपंच कांता घोरमाडे व माजी सरपंच विनोद ठाकरे व संतप्त गावकरी यांनी ठेकेदाराला जोपर्यंत अटक होणार नाही तोपर्यंत मृतदेह ग्रामीण रुग्णालय मधून हलवण्यात येणार नाही असा इशारा पोलीस विभागाला देण्यात आला पुढील काटोल ठाणेदार निशांत मेश्राम करीत आहे.

# बेसा परिसरात पाणीटंचाईचे गंभीर संकट

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ११ :

बेसा परिसरातील बेसा ,मानेवाडा आणि मनीषनगर परिसरात मागील काही दिवसांपासून गंभीर जलसंकट निर्माण झाले असून नागरिकांना भीषण उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी देखील हाल सहन करावे लागत आहेत. महापालिकेच्या ओसीडब्ल्यू विभागाच्या निष्काळजी कारभारामुळे ही समस्या दिवसेंदिवस अधिकच तीव्र होत आहे.



**अचानक पाणीपुरवठा बंद नागरिकांना धक्काच**

मानेवाडा व भगवाननगर जलकुंभातून मंगळवारी १० तास पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार असल्याची पूर्वसूचना दिली होती, मात्र यामध्ये गीतानगर, शाहूनगर व इतर अनेक वस्त्यांचा उल्लेख नसतानाही सोमवारी संध्याकाळपासूनच या भागांतील नळांना पाणी आलेच नाही. रात्री १२ वाजेपर्यंत नागरिक नळात पाणी येण्याची वाट पाहत राहिले. दुसऱ्या दिवशी मंगळवार १० जुन रोजी देखील सकाळपासूनच नळ कोरडेच होते.

**२४ बाय ७ योजना अपयशी**

महापालिकेच्या २४ बाय ७ पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नागरिकांनी नियमानुसार मीटर बसवून नवे डिमांड भरले होते. मात्र ही योजना अनेक वर्षांनंतरही अद्याप पूर्णतः लागू झालेली नाही. दरवाढीचा भुर्दंड सहन करत असलेल्या नागरिकांना ना नियमित पाणी मिळते, ना योग्य दाबाने. यामुळे अनेकांना रोज पाणी साठवण्याची धावपळ करावी लागत आहे.

**नागरिकांची पाण्यासाठी पायपिट**

**मनीषनगरमध्ये पाण्यासाठी पायपीट**

मनीषनगर भागात तर स्थिती अधिकच गंभीर आहे. गेल्या पाच दिवसांपासून या भागात पाणीपुरवठा बंद आहे. त्यामुळे महिला, पुरुष, मुले झ सर्वांनाच अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

नागरिकांना पाणी मिळवण्यासाठी लांब अंतर जावे लागत आहे, तर काहीजणांना महागडे कॅन विकत घ्यावे लागत आहेत.

**कॅनच्या दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात**

मजबुरीपोटी नागरिक कॅनचे पाणी विकत घेत असून ते पाणी दूषित असल्याने अनेकांना गळ्याचे विकार, सर्दी-खोकल्याची तक्रार तसेच पोटाचे आजार उद्भवत आहेत. बर्फ व कॅनच्या पाण्यामुळे उलट्या, जुलाब यासारख्या समस्या वाढत आहेत. नागरिक यामुळे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत चिंतेत आहेत.

नागरिकांचा आरोप आहे की, जलपुरवठा विभागाने या समस्येकडे दुर्लक्ष केले आहे. ना नियमित पाणी देण्यात येते, ना समस्येच्या निवारणासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले जाते. त्यामुळे संतप्त नागरिकांनी विभागाकडे तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.₹स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा आमचा हक्क आहे₹ - स्थानिक नागरिक

स्थानिक रहिवाशांनी महापालिका व ओसीडब्लू यांना जबाबदार धरले असून, त्यांनी त्वरित नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देखील नागरिकांनी दिला आहे.

# भाजपच्या ११ वर्षांच्या कार्यकाळाचा जागर

## नागपुरात संवाद, चौपाल आणि उपक्रमांची रेलचेल; २५ जूनला समारोप

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

केंद्र सरकारला ११ वर्षे पूर्ण झाली. या निमित्त भाजपतर्फे अनेकविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २०१४ ते २०२५ या ११ वर्षात देशाचा कायापालट झाला आहे. या निमित्त भाजपतर्फे आयोजित विविध उपक्रम आणि कार्यक्रमाचा समारोप २५ जून रोजी आणीबाणी दिनी होणार असल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी पत्रपरिषदेत दिली.

नागपूर शहरांत सहा विधानसभा क्षेत्रातील २० मंडळात प्रत्येकी १० सभांचे आयोजन करण्यात आले आहे. या सभांमधून ११ वषातील निर्णयांची माहिती दिली जाईल. या शिवाय व्यापारी, शिक्षक, वकील, सी. ए. अशा विविध समाज घटकांशीही संवाद साधण्यात येईल असे तिवारी यांनी सांगितले.

विशेषतः ३५ वर्षांपेक्षा कमी वयातील तरूण तसेच नवउद्यमींशी संवाद साधून सरकार विषयीच्या त्यांच्या भावना आणि मते जाणून घेण्यात येणार आहे. डिजिटल मीडियासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

याच श्रृंखलेत २१ जून रोजी सुरेश भट सभागृहात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची प्रकट मुलाखत डॉ. उदय निर्गुडकर हे घेणार आहेत. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि नागपूर महानगरपालिकेने घेतलेल्या समाजकल्याणकारी निर्णयांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, घर चलो अभियानांतर्गत पत्रकांद्वारे ते प्रत्येक घरापर्यंत पोहोचवली जाईल.

१२ शहरातील विविध उद्याने, चौक आणि मॉलमध्ये चौपाल आयोजित करून ११ वर्षांच्या कार्यकाळावर संवाद साधण्यात येईल असे तिवारी यांनी सांगितले. यावेळी गिरीश व्यास, माजी जिल्हाध्यक्ष सुधाकर कोहळे, अनिल सोले, माजी खासदार अजय संचेती आदी उपस्थित होते.

# सेवानिवृत्त रेल्वे कर्मचाऱ्याची रूग्णालयात मृत्यूशी झुंज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

शेत पाहण्यासाठी सावनेरला जात असलेल्या एका वृद्धाला मालवाहूच्या चालकाने जबर धडक देऊन गंभीर जखमी केले.

दूर अंतरापर्यंत तो त्यांना फरफटत घेऊन गेला. ज्यात त्यांच्या शरीरातील अनेक हाडे तुटली. अपघाताची ही घटना मानकापूर ठाण्यांतर्गत समोर आली आहे. बुद्धुजी देशमुख (८२) रा. कोलते लेआऊट, गोधनी रोड, मानकापूर असे जखमीचे नाव असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयाच्या आयसीयूत उपचार सुरू आहेत.

देशमुख हे रेल्वेतून सेवानिवृत्त आहेत. त्यांचा मुलगा अनिल प्रॉपर्टी डीलर आहेत. देशमुख यांची सावनेरात शेतजमीन आहे. ३ जून रोजी शेत पाहण्यासाठी ते सावनेरला जात होते. परिसरातील दामोदर कोलते मंगल कार्यालयाजवळून पायदळ जात असताना मालवाहू चालकाने त्यांना धडक दिली व काही अंतरापर्यंत फरफटत घेऊन गेला. यात देशमुख गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर आयसीयूत उपचार सुरू आहेत. पोलिसांनी आरोपी वाहन चालक शुभम धरणीकरविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

देशमुख यांचा मुलगा अनिल यांनी पोलिसांवर प्रकरण दाबण्याचा आरोप केला आहे. पोलिसांनी चालकाला वाचविण्यासाठी जाणीवपूर्वक वाहनाचा क्रमांक चुकीचा टाकला आहे. वडिलांना ज्या वाहनाने धडक दिली त्याचा क्रमांक वेगळा आहे. आरोपी निष्पन्न झाला असतानाही पोलिसांनी त्याला अटक केली नाही. पोलिसांकडून या प्रकरणात सारवा-सारव करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यांनी यासंबंधात पोलिस आयुक्तालयात तक्रार केली असून पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्याकडे न्यायाची मागणी केली आहे.

# वृद्धाचा भ्रमणध्वनी हिसकावणारे जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

पहाटे फिरायला गेलेल्या वृद्धाच्या हातून भ्रमणध्वनी हिसकावून पळ काढणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी अटक केली.

धरमपेठमधील मालविका अपार्टमेंटमधील रहिवासी सुधाकर मोरे (८०) हे पहाटे फिरायला गेले असता रामदासपेठ परिसरात त्यांच्या मागून दुचाकीने आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांच्या हातातील मोबाईल फोन हिसकावला व पळ काढला. मोरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून सीताबर्डी पोलिसांनी गुन्हा दाखल केला व तपास सुरू केला.

पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयित आरोपींचा शोध सुरू केला. जुनेद अखतर (१९) रा. मोठा ताजबाग आणि आणि शेख शहाबाज फारुक शेक (२०) रा. ताजबाग या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपींकडून मोबाईल हस्तगत करण्यात आले आहे.

# सत्रापूर परिसरात वाघाचा धुमाकूळ

## तीन दिवसात तीन ठिकाणी वाघाचा प्राण्यांवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ११ :

रामटेक वनपरीक्षेत्र हद्दीतील बोरडा ग्रामपंचायत अंतर्गत सत्रापूर गावात एका आठवड्यापासून वाघाचा धुमाकूळ आहे . भरदिवसा प्राण्यांवर होणाऱ्या हल्ल्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतीची कामे करावी तरी कशी? असा प्रश्न निर्माण होत आहे.

वनपरिक्षेत्र रामटेक हद्दीतील गट ग्रामपंचायत बोरडा सराखा अंतर्गत सत्रापूर गावात गेल्या एका आठवड्यापासून दोन ते तीन वाघांनी धुमाकूळ घातल्याचे गावकरी सांगतात . सत्रापूर गावालगत दिवसाढवळ्या शेतात चरणाऱ्या पाळीव प्राण्यांवर वाघ हल्ला करीत असल्याने शेतकरी भयभीत आहेत.

५ जूनला सत्रापूर येथील उदाराम आप्तुरकर यांच्या शेतातील दोन बकऱ्या, भीमराव ठाकूर यांचे एक वासरू तर देवमन उईके यांच्या दुधाळू गायीवर वाघाने दिवसाढवळ्या हल्ला करीत ठार मारले.

आता शेतीच्या कामाला वेग आला असून, शेतकरी शेतातच दिसतात . मात्र वाघाच्या भीतीने शेतकरी भयग्रस्त असून, शेतीची कामे करावी कशी? याची चिंता त्यांना समावत आहे . दरम्यान, वाघाच्या वाढत्या हल्ल्याची माहिती वनविभागाला देण्यात आली. क्षेत्रसहाय्यक मुनेश्वर गोंडीमेश्राम व बिट वनरक्षक रेखा चोंदे यांनी घटनास्थळी जात पंचनामा केला. नुकसानग्रस्त पशूपालकांना वनविभागामार्फत नुकसान भरपाई देण्यात येईल असे क्षेत्रसहाय्यक मुनेश्वर गोंडीमेश्राम यांनी सांगितले . गावकऱ्यांनी स्वतःची काळजी घ्यावी, रात्रीच्या सुमारास घराबाहेर पडू नये, हातात काठीचा वापर करावा, जनावरे मोकळ्या ठिकाणी न बांधता गोठ्यात बांधावीत, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

उपसरपंच पंकज चौधरी यांनी मंगळवारी सत्रापूर येथे घटनास्थळी भेट दिली . वाघाने गाईची शिकार करून १०० मीटरपर्यंत ओढत नेल्याचे दिसून आले. या ठिकाणी वन विभागाने कॅमेरे देखील लावले होते या कॅमेऱ्यामध्ये गाईजवळ वाघ उभा असल्याचे दिसून येते.

उपसरपंच पंकज चौधरी यांनी दुसरा परिसर गाठले असता वनविभागाचे काही कर्मचारी व गावकरी त्या ठिकाणी दिसून आले. वाघ याच परिसरात होता अशी माहिती काही प्रत्यक्षदर्शी यांनी माध्यमांना दिली.

चौधरी यांनी या संपूर्ण घटनेची माहिती रामटेकचे वनपरिक्षेत्र अधिकारी बनसोडे यांना





दिली असता त्यांनी तात्काळ वनविभागाची टीम घटनास्थळी रवाना केली. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिसरात बंदुकीने आवाज करीत त्या वाघाला परिसराच्या बाहेर जंगलाच्या दिशेने वळविले. मात्र वाघ पुन्हा या परिसरातच असल्याने गावातील नागरिकांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. या वाघाला बेशुद्ध करून सुरक्षित ठिकाणी नेण्यात यावे अशी मागणी सत्रापूर गावकऱ्यांकडून केली जात आहे.

# आता डिजीलॉकरमध्ये विजेची बिले उपलब्ध

## लाभ घेण्याचे महावितरणचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला अशी महत्त्वाची कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात सुरक्षित ठेऊन हवे तेव्हा उपलब्ध करून देणाऱ्या केंद्र सरकारच्या डिजिलॉकर या ऑनलाईन सुविधेमध्ये आता महावितरणची वीजबिलेही उपलब्ध झाली असून वीज ग्राहकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बुधवारी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून वीज ग्राहकांना ईज ऑफ लिव्हिंगच्या आधारे अधिकाधिक सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने केंद्र सरकारच्या डिजिलॉकरशी वीजबिले जोडली आहेत. यामुळे वीज ग्राहकांना आपल्या मोबाईल फोनमध्ये




डिजिलॉकर ॲपमध्ये ठेवलेल्या महत्त्वाच्या दाखल्यांसोबतच वीजेची बिलेही उपलब्ध होणार आहेत. त्यांना वीजबिल भरण्यासाठी तसेच गरजेनुसार हे बिल कोणाला पाठविण्यासाठी किंवा त्याचा प्रिंट काढण्यासाठी याचा उपयोग होईल.

डिजिलॉकर हा केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या अंतर्गत सुरू केलेला महत्त्वाचा उपक्रम आहे. त्याचा वापर करून नागरिकांना आपले पॅन कार्ड, वाहन नोंदणी कागदपत्रे, रेशन कार्ड, दहावी मार्कशीट, बारावी मार्कशीट, निवासाचा दाखला असे अनेक दस्तऐवज ॲपमध्ये सुरक्षित ठेवता येतात आणि गरजेनुसार त्यांचा वापर करता येतो.

सर्व दाखले मोबाईलच्या ॲपमध्ये ठेवलेले असल्याने ते सदैव सोबत उपलब्ध राहतात. देशात आतापर्यंत ५२ कोटी ८९ लाख नागरिकांनी डिजिलॉकरचा वापर सुरू केला असून त्यांनी त्यात ८५९ कोटी कागदपत्रे ठेवली आहेत.

माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या नियमावलीनुसार डिजिलॉकरमधील दस्तऐवज मूळ कागदी प्रत्यक्ष दाखल्याच्या समान समजले जातात व त्याला कायदेशीर दर्जा आहे.

महावितरणने आपल्या संगणकीय व्यवस्थेतील बिलांची माहिती डिजिलॉकर सुविधेला उपलब्ध करून दिली आहे. वीज ग्राहकाने आपल्या डिजिलॉकर ॲपमध्ये गेल्यानंतर महावितरण वीज कंपनीची निवड करून आपला वीज ग्राहक क्रमांक दाखल करण्याची कृती एकदाच करायची आहे. त्यानंतर त्या ग्राहकाला आपल्या डिजिलॉकरमध्ये विजेचे चालू महिन्याचे बिल उपलब्ध होईल

# नागपुरात कुष्ठरोगाचे २२२ रुग्ण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

केंद्र व राज्य शासन कुष्ठरोग निर्मुलनासाठी प्रत्येक वर्षी कोट्यावधींचा खर्च करते. परंतु आजही राज्यातील काही भागात हे रुग्ण आढळत आहे. पूर्व विदर्भात या रुग्णांची संख्या जास्तच आहे. त्यामुळे शरीरावर चट्टे असल्यास तातडीने तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्याने उपचार गरजेचा आहे.

नागपूर शहरात कुष्ठरोगाचे २२२ रुग्ण आहेत. त्यामध्ये मागील दोन महिन्यांत आढळलेल्या ३४ नवीन रुग्णांचाही समावेश आहे. नागपूर शहरासह पूर्व विदर्भात कुष्ठरोगाच्या रुग्णांची संख्या जास्त आहे. या आजाराच्या निर्मूलनासाठी रुग्णांना उपचाराच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे.

या आजाराची इतर आजारांप्रमाणे तीव्र लक्षणे नसल्यामुळे रुग्णालाही आपल्याला कुष्ठरोग आहे हे कळत नाही. अशात अशा रुग्णांचा शोध घेणे आव्हानात्मक ठरते. मनपाच्या आशा सेविका तसेच आरोग्य चमू या कार्यात तत्परतेने काम करत आहे.

नागपूर महापालिकेच्या आकडेवारीनुसार, या वर्षात नागपूर शहरात कुष्ठरोगाचे २२२ रुग्ण आढळले. यात लहान मुलांची संख्या सात असून, महिलांची संख्या ७९ आहे. १४ रुग्णांना विकृती आली आहे.

जेव्हा त्वचेवर सहा किंवा त्याहून अधिक ठिपके असतात किंवा दोन किंवा त्याहून अधिक नसा प्रभावित होतात, तेव्हा मल्टी-बॅसिलरी कुष्ठरोग असे लेबल लावले जाते, असे १७७ रुग्ण आहेत तर, पॉसिबॅसिलरी (पीबी) कुष्ठरोग हा कुष्ठरोगाचा एक प्रकार असून, ज्यामध्ये कमी बॅक्टेरियाचा भार असतो, असे ४५ रुग्ण आहेत.

शरीरावर पिवळा, लालसर डाग किंवा चट्टा, अंगावरील गाठी, कानाच्या जाड झालेल्या पाळ्या, स्नायूंचा अशक्तपणा, चट्टयाच्या जवळून जाणारी नस जाड बनते व दुखते. ही लक्षणे दिसताच आरोग्य केंद्रात तपासून घ्यायला हवे किंवा आशा सेविकांना माहिती द्यायला हवी, असे सांगण्यात आले.

## डिजिटल व्यवहारात उल्लेखनीय योगदानाबद्दल

# रेल्वे कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

आग्नेय मध्य रेल्वे मुख्यालय, बिलासपूर येथे प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक प्रवीण पांडे यांनी प्रवासी आरक्षण प्रणाली सुधारण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल चौकशी कम आरक्षण लिपीक यांना सन्मानित करण्यात आले.

आग्नेय मध्य रेल्वेमध्ये डिजिटल इंडियाचे स्वप्न साकार करणे, रेल्वेच्या व्यावसायिक कामकाजात सुधारणा करण्यासाठी पारदर्शकता, जलद सेवा आणि सुरक्षित व्यवहार सुनिश्चित करण्यासाठी उद्दिष्टे निश्चित करून डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणे. प्राधान्य दिले जात आहे.

या क्रमाने, प्रवासी आरक्षण प्रणाली, तिकीट प्रणालीमध्ये डिजिटल व्यवहार केले जात आहेत. त्याला चालना देण्यासाठी सतत प्रयत्न केले गेले, आग्नेय मध्य रेल्वेच्या आरक्षण युनिट्समध्ये डिजिटल व्यवहारांचे प्रमाण सुमारे ५५ ते ६० टक्के आहे. डिजिटल पेमेंटद्वारे रोख व्यवहारात घट, बदलाची समस्या दूर करणे, फसवणुकीची शक्यता कमी करणे, प्रवाशांना जलद आणि सोपी सेवा देणे आणि व्यवहार सुलभ करणे याचा समावेश असून रिअल टाइम रेकॉर्डिंगसारखे अनेक फायदे मिळत आहेत. त्याच क्रमाने, बिलासपूर, रायपूर, दुर्ग, गोंदिया, नागपूर, भिलाई आणि उसलापूर सारखी प्रमुख आरक्षण केंद्रात कार्यरत कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. बिलासपूर विभागातील एस. अनिल कुमार यांच्यासह विभागातील मनोज गुबरेले, मौमिता मजुमदार, रायपूर विभागातून श्वेता शर्मा, पी. भट्टाचार्य आणि नागपूर विभागातून रिंकू सिंग व नेहा ठाकूरसह एकूण १५ कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कारामुळे त्यांना अधिक प्रेरणा मिळत असून, प्रवाशांनाही डिजिटल व्यवहार करण्यास प्रोत्साहन मिळेल, ज्यामुळे रेल्वेमध्ये डिजिटल व्यवहार वाढतील, असे पुरस्कर्त्यां कर्मचाऱ्यांनी सांगितले.

प्रिन्सिपल चीफ कमर्शियल मॅनेजर प्रवीण पांडे यांनी सर्व कर्मचाऱ्यांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी त्यांनी सतत योगदान देण्याचे आश्वासन दिले.

# अज्ञात रूग्णाने लावला मेयोच्या शौचालयात गळफास

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :

मेयो रुग्णालयाच्या शौचालयात एका इसमाने गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना रात्री उघडकीस आली. आत्महत्या करणाऱ्याची ओळख पटविण्याचे काम सुरू होते तहसील पोलिसांनी नोंद केली आहे. मृतक रुग्णालयाचा कर्मचारी नाही तसेच तो रुग्णही नाही, असा प्राथमिक अंदाज आहे.

मेयो रुग्णालयाच्या आकस्मिक विभागात नेहमी प्रमाणे रुग्णांची वर्दळ होती. रात्री येणाऱ्या रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर उपचार सुरू होते. दरम्यान रात्री ९ वाजताच्या सुमारास एक रुग्ण शौचालयात गेला असता तो ओरडतच बाहेर पडला. काय झाले म्हणून सर्व कर्मचाऱ्यांनी शौचालयाकडे धाव घेतली. पाहतात तर एक ४० ते ४५ वयोगटातील इसम गळफास लावलेल्या स्थितीत आढळला. डॉक्टरांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले.

जवळच असलेल्या चौकीतील पोलिस घटनास्थळी पोहोचले. तहसील पोलिसांना घटनेची माहिती दिली. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली. मृतक कोण आणि कुठला आहे, या दिशेने पोलिस तपास करीत आहेत.

# माहेश्वरी मंडळातर्फे शिवनवमी निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ११ :

माहेश्वरी मंडळ वाडी हिंगणा नागपूरच्यावतिने शिव नवमीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दत्तवाडी येथे आयोजित कार्यक्रमात माहेश्वरी पंचायत सीताबर्डीचे अध्यक्ष वीरेंद्र चांडक, सचिव योगेश सावळ, अखिल भारतीय माहेश्वरी युवक मंडळाचे उपाध्यक्ष हिमांशू चांडक, प्रकाश हेडा, सूर्यप्रकाश माहेश्वरी, गोपाळ राठी, ओमप्रकाश राठी, घनश्यामदास राठी, गोकुळदास चांडक, रमेश राठी, दीपक चांडक प्रामुख्याने उपस्थित होते.

दीप प्रज्वलन, गणेश पूजा आणि अन्य धार्मिक विधी करून कार्यक्रमांची सुरूवात करण्यात आली . सर्व अतिथींचे आयोजन समितीकडून स्वागत करण्यात आले . अतिथींनी मनोगत व्यक्त केले.





यावेळी मुलेमुली तसेच युवक आणि महिलांनी विविध नृत्य, गीत गायन, शिवा क्रोध नृत्य आणि इतर कार्यक्रम सादर केले . न्यायाधीश नीता चांडक, भावना केळी आणि स्मिता राठी यांनी स्पर्धकांमधून विजेता व उपविजेत्यांची निवड केली . तटस्थ निवड केले.

विजेते आणि सहभागी झालेल्यांना पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार व प्रोत्साहनपर प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले . १० वी आणि १२ वीच्या परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . रवी मंत्री, अदिती मंत्री आणि आभा सोनी यांच्या नेतृत्वात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमात २०० पेक्षा अधिक समाजबांधव उपस्थित होते.

तत्पूर्वी महेशनवमी निमित्त शोभा यात्रा काढण्यात आली . रचना मंत्री, ब्रिजगोपाल क्रॅक, राजेश काबरा, सतीश बियाणी, डॉ. अनुप राठी, राम स्वरूप सोमाणी यांनी पुजाअर्चा करीत शोभायात्रेची सुरूवात केली.

संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक दिनेश मंत्री, प्रवीणा जोड, घनश्यामदास राठी, लक्ष्मीनारायण केला, गोपाळदास राठी, ओमप्रकाश राठी, दीपक चांडक, उज्ज्वल चांडक, राजेश आर. राठी, पुरुषोत्तम चांडक, प्रशांत मुंधडा, रवी मंत्री, गौरव जाजू, विक्रम कोठारी, हेमंत सुरेश राठी, अमित राठी, कैलास राठी, माहेश्वरी महिला मंडळाच्या पल्लवी सोमाणी, रेखा राठी, राधिका राठी, समाधान मंत्री, ओम चांडक, यशोदा माहेश्वरी, चंचल सोनी, श्रीमती प्रियंका लड्ढा, प्रवीणा झोड आणि समस्त कार्यकारी मंडळाने विशेष प्रयत्न केले.